Impact Factor
2018 – 5.302
www.sjifactor.com

ISSN 2454-7409
Vol. 3 Issue 1 Jan. 2018

वर्ष तिसरे अंक पहिला जानेवारी २०१८

Peer Reviewed Annual
National Research Journal in Marathi

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

मराठी भाषा, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक



Impact Factor 2018 – 5.302 ISSN 2454-7409

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

Peer Reviewed Annual National Research Journal
वर्ष तिसरे, अंक पहिला, जानेवारी २०१८

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब

**प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**मुद्रक**
सेवा प्रकाशन
विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ**
डॉ. पवन मांडवकर

Communication
Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
e mail – **marathipradhyapak@gmail.com**
Alternate mail id – **imvkalamb@yahoo.co.in**
Tele. 07201-226170, 226147, 226129 Mob. 9422867658. 9403014885
**Website: www.indiramahavidyalaya.com**

जानेवारी, २०१८

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका


## निमंत्रित संपादक मंडळ

विक्रम राजे, 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, United Kingdom
डॉ. अनिता गुप्ते पाटील, Auckland, New Zealand
रणजीत राजे, 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourn, VIC-3006, Australia
विशाल डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद कार्यकारिणीचे सर्व सदस्य

अध्यक्ष – डॉ. पवन मांडवकर
उपाध्यक्ष – प्रा. अनुप नांदगावकर
सचिव – प्रा. रा.तु. आदे
कोषाध्यक्ष – डॉ. गजानन हेरोळे
सहसचिव – प्रा. अतुलकुमार सारडे
सदस्य – प्रा. अनिल काळबांडे
सदस्य – प्रा.डॉ. ममता इंगोले
महिला प्रतिनिधी – प्रा.डॉ. मीना जुनघरे, प्रा. डॉ. शुभांगी कोंडोलीकर
अमरावती जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. रमाकांत इटेवाड, प्रा.डॉ. दिनेशचंद्र राऊत
अकोला जिल्हा प्रतिनिधी – प्रा. विनय पैकिने, प्रा. प्रकाश वानखडे
बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. शोभा नाफडे, प्रा. आनंद धुंदाळे
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी – प्रा. सिद्धार्थ भगत, प्रा.डॉ. युवराज मानकर
वाशिम जिल्हा प्रतिनिधी – प्रा.डॉ. विजय जाधव, प्रा.डॉ. शरद वाघोळे

## सल्लागार मंडळ

सोनाली डहाळकर, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
डॉ. शशिकांत सावंत, विक्रम विश्वविद्यालय, उज्जैन, मध्यप्रदेश
डॉ. अनिल गजभिये, माजी प्राचार्य, शासकीय महाविद्यालय, सरदारपूर, जि. धार, मध्यप्रदेश
डॉ. धनाजी गुरव, प्राचार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड, जि. रायगड
डॉ. लीला मोरे, सेवानिवृत्त प्राध्यापक, शासकीय कला वाणिज्य महाविद्यालय, इंदौर, मध्यप्रदेश
डॉ. सिंधू मांडवकर, सेवानिवृत्त प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
डॉ. किसन पाटील, एम.जे. कॉलेज, जळगाव, खान्देश



या अंकाचे नियमित मूल्य – २०० रुपये
– सरळ खात्यात वर्गणी पाठविण्याकरिता बँकेची माहिती –
A/c Name - Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre

Bank - Bank Of Maharashtra | Branch - Azad Maidan Road, Yavatmal
A/c No. – 60175373000 | IFSC code - MAHB0000047



(या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका
डॉ. भाऊ मांडवकर रिसर्च सेंटर
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ 445401 (महा. स्थापना १९८३, नॅक ब श्रेणी प्राप्त)
कार्यालय (07201) 226147, 226129, 226170, निवास (07232) 252975, 9422867658
E mail : marathipradhyapak@gmail.com

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्रातर्फे व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या संपादनाखाली **मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका** या राष्ट्रीय पातळीवरील ISSN जर्नलकरिता मराठी विषयाच्या प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक छात्र व अभ्यासकांकडून शोधनिबंध मागविले जातात. मराठी साहित्य, संशोधन, संस्कृती, कला तसेच मराठी अध्ययन–अध्यापनाशी संबंधित कोणत्याही विषयावर शोधनिबंध स्वीकारले जातात. हे जर्नल जानेवारी महिन्यात प्रकाशित होते.

१. शोधनिबंध मायक्रोसॉफ्ट वर्डमध्ये ए ४ आकारात चारही बाजूंनी सव्वा इंच मार्जीन सोडून सिंगल स्पेसिंगसह कृतीदेव ५० फॉन्टमध्ये संपूर्ण बोल्ड करून वरील आयडीवर ई–मेलने पाठवावा. पीडीएफ चालणार नाही.

२. अक्षरांचा आकार १४, निबंध शीर्षकाचा आकार २६, शीर्षकाखाली मध्यभागीच लेखकाच्या नावाचा आकार १६, त्याखाली लेखकाचे पद, महाविद्यालयाचे नाव, पत्ता, स्वतःचा मेल आयडी व भ्रमणध्वनी १४ आकारात असावे. अंतर्गत उपशीर्षकांचा आकार १८ असावा व ती डावीकडे असावीत. त्यापुढे कुठलेही चिन्ह नसावे. नाव व पत्त्याखाली लेखकाचा साहित्य, संशोधन इ. संदर्भात जास्तीत जास्त चार ओळीत परिचय पाठवावा.

३. शब्दमर्यादा २५०० किंवा अधिकतम ५ पेजेस. निबंध प्रकाशित करण्यासंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

४. शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळला जावा. त्यात सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष, संदर्भ यांचा समावेश करण्याचा प्रयत्न करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात.

५. शोधनिबंध इ मेलने पाठविण्याची अंतिम तारीख १ डिसेंबर. मेल व्यवस्थित मिळाल्याची फोनवर खात्री करावी.

# Research Journal of India

Research Journal of India is a Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-disciplinary studies of various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the all areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

**Call for Research Paper**

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on each side.
3. No header & footer should be given.
4. Text should be in **Times New Roman** type with font size **11** in English and **Krutidev 50** type with **14** font size for Hindi/Marathi and should be computed in MS word only. PDF files will not be accepted.
5. Font size for Title of Paper 22 bold for English and 26 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold for English, 16 bold for Hindi/Marathi, address in 11 for English, 14 bold for Hindi/Marathi & Subtitles in 14 bold for English and 18 bold for Hindi/Marathi. For Marathi and Hindi articles Krutidev 50 font should be tatally bold for all matter.
6. Spacing should be **single**. Alignment for paper & headings should be justified & centered for title of paper & name of writer with address.
7. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id at the centre below title.
8. Introduction, review of literature, background of study, methodology, objectives, purpose, hypothesis, significance, findings and discussion, analysis, conclusion, recommendations may be given wherever required.
9. References list should be alphabetized at the end of research paper.

10. Tables & figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
11. Maximum limit is 2500 words or 5 pages. Abstract should be up to 150 words followed by 4-5 key words. Paper less than 3 pages or without references will not be accepted.
12. Authors have to send research paper by e mail at: **marathipradhyapak@gmail.com**
11. Editorial Board's Decision will be final.
13. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal of India.**
14. International Guidelines for writing of research paper are to be strictly followed.
15. Date of Publishing is 1rst October each year and papers will be accepted up to 1rst September.

Subscription for one year and single issue price for individual, institutional Rs. 500/- to be deposited in A/c No. – 60175373000 of Bank of Maharashtra, Azad Maidan Road, Yavatmal, IFSC code - MAHB0000047 in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre.

❖❖❖

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार | प्रा. यशवंत एच. पवार | ५ |
| २ | पदवी स्तरावरील ग्रामीण कवितेचे अध्यापन (विशेष संदर्भ फ.म. शहाजिंदे यांची कविता) | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | १० |
| ३ | स्व–सामर्थ्य व आत्मभान यांचा शोध घेणारी कविता महाजन यांची 'ब्र' कादंबरी | प्रा. मंगला पाटील | १५ |
| ४ | विद्यार्थी कल्याणकारी शिक्षण | प्रा. अंशुमती पेंडोखरे | १८ |
| ५ | मराठवाडा–कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीचे भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून विश्लेषण | बालाजी मदन इंगळे | २२ |
| ६ | लोकसाहित्यातून येणारी मिथके : संकल्पना आणि स्वरूप | प्रा.डॉ. अपर्णा पाटील | २८ |
| ७ | संत नामदेवांचे महाराष्ट्राबाहेरील कार्य | प्रा.डॉ. गजानन घोंगटे | ३२ |
| ८ | ऋतुरंग : एक आकलन | प्रा. रा.तु. आदे | ३५ |
| ९ | प्रारंभीच्या कादंबरीप्रवासातील वळणे | डॉ. पवन मांडवकर | ३८ |
| १० | राष्ट्रसंतांची शिक्षण विषयक भूमिका | प्रा.पी.एस. निर्मळ | ४४ |
| ११ | 'संतकृपा जाली' हा अभंग नक्की कोणाचा? | प्रा. डॉ. वीरा मांडवकर | ४७ |
| १२ | कामगारांची तळपती तलवार: कवी नारायण सुर्वे | डॉ. सी.डी. पाखरे | ५१ |
| १३ | श्री गुलाबराव महाराज आणि मधुराभक्ती | प्रा.डॉ. संजय पाटील | ५४ |

# राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार

प्रा. यशवंत एच. पवार
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी ९४०५९३४८४९

## सारांश

बहुजन समाजाचे कैवारी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कारकिर्दीत इ.स. १८९४ पासून इ.स. १९२२ पर्यंत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, दलितोद्धार, बहुजन हित, आर्थिक व शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य केले; परंतु उपरोक्त सामाजिक हित लक्षात घेऊन त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये जे कार्य केलेले आहे ते निश्चितच प्रेरणादायी आहे. बालकांचा मोफत व हक्काच्या शिक्षणाची अंमलबजावणी ही सर्वप्रथम महाराजांच्या पुढाकाराने कोल्हापूर संस्थाना मध्ये झाल्याचे दिसते. या ठिकाणी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या अधिकाराचा किंवा राजगादीचा उपयोग दलित आणि उपेक्षित समाजाकरिता केला आहे.

**बीजशब्द** :— बहुजन, कैवारी, राजर्षी, अंमलबजावणी, संस्थान, अधिकार, आधारस्तंभ, वजारत —मा— आब, जहागिरी, अभ्युदय, राजनिती, मुत्सद्देगिरी, लौकीक, दत्तक, टेक्निकल स्कूल , प्रजानन, राजनिष्ठा, वतनदार, बजेट, गर्व्हनर, ग्रॅंट परिच्छेद

## प्रस्ताविक

छत्रपती राजर्षी शाहू महाराज ज्या घराण्यात जन्माला आले, त्या घाटगे घराण्याचा इतिहास फार उज्ज्वल आहे. महाराष्ट्रातील घाटगे घराणे म्हणजे खानदानी घराणे. राजस्थानातील सुप्रसिद्ध 'राठोड' घराण्यातील एक तुकडी पंधराव्या शतकात नशीब काढण्यासाठी महाराष्ट्रात आली. त्यांनी साताऱ्यानजीक पडळीची पाटीलकी मिळविली. यानंतर घाटग्यांनी विजापूर दरबारात नोकरी धरली. अठराव्या शतकाच्या अखेरीस या घराण्यातील शिंद्यांच्या नेतृत्वाखाली ते पुढे आले. पुण्यात पेशवाईचे ते आधारस्तंभ झाले. यशवंतराव होळकरांची पुण्यावरील स्वारी व कोल्हापुरात पडलेला परशुराम भाऊ पटवर्धनांचा वेढा — यातून पराक्रमाने व मुत्सद्देगिरीने मार्ग काढून त्यांनी यश संपादन करून दिले. यामुळे या घराण्याचा लौकिक वाढला.

हे सखाराम सर्जेराव घाटग्यांचे पुत्र. १८०८ च्या सायगावंच्या लढाईत कोल्हापूरच्या छत्रपतीचे राज्य वाचविण्यात त्यांनी मोठे साहाय्य केले. त्याबद्दल त्यांना 'वजारत—मा—आब' हा किताब मिळाला. १८८५ मध्ये ते ग्वाल्हेरला गेले. तेथे त्यांनी आपल्या भगिनी बायजाबाई यांना राज्यकाराभारात चांगली मदत केली. हिंदूरावांना मूल नव्हते. त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांनी केनवडेकर घराण्यातील गोविंदराव या मुलास इ.स. १८६० साली दत्तक घेतले. त्यांचे नाव सखाराम बापू ठेवले. त्यांचाही इ.स. १८६४ साली मृत्यू झाला. त्यानंतर सखाराम बापूच्या पत्नी सुंदराबाई यांना कागलकर धाकटया पतीचे अधिपती श्री.नारायणराव बाबासाहेब यांचे थोरले चिरंजीव दत्ताजीराव उर्फ आबासाहेब घाटगे यांना दत्तक घेतले हेच राजर्षी शाहू महाराजांचे वडील— जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे होत.

छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव असे होते. १८७८ साली कागल जहागिरीच्या अधिपतीत्वाची सूत्रे श्रीमंत आबासाहेबांच्या हाती आली इ.स. १८८३ साली अहमदनगर येथील किल्ल्यात त्यांचा अंत झाला. यानंतर चौथे शिवाजी महाराज यांच्या महाराणी आनंदीबाईसाहेब यांनी यशवंतरावाना दि. १७/३/१८८४ रोजी दत्तक घेतले व त्यांचे नांव 'शाहू छत्रपती' असे ठेवले. छत्रपती शाहू महाराजांनी दि.०२ एप्रिल १८९४ रोजी अधिकार ग्रहण केले त्यावेळी सर्व प्रजाजनांना जाहीर केले की,

''आमचे प्रजानन सदा सुखी व संतुष्ट असावेत त्यांच्या हिताची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे. यासाठी सर्वांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हास आवश्कता आहे.''

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सार्वत्रिक शिक्षण प्रसारासाठी आपली उभी हयात खर्च केली. १८९४ साली महाराज गादीवर आले तेव्हा बहुजन सामाजात मॅट्रीक पास फक्त बोटावर मोजण्याइतके दिसून आले कारण गावोगावी प्राथमिक शाळा नव्हत्या. बहुसख्यं लोकांत शिक्षणाची आवडच नव्हती. त्यामुळे बहुजन

समाज अज्ञानात व दारिद्रयात डुबून गेलेला त्यांना दिसला. विषमता नष्ट करायच्या उद्देशांने ते 'ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा' या उक्तीप्रमाणे सार्वत्रिक शिक्षण प्रसाराकडे वळले.

## सक्तीच्या सार्वजनिक शिक्षणाची योजना

कोल्हापूर संस्थानात १९१२ साली प्रत्येक खेडयात नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमण्याची महाराजांनी योजना काढली. पण वतनदार शिक्षक योजनेत जमिनी मिळविण्याची जशी अडचण निर्माण झाली, तसे या धोरणात बदल करणे त्यांना भाग पडले. सन १९१४ साली त्यांनी पगारी शिक्षकच नेमले. वतनी जमिनी उपलब्ध होताच ही पगारी योजना रद्द करण्याचे त्यांनी ठरविले , पण सन १९१७ साली महाराजांनी ही वतनदार — शिक्षक पध्दत बंद केली व पुन्हा पगारी 'शिक्षक योजना' त्यांनी सुरू केली. तसे खर्चाचे बजेट मंजूर केले. तसेच देवस्थानचा आवश्यक तो खर्च करून उरलेली रक्कम या शिक्षणावर खर्च करावी असे त्यांनी आज्ञापत्र काढले.

महाराजांनी प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक (सक्तीचे) व मोफत करण्यासाठी एक कमेटी नेमली. या कमेटीच्या शिफारशीप्रमाणे खुद्द कोल्हापूर शहरात व तालुक्यातील गावोगावी सक्तीच्या शिक्षणाचा अंमल १९१६ पासून सुरू झाला. कै. रावसाहेब डी.आर. भोसले हे शिक्षणाधिकारी झाले.

सन १९१८—१९ च्या अखेरीस या सक्ती—शिक्षण योजनेस विस्तृत स्वरूप प्राप्त झाले. खेडयापाडयांत या सक्ती— शिक्षण योजनेचा अंमल सुरू झाला. सक्ती योजनेप्रमाणे वयात असणाऱ्या मुलामुलींना शाळेत पाठविण्याबद्दल गावकामगार व पालक यांना कडक निर्बंध लागू केले.

## गव्हर्नरांची पाहणी

सन १९१९ साली मुंबईचे गर्व्हनर सर लॉईड जॉर्ज यांनी महाराजांच्या चालू असलेल्या सार्वत्रिक शिक्षण योजनेची पाहणी केली. त्यांनी त्यावेळी महाराजांची फार मोठी तारीफ केली त्यावेळी महाराज सर साहेबांना म्हणाले,

''माझ्या प्रजेपैकी पुढारलेल्या लोकांपेक्षा निर्बल लोकांची मी अधिक काळजी घेत आहे. त्यांची परिस्थिती पाहून माझे मन द्रवते. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न करणे, हे माझे सर्व कार्यातील मुख्य ध्येय आहे. म्हणून मी अलीकडे सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न हाती घेतला आहे.''

## माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय

सन १९८४ साली महाराज गादीवर येताच त्यांनी राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेजच्या सर्व गरीब विद्यार्थ्यांना नादारी (फी माफी) दिल्याबद्दल जाहीर केले व त्याप्रमाणे या नादारीची अंमलबजावणी करण्यात आली.

यानंतर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची दुसरी एक फार मोठी गैरसोय होती. गरीब, गरजू, दलित, व मागासलेल्या अशा सामान्य जनतेची मुले हायस्कूल व कॉलेज शिक्षणाची इच्छा करतात — पण त्यांना जेवण्याची, राहण्याची त्यावेळी सोय नव्हती. त्यामुळे खेडयापाडयातील अनेक बुद्धिमान मुले, या गैरसोयीमुळे घरी बसत. त्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेला व प्रगतीला या अडचणीमुळे खीळ बसे. तेव्हा, महाराजांनी ही गैरसोय ध्यानी आणली व सन १९९६—९७ च्या अहवालात महाराजांनी 'जितक्या जाती — जमाती असतील त्यांच्यासाठी वसतीगृहे काढण्याची धाडसी व महत्त्वाकांक्षी योजना' जाहीर केली. हया महत्त्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ त्यांनी सन १९०० पासून केला सुद्धा!

## विविध योजना

अशी वसतिगृहे काढण्याबद्दल महाराजांनी श्री. म्हस्के, न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले यांचा सल्ला घेतला होता. या वसतिगृहांच्या विविध शिक्षण योजना सुरू करण्याच्या प्रारंभी कोल्हापूरच्या जातिविशिष्ट पत्रांनी ओरड केली होती. 'समर्थ' पत्राने फार कडक टीका केली होती. 'राजाराम कॉलेजमध्ये जे तरुण शिकत आहे त्यांच्यावर या योजनेमुळे अन्याय होत आहे,' अशी 'समर्थ' पत्राने ओरड केली . या पत्रास दलितोद्वार पसंत नव्हता. याबद्दल महाराज म्हणतात:,

''ब्राम्हणांनी कारस्थाने कधीच बंद होणार नाहीत, असे मला वाटते. धर्मांच्या बाबतीत उत्पन्न झालेल्या मतभेदाची ब्राम्हणांना विशेष दिक्कत वाटत नाही. परंतु मागासलेल्या वर्गांना पुढे आणण्याचे माझे धोरण मात्र या उच्चवर्णीयांना आवडत नाही, हीच गोष्ट खरी असावी. कालचक्राच्या फेऱ्यामुळे जी नविन परिस्थिती निर्माण झाली आहे, तिला तोंड देणे यांना प्राप्त आहे''

<u>कॉलेज विद्यार्थी वसतिगृहे</u> :– सन १८९७ साली दरबाराने जाहीर केल्याप्रमाणे ब्राह्मण समाजाने आपले विद्यार्थी जमवून वसतिगृह चालू केले. या वसतिगृहास भोजन– देणगी मिळू लागली. असि. जज्ज श्री. गोखले हे व्यवस्था कमिटीचे अध्यक्ष होते. या वसतिगृहात सर्व जातीचे विद्यार्थी घ्यावेत, अशी वसतिगृहाच्या चालकांना दरबाराने सूचना दिली होती पण तीन वर्षात एकाही ब्राम्हणेत्तर विद्यार्थ्यास या वसतिगृहात जागा मिळालेली नाही. त्यामुळे या वसतिगृहास भोजनखर्च देण्याचे दरबारने नामंजुर केले. इतर जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तरच भोजन मदत पुन्हा सुरू होईल, असे दरबाराने चालकांना कळविले.

<u>व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग</u> :– मराठा विद्यार्थ्यांचे वसतिगृह काढण्यासाठी महाराजांनी काही मुले सन १९०० पासूनच वाड्यात जमविली व वसतिगृह सुरू केले. १९०१ साली या वसतिगृहास मूर्त स्वरूप आले. या वसतिगृहास पुढे 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग' असे त्या वेळच्या भारताच्या या सम्राज्ञीचे नाव दिले.

<u>जैन वसतिगृह</u> :– एप्रिल १९०१ मध्ये जैन – विद्यार्थी –वसतिगृह उघडले. मुंबईतून या वसतिगृहाला मोठी देणगी मिळाली. या वसतिगृहाच्या जागेबद्दल तक्रारी निर्माण झाल्या. पण जागा एकदा ठरली असल्याने या तक्रारी महाराजांनी विचारात घेतल्या नाहीत. महाराजांनी ही इमारत पूर्ण केली. या वसतिगृहास दरसाल मोठी ग्रॅट मंजूर केली. १०० विद्यार्थ्यांची या वसतिगृहात सोय झाली.

<u>टेक्निकल स्कूल</u> :– सन १९०३ साली उदयोग धंद्याच्या शिक्षणासाठी टेक्निकल स्कूल स्थापन केले. त्यात निरनिराळ्या सुधारित धंदेशिक्षणाची सोय केली. या स्कूलसाठी भव्य इमारत व भरपूर साहित्य तसेच तंत्र शिक्षक दिले.

<u>मराठा स्टुडंट्स इन्स्टिट्युशन</u> :– १७ एप्रिल १९०४ रोजी हे वसतिगृह निघाले. याला 'मराठा स्टुडंट्स इन्स्टिट्युशन' हे नाव दिले. मोठी इमारत, कायमची मोठी देणगी, जमीन व म्हैशाळकराचे मार्गदर्शन – यामुळे या वसतिगृहाची झपाट्याने वाढ झाली. १०० ते १२५ विद्यार्थी या वसतिगृहात झाले. पुढे या वसतिगृहास 'श्री. शाहू वसतिगृह' हे नाव दिले.

<u>लिंगायत वसतिगृह</u> :– जुलै १९०७ मध्ये रंकाळा तळयाजवळ हे लिंगायत वसतिगृह उघडले. ५० विद्यार्थ्यांचे यात सोयी झाली. या वसतिगृहास वार्षिक देणगी, कायम निधी व इमारत यांचा लाभ महाराजांनी करून दिला. पण या वसतिगृहाची जागा, पुढे चित्रपटगृहास दिल्याने लिंगायत समाजाची दुसरी चांगली जागा रविवार पेठेत जुन्या तुरुंगाजवळ राजाराम छत्रपतींनी दिली त्याशिवाय लिंगायत धर्मगुरू मठातही या विद्यार्थ्यांची सोय झाली.

<u>मुस्लीम वसतिगृह</u> :– सन १९०२ साली महाराजांनी मुसलमानांसाठी हे वसतीगृह उघडण्याचे आश्वासन दिले होते या साली बोर्डिंग स्थापन करण्याच्या उद्देशांने महाराजांनी या समाजातील ८–१० विद्यार्थीही जमवून ठेवले होते पण या जमातीत योग्य चालक न मिळाल्याने एका मराठा अधिकाऱ्यांच्या देखरेखी खाली या मुस्लीम विद्यायार्थ्याची सोय चार पाच वर्षे अगदी आपलेपणाने मराठा बोर्डिंगमध्ये केली. यानंतर पुढे १९०७ साली हे मुस्लीम वसतीगृह निघाले या वसतिगृहास इमारतीसाठी ५५०० रुपये देणगी, वार्षिक २५० रुपये मदत व इमारतीला मोफत जागा दिली. इमारत झाली. मराठा बोर्डिंगजवळच हे वसतिगृह निघाले. या ठिकाणी १०० विद्यार्थ्यांची सोय झाली.

<u>मिस क्लार्क होस्टेल</u> :– अस्पृश्य मानलेल्या विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाची महाराजांना फार आवश्यकता वाटत होती. हे वसतिगृह महाराजांनी विचारपूर्वक स्थापन केले. अस्पृश्यांत महार, मांग,चांभार, ढोर व भंगी अशा प्रामुख्याने जाती आहेत या जातीसाठी महाराजांनी हे बोर्डिंग काढले. हे बोर्डिंग सप्टेंबर १९०८ मध्ये मुंबईचे गव्हर्नर सर जॉन क्लार्क यांची कन्या कुमारी व्हायोलेट क्लार्क यांच्या स्मरणार्थ – त्यांचे नाव देऊन सुरू केले. सन १९१४ साली याच इमारतीस जोडून दुसरी प्रशस्त इमारत बांधण्यात आली यातील मोठा खर्चाचा वाटा महाराजांनी उचलला. यात ३० विद्यार्थ्यांची सोय झाली परंतु या पाच जमातीचे विद्यार्थी तितकेसे एकमेकात मिसळेनात म्हणून पुढे प्रत्येक जातीचे एक अशी एकूण ५ विद्यार्थी वसतिगृहे महाराजांनी स्थापन करून त्यात जरूर त्या सर्व सोयी उपलब्ध करून दिल्या.

<u>गाव कामगार पाटील स्कुल</u> :– सन १९११ साली गाव कामगार पाटील स्कूल काढले. या स्कूलमध्ये पाटलांना सरकारी कामात हुशार करण्याचा प्रयत्न केला. गावागावांत गावकऱ्यांना सरकारी कारभाराचे शिक्षण देण्याचे कार्य

या स्कूलने केले. गावकामगार पाटलाने लोकशाही पध्दतीने राज्यकारभार करण्याचे शिक्षण देण्याची यात योजना होती. 'दिल्ली दरबार पाटील शाळा' असे या शाळेचे नाव होते. कुलकर्णी — वतन—बंदीची ही पूर्वतयारी होती.
नामदेव वसतिगृह :— शिपी समाजातील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी वसतिगृह स्थापन करण्यात आले हे नामदेव समाज वसतिगृह होय.
प्रभू वसतिगृह :— १९१५ साली प्रभू जातीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी वसतिगृह स्थापन केले.
सारस्वत वसतिगृह :— गौड सारस्वत व शेणवी वगैरे समाजासाठी शालेय शिक्षणांची सोय व्हावी म्हणून त्या समाजासाठी इमारती बांधून दिल्या.
तलाठी स्कूल :— सन १९१९ साली तलाठी शिक्षणाची सोय केली. कुलकर्ण्याकडील गावगन्ना चावडीतील दप्तरचे काम तलाठयाकडे दिल्याने त्यांना दप्तरची माहिती व्हावी, तसेच खेडुत लोकांत धार्मिक व सामाजिक जागृती व्हावी म्हणून या तलाठी स्कूलमध्ये ही माहिती दिली जात होती. या तलाठयांमध्ये बहुजन समाजातले — मागासलेल्यांतले लोक शिक्षण घेऊन तयार झाले या शिक्षणासाठी सत्यशोधक समाज व आर्य समाजाने फार मोठे सहकार्य केले.
ख्रिश्चन मिशन :—ख्रिश्चन विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महाराजांनी पुष्कळ जागा व इमारती बांधून दिल्या.
तपोवन आश्रम व विद्यापीठ हायस्कूल :— सन १९१७ साली जुन्या राजवाडयानजिक विद्यापीठ हायस्कूल सुरू केले. शिवाय तपोवन आश्रम हल्लीच्या कळंबा तुरूंगाजवळ सुरू करून ४८ एकर जमिन चालकांच्या ताब्यात देवून चारित्र्यसंपन्न नागरिक तयार करण्याचे काम या दोन्ही संस्थांकडे सोपविण्यात आले. थिऑसॉफीचे शिक्षण या संस्थातून दिले जावे अशी शाहू महाराजांची इच्छा होती.
छत्रपती संस्कृत विद्यालय :— हे जुन्या राजवाडयात सुरू केले कोणत्याही जातीच्या स्त्री—पुरूषांना या विद्यालयात मोफत शिक्षणांची सोय होती.
इंदुमती वसतिगृह :— चर्मकार जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी हे वसतिगृह उघडले. त्यासाठी ३०९० रूपये देणगी व वार्षिक मदत सुरू केली.
शिवाजी मराठा हायस्कूल :— सन १९१८ साली पुणे येथे महाराजांनी 'शिवाजी मराठा हायस्कूल' सुरू केले.
श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय :— कोल्हापूर येथे सन १९१९ साली हे विद्यालय सुरू केले.
प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग :— सन १९२० साली हे वसतिगृह सुरू झाले. यात बहुजन समाजातील अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला. शिवाजी पेठ व गुरूकुलाजवळ (मंगळवार पेठ) या संस्थेच्या भव्य इमारती आहेत. हे शहरातील सर्वांत मोठे वसतिगृह आहे.

याशिवाय कोल्हापूराबाहेर १) सन १९२० साली पुणे येथे 'ताराबाई वसतिगृह' २) अहमदनगर येथे चौथे 'शिवाजी महाराज विद्यार्थी वसतिगृह' ३) नाशिक येथे 'उदोजी विद्यार्थी वसतिगृह' व 'वंजारी समाज विद्यार्थी वसतिगृह' या संस्था स्थापण्यासाठी महाराजांनी हातभार लावला.

सन १९२१ साली शिवछत्रपतींनी गुरूस्थानी मानलेले श्री. मौनी महाराज यांचे पाटगांव (गारगोटी) येथे एक पुरातन धर्मपीठ होते. त्या पीठास क्षात्रजगद्गुरूपीठ असे नाव दिले . या पीठाधिकाऱ्यांनी मराठा व तत्सम जातींमध्ये धार्मिक शिक्षणाचा व पुरोहित शिक्षणांचा प्रसार करण्याची योजना तयार केली. आर्य समाज गुरूकुल व आर्यसमाजामार्फत शिक्षणप्रसार व सत्यशोधन समाजाचे सामाजिक व धार्मिक शैक्षणिक कार्य यासंबंधीची माहिती यापूर्वी आलीच आहे. याशिवाय आणखी 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर पद्माळा' यांची उभारणी राधाकृष्ण मंदिरात केली २) जिनगर, करजगार वगैरे कलावंत जातीसाठी 'कलागृह' स्थापन केले व त्यास आर्थिकदृष्टया उत्तेजन दिले. पुढे या जातिजमातींची शैक्षणिक उन्नती व्हावी म्हणून कोल्हापूर शहरात विद्यार्थी वसतिगृहास मोफत जागा दिली व इमारतीस आर्थिक मदत दिली याशिवाय गोसावी, मांगगारूडी, व कंजारभाट वगैरे जमातींना जरूर त्या शैक्षणिक सवलती दिल्या व या पददलित जमातींची उन्नती केली.

## नोकऱ्यांत बहुजन समाजाला योग्य स्थान

शाहू महाराजांनी भिन्न भिन्न जाती — जमातींची वसतिगृहे अमलात आणली. याचा परिणाम कोल्हापुरातच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्रावर झाला. संस्थानात पदवीधरांची उणीव दूर करणे व राज्यकारभारातील एका विशिष्ट वर्गाच्या वर्चस्वाला आळा घालणे, या महाराजांच्या सामाजिक समतोलाच्या धोरणाला बरेचसे यश आले. सन १८९४ साली महाराजांचा जेव्हा राज्यारोहण सभारंभ झाला, तेव्हा संस्थानात नोकऱ्यांची स्थिती कशी होती व नंतर विविध शैक्षणिक संस्थामुळे ती कशी सुधारली, याची त्रोटक माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन १८९४ साली जनरल खात्यातील ७१ अधिकारी लोकांपैकी ६० ब्राह्मण होते. पुढे १९१२ साली ९५ अधिकारी लोकांपैकी ३५ ब्राह्मण अधिकारी झाले व बाकीचे ५९ ब्राम्हणेतर होते. तसेच खाजगी खात्यात १८९४ साली ४६ ब्राम्हण व ७ ब्राम्हणेतर होते. सन १९२२ साली ब्राम्हणांची संख्या ४३ व ब्राम्हणेतरांची १०९ संख्या झाली यात एक अस्पृश्यही होता.

सन १९०२ मध्ये महाराजांनी मागासलेल्या जातीसाठी शेकडा ५० जागा राखून ठेवाव्यात असा हुकूम काढला वास्तविक मागासलेला वर्ग हा पुढारलेल्या वर्गापेक्षा बहुसंख्य असल्याने त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात नोकऱ्या देणे न्यायाचेच आहे. याहीपेक्षा अधिक जागा मिळविण्यास ते पात्र ठरतात असो.
यापूर्वी समान संधीचा विचार झाला नाही.

सन १८८५ साली कॉंग्रेसची स्थापना झाली. या स्थापनेला कारण कोणते घडले ? तर वरिष्ठ दर्जाच्या नेत्यांना आय.सी.एस. परीक्षेचा अन्याय वाटला ; त्यातून असंतोष निर्माण झाला. अशा स्वरूपाच्या मागण्या मागण्यासाठी कॉंग्रेसची स्थापना झाली. पुढे पुढे ही कॉंग्रेस संस्था जनतेची झाली, हे निराळे, गरीब, अज्ञानी, भारतीय जनतेला निदान प्राथमिक शिक्षणाचा तरी लाभ दिला पाहिजे, याचा मात्र या नेत्यांनी आग्रह धरला नाही. याबद्दल २७ जुलै १९२० च्या हुबळी परिषदेत महाराज म्हणतात,

''आय.सी.एस.ची परीक्षा हिंदुस्थानातही झाली पाहिजे अशी चळवळ सुरू केली व चालू ठेवली, आणि कमिशन नेमून घेतले xxx जर प्राथमिक शिक्षणांची खटपट ते मनापासून करते, तर ज्याप्रमाणे आय.सी.एस. परीक्षेकरिता फंड उभारला, त्याप्रमाणे प्रा.शिक्षणाकरिता फंड उभारून गावोगाव मास्तर पाठवून प्राथमिक शिक्षणास सुरूवात करणे अशक्य होते काय? आय.सी.एस. च्या खटपटीला व कॉलेज स्थापन करण्याला मात्र पैसा भरपूर मिळतो, पण प्राथमिक शिक्षणास मात्र लोकाजवळ पैसा नाही काय? त्या योगाने ब्राम्हणेतरांस फायदा झाला असता, हेच त्यातले इंगित होय!''

नाशिकच्या १५ एप्रिल १९२० च्या कोनशिला समारंभाच्या भाषणात शाहू महाराज म्हणतात, ''रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणांचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे, असे माझे मत आहे. रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विद्याचारसंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर ते थोडया लोकांच्या हाती पडणार व एक स्वदेशी ब्यूरॉक्रसी तयार होणार. या सुशिक्षित ब्यूरॉक्रसीचा कारभार आमच्या ओळखीचा आहे. फार लांब कशाला? मराठयांचा इतिहास पहा. शाहू महाराजांची भूल होऊन पेशव्यास अधिकाधिक सत्ता बळकवण्यास संधी मिळाली. याचा परिणाम छत्रपतींचा कारागृहवास झाला. जातिभेद तीव्र झाले. जातिमत्सर वाढला व अस्पृश्यांस तर गळयात गाडगे व कंबरेस पोतडी बांधून फिरावे लागे. हा प्रसंग कोठेही पुन्हा येणे चांगला नाही. याकरिता अधिकारदान करण्यापूर्वी सर्व लोकांत विद्या — प्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरूर आहे.''

''माझी प्रजा नुसत्या प्राथमिक शिक्षणाने जरी विभूषित झाली तरी मी कोल्हापूरचे राज्य तिच्या स्वाधीन करीन. '' असे उद्गारही महाराजांनी काढले होते.

१९ व्या शतकांच्या मध्यास लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांनी ब्राम्हण वर्गास मोठा दोष दिला आहे. ते म्हणतात,

''ब्राम्हणांनी युक्तीने आपल्या स्वाधीन विद्या ठेवली. इतरांस शिकवू देऊ नये असा धर्म लावून दिला. हल्ली बहुधा सर्व रोजगार ब्राम्हणांनी बळकाविले आहेत. म्हणजे एकीकडे भटांनी धर्म— दुसरीकडे गृहस्थांनी रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकांस आत येऊ देऊ नये, अशी शक्कल केली हाती... आता जर कोणी शूद्र जातीचा कारकून झाला तर सर्व ब्राम्हण लोक त्यांच्याकडे डोळे वटारून पाहतात. त्यांस असे वाटते की, आमचा धर्म लिहिणे पुसणे करावयाचा असून कुणबी आमचा घृत्तीच्छेद करतात.''

## निष्कर्ष —

अशा प्रकारे महाराजांनी सर्व खेडयापाडयात प्राथमिक शाळा काढल्या. सक्तीने सार्वत्रिक व मोफत शिक्षण सुरू केले. अनेक जातिजमातींची वसतिगृहे काढली. सर्व जाती—जमातींच्या लोकांना प्राथमिक पासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व समाजाला विद्यामृताचा घडा खुला केला. 'विद्या दान हेच महादान' हे महाराजांनी आचरणाने खरे करून दाखविले. महाराजांच्या या विशाल नि विविध संस्थामधून महाराजांनी बहुजन समाजाचे अनेक शिल्पकार तयार केले. नोकऱ्यांत खुद्द महाराजांनी या छोटया — मोठया जागा भरण्याचा अधिकार आपणाकडे ठेवला होता.

अशा प्रकारे महाराजांनी बहुजन समाजाची प्रतिष्ठा वाढविली. महाराजांच्या या शैक्षणिक क्रांतीत लोकनेते बाळासाहेब देसाई, एम.एन. अंगडी, एम.पी. पाटील, बी.डी. जत्ती, नामदार कंठी, डी.सी. पावटे यांच्यासारखी अनेक नेतृत्व करणारी मंडळी मोठमोठ्या पदांवर जाऊन विख्यात झाली आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची


| | नांव | ग्रंथकर्ता |
|---|---|---|
| १) | श्रीमच्छत्रपती शाहूमहाराज चरित्र | आ.बा.लठ्ठे |
| २) | बहुजन समाजाचे शिल्पकार | माधवराव बागल |
| ३) | राजर्षी श्रीशाहू छत्रपती यांचे अंतरंग | वा.द. तोफखाने |
| ४) | श्रीशाहू महाराजांच्या आठवणी | माधवराव बागल |
| ५) | कोल्हापूरांचे शाहू छत्रपती (चरित्र व कार्य) | ए.के.घोरपडे |
| ६) | कोल्हापूराचा राज्यकारभार | दा.म.शिर्के |
| ७) | कै.राजर्षी शाहू महाराज यांच्या आठवणी | संपादक द.य.कुरणे |
| ८) | राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ | संपादक –रावसाहेब डी.एस.बन्ने |
| ९) | प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती | व्याख्याने – धनंजय कीर |
| १०) | राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे | संकलन व संपादक शाम एडेकर |


❖❖❖

# पदवी स्तरावरील ग्रामीण कवितेचे अध्यापन (विशेष संदर्भ फ.म. शहाजिंदे यांची कविता)

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव, ता. चाकुर, जि. लातूर
भ्रमणध्वनी ८६९८५५४४०३

## सारांश

फ.म. शहाजिंदे कवितेवर अंत:करणातून कसे प्रेम करतात. हे अध्यापकाने अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या संवेदनशील मनावर बिंबवावे लागते. तेंव्हा त्यांच्या जाणिवेलाही नवे धुमारे फुटून विद्यार्थी अधिक डोळस व चौकस बनत असतो. यासाठी अध्यापक हा कवी प्रकृतीचा असला तर अधिक फलदायी ठरते. सौष्ठवपूर्ण भाषेची देणगी अध्यापकाला असणे आवश्यक असते. त्याशिवाय अध्यापकाला झालेले आकलन विद्यार्थ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवता येणार नाही. उदा. फ.म. शहाजिंदे यांच्या निधर्मी या काव्यसंग्रहातील क्रमांक १ च्या कवितेतील नायक हा धर्माने मुसलमान आहे. तरीही तो हिंदूच्या सणामध्ये सामील होऊन आनंदोत्सव साजरा करत असतो. होळीचा सण साजरा करताना प्रत्येक घरातून गोवऱ्या मागाव्या लागतात. जर दिल्या नाहीत तर त्या चोरतात. अशा हिंदू मित्राबरोबरच गोवऱ्या चोरताना नायकाच्या पाठीमागून हिणवून म्हटले जाते. या लांडयावर टाकारे टाका रंग. लांडया म्हणून नायकाला शिवी देऊन मन दुखवले गेले. या शिव्या नायकाच्या मनात खोल दु:ख, परकेपणा, हरवलेपणा व्यक्त करून कवितेचा रंग गहिरा करून टाकतात. हे अध्यापनातून विद्यार्थ्यांना सांगणे आवश्यक असते. मोहरम साजरा करताना स्वत:ला धार्मिक समजून दुल्ला खेळणाऱ्यांचा हैदोस पाहून कवी म्हणतो, शिटया मारत दुल्ला खेळणाऱ्यांच्या साक्षीत विराजमान झाल्यात पवित्र पीरांच्या ॲबॉर्शनलेल्या पत्रसी मुर्त्या कवी शहाजिंदे यांचे उद्गार वाचकास अंतरंगात डोकावून पाहण्यास भाग पाडतात. हिंदूपेक्षा मुस्लिम जीर्ण चालीरीती अधिक चिकटून आहेत. धर्माधर्माच्या गजबजाटात शहाजिंदे यांची गळचेपी झालेली आहे. केवळ माणूस म्हणून जगू पाहणारा हा कवी कोणत्याही धर्माचा धार्जिणा नाही. क्रमांक ०९, १४, १५, १७ या कवितांमध्ये धार्मिक, सामाजिक जीवनातील विसंगती कधी –कधी नाटयमय रूप धारण करते. हे सारे व्यवहाराच्या तसेच चिंतनाच्या पातळीवर घडते. पोलिस ॲक्शनच्या काळात या लहान मुलांचा जीव वाचावा म्हणून आईने त्याचे कान टोचले होते. तीनवितीचे पोट जगविण्यासाठी खूप तडजोडी कराव्या लागतात. जात विचारल्या बिगर कोणी भाडयाचं घर देत नाही. तर सार्वजनिक व्यथा कवितेच्या कोंदणात बांधताना कवी म्हणतो, तर भाडयाचे घर देत नाहीत जात विचारल्याबिगर नाही टर्मिनशच्या कृष्णमेखीने हातांचे कोपरे ढिले झालेले असतातच घरमालकांना ही नमस्कार करायला या सेक्यूलर देशात जात विचारल्याशिवाय कोणी भाडयाचे घर देत नाही आणि या सेक्यूलर देशात जात विचारल्याशिवाय कोणी भाडयाचे घर देत नाही आणि घरमालकापुढे नमस्कार करून त्याच्या अटी मान्य कराव्या लागतात. जीवन जगत असताना दैनंदिन व्यवहारात भेडसावणाऱ्या अमानुष घटनांचा उल्लेख कवी मातीच्या तटस्थतेने करतो. ही तटस्थता इतक्या अंतरंग, बहिरंगात डहूळलेली आहे की, तिचा अन्वय लावताना गुंत्याचे जाळेच आपल्या हाती येते. ओढून कातडी डोळयावर, मनाला घालावा आवर मग करावा वावर सर्वदूर कुठेही होईल तेवढं करावं मिळेल तेवढं घ्यावं खुशाल मुतत रहावं जिनगानीवर शहाजिंदे हे वारकरी सांप्रदायातील गणिका संत कान्होपात्राच्या कुळातील असल्याने वारकऱ्यांशी असलेला आपला संबंध व मुस्लिम समाजातील असल्याने मुस्लिम समाजाशी संबंध या दोन्ही गोष्टी त्यांना टाळता येत नाहीत. त्यांचे मन परंपरावादी नाही. पण ज्या समाजात ते वावरतात त्यांच्या आजूबाजूचा समाज त्यांची मानसिकता मात्र परंपरावादीच आहे. परंपरा व रूढीना पाळण्यातच माणूस धन्यता मानतो. या प्रव्रत्तीची दखल कवी आपल्या स्वत:च्या आईच्या रूढीप्रिय मानसिकतेतून एका संध्याकाळी या कवितेत घेतात. माझी आई....! अशाच एका संध्याकाळी ........!! बसून घराच्या उंबरठयावर! होती म्हणाली सहज एकदा!! फकीर कुछभी कर मगर! महेबुब सुभानीकी ग्यारवी कर!! आयुष्यांच्या खुंटीला साठगाठी मारूनही आंबलेली अंधश्रध्दा शाबूत ठेवणारी!! माझी आई ....! चार मुलींच्या पाठीवर झालेला मुलगा फकीर नाव ठेऊन सुभानी की ग्यारवी करूँगी असा नवस फेडण्याची संधीसुध्दा अंधश्रध्दाळू मानसिकतेतून सोडायला ती तयार नाही. असा रूढी परंपरांच्या निमित्ताने तिने

अंधश्रध्दाळूपणा जोपासलेला दिसतो. समाजाने उंबरठयावरचे जीणे जगायला भाग पाडले. ज्या समाजाने नाकारले त्याच समाजातील रूढी परंपरांना चिकटून राहत आपल्या आयुष्याची ६० वर्षे काढणाऱ्या आईच्या रूढी व परंपराप्रियतेचे अंधश्रध्दाळूपणाची जाणीव शहाजिंदे यांना आहे. आपण कान्होपात्रेच्या कुळातील असल्याने बेटा, उनसे अपनी सगाई नहीं होती, अपना कुल कान्होपात्रा का कूल है या व्यथेतूनच माणसा माणसातील दरी वाढविणाऱ्या धार्मिक रूढी परंपराविषयी अनास्था त्यांच्या मनात निर्माण कशी झाली आहे हे अध्यापकाने विद्यार्थ्यांना कवितेच्या अध्यापनातून सांगणे आवश्यक आहे. हे अध्यापनातून समाजातील समाजाची मानसिकता वातावरण कवीच्या मनात परंपरेविषयीची अनास्था निर्माण करून जाते हे लक्षात येणार नाही. वास्तवतेची उग्रता, स्वत:च्या जीवनात वाटयाला आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दु:खातून त्यांच्या मनाची वैचारिक बैठक मजबूत होत गेली. मुसलमानांना इथे हिंदूनी कितीही संरक्षण दिले तरी मुसलमानांना असुरक्षितताच आहे असे वाटते आणि मुसलमान इथे कितीही चांगले वागले तरी हिंदूचा त्यावर विश्वास नाही. अशा वातावरणात आपले इतरांसारखे असणारे विचार शहाजिंदे व्यक्त करतात. मी बनावटी सर्व धर्मासारखा! मला सर्व धर्म सारखेच!! माझं राहणं, बोलणं, जगणं, हसणं बनावटी! सर्व जातीसारखच!! मी काय हो, तुमच्यासारखाच!! धर्माने जर मानवता शिकवली तर धर्माला राबविणारे मागे पडून मीही तुमच्यासारखाच अशी मानवतावादाची व्रत्ती बहराला यायला वेळ लागणार नाही. अशी आशाही शहाजिंदे यांना आहे. पण असे होत नाही, कारण माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न करीत असताना तूम्ही धर्मनिरपेक्ष आहोत यापेक्षा तूम्ही धर्मनिरपेक्ष दिसले पाहिजेत. विविधतेत एकता सांभाळणारा देश कवीला अपेक्षीत आहे. कोणतीही कविता शिकविताना अध्यापकाची दृष्टी पूर्वग्रहविरहीत स्वच्छ आणि स्वागतशील असावी लागते. अध्यापकाने त्यांच्या कोणत्याही कवितेचे अध्यापन करताना वाङमयीन दृष्टीने करावे लागते. तरच कवितेचे अंतरंग आणि सौंदर्य विशद होते. आपल्या बुध्दि, भावना संवेदनेच्या सर्व शक्तीनीशी त्यालाच कवितेला सामोरे जावे लागते. आपल्या बुध्दि, भावना संवेदनेच्या सर्व शक्तीनीशी त्यालाच कवितेला सामोरे जावे लागते. कारण कवितेतील चैतन्यमय व्यक्तित्व, स्वत्व, प्राणतत्व खऱ्या अध्यापकाने आधीच ओळखलेले असते. त्यामुळे अध्यापक कवितेच्या बहिरंगापासून थेट तिच्या अंतरंगापर्यंत जात असते कारण न्यूनगंडाने पछाडलेले हे कवी मन मुठल्याही धर्मभोळया समजूतीत अडकत नाही. कारण सगळीकडून धिक्कारल्या गेल्याचे दु:ख त्यांच्या वाटयाला आले आहे. येथे प्रश्न आहे तो जगण्याचा, मानाचा, स्वीकाराचा परंतु त्यांच्यावाटयाला अपमान दु:ख, दुस्वास, धिक्कारच आला आहे. सगळीकडून अशी पशुवत हिनता ज्या ज्या जीवांच्या जीवनात येते त्यांची मने नासतात. दोन्हीकडचा हा पेटता निखारा मोठया दाहकतेने मार्मिकतेने मांडताना कवी सर्व रूढी, परंपरा, सनातन विचार, वृतवैकल्ये जपणारा, नमाज, रोजा त्या सर्वांसह अंधश्रध्दा, जाचक रूढी इत्यादींना आपल्या भावनिक प्रदेशातून हाकलून देतो. त्यांना केवळ शोधायचे आहे. ते लेखणीचे मूळ बीज असणारा माणूस केंद्रस्थानी आहे. हे विद्यार्थ्यांना समजून सांगण्यासाठी दलित कविंच्या कवितांची उदाहरणे देऊन शहाजिंदे यांच्या कविता समजावून सांगता येतात. अशा कवितांचे अध्यापन निष्णात अध्यापकांच्या हाती येते तेंव्हा तिच्या अंतरंगातील अनेक नाजूक पदर हळुवारपणे उकलून दाखवण्यासाठी अध्यापकाला जाणीव समृध्दी आणि आस्वादक शक्ती पणास लावावी लागते. यासाठी अध्यापकाच्या ठिकाणी समग्र जीवनाचाच आस्वाद अशा रसिकतेने आणि उत्कट सौंदर्यवेधी दृष्टीने घेण्याची क्षमता असणे फार महत्वाचे ठरते. जीवनास्वादाच्या वाटचालीतच जीवनास्वाद घेणारी इंद्रिये जाग्रत होतात तेंव्हा भावना, कल्पना, विचारशक्ती या अधिक तरल व तीक्ष्ण होत जातात, त्यातूनच व्यक्तिमत्व सम्रध्द होते. असे सम्रध्द व्यक्तिमत्वच कोणत्याही नव्या अनुभवाला सर्वस्वाने सामोरे जाऊ शकते. ज्याच्या जवळ जीवनास्वाद घेण्याची व्रत्ती व कुवत नाही ती कलास्वाद घेऊ शकणार नाही. असे एका श्रेष्ठ समीक्षकाने म्हटल्याचे उदाहरण अनुराधा पोतदार यांनी दिले आहे. कवितेचा अध्यापक जेंव्हा हा शोध आपल्या विद्यार्थ्यांसाठी आपल्या अध्यापनातून घेतो तेंव्हा त्याची भूमिका यत्किंचितही आग्रही अहंकारी असू नये. जे जाणवले ते अगदी ठामपणे अध्यापनातून मांडणे आवश्यक आहे. हाच अनुभव शहाजिंदे यांच्या आदम, ग्वाही, शेतकरी याही कवितासंग्रहातील कवितांचे अध्यापन कराताना ग्रामीण भागातील धार्मिक विसंगती व सामाजिक विसंगती प्रकट झाल्याचा अनुभव अध्यापन करताना येतो.

## प्रस्तावना

कथा, कादंबरी, नाटक, निबंध, एकांकिका, बखर, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी वाङमय प्रकाराचे अध्यापन पदवी व पदव्युत्तर स्तरावर जोरकसपणे सातत्याने होतच असते. परंतु कवितेचे अध्यापन मात्र इतर गद्य वाङमयापेक्षा वेगळे असावयास हवे. बौध्दिक, मानसिक तयारीबरोबर व्यक्तिमत्वाच्या वेगळया विशेषांचीही गरज

असते. हे अध्यापकाने लक्षात ठेऊन विद्यार्थ्यांसमोर कवितेचे अध्यापन करत असतो. कवितेच्या अध्यापनामध्ये कवितेचा अभ्यास, भावना, कल्पना, भाषा, छंद, लय, ताल, सूर या तिच्या विविध घटकांचा तुलनात्मक विचार तिच्या चांगल्या वाईट गुण दोषांसह परामर्श घेऊन तिच्यात दृग्गोचर होणारे किंवा न होणारे पूर्वसूरींचे संस्कार, जरूरी असते. तरी परंतु रसग्रहण व रसास्वाद घेण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे हा कविता अध्यापनाचा खरा उद्देश आहे. कवीच्या निर्मिती प्रक्रियेप्रमाणेच रसिकांचीही एक आस्वादप्रक्रिया असते. रसास्वाद घेणे म्हणजे कवितेमधील उत्कट भावनेमधून निर्माण होणाऱ्या तिच्या रसात्मक आस्वादपर दृष्टीने तिचे भावसौंदर्य शब्दाशब्दातून उकलून दाखविणे, तिच्यामधली तरल कल्पनाशक्तीची सुंदर स्थळे टिपतानाच ती भावाशयामध्ये कशी व किती मिसळून गेली आहेत,हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणू देणे, कल्पना, अलंकार, प्रतिमा यांच्या कवितेमधील स्थानाचे स्पष्टीकरण करणे, कविता प्रभाव कशी टाकते ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे त्याचबरोबर कवितेतील महत्वाचे संदर्भ, आशय, भावानुभव त्यातील रूपकळा घाट, आकृतीबंध स्वतःच धारण करीत असतो यावर अध्यापकाने अध्यापन करताना भर देणे आवश्यक असते. कवितेचा आस्वाद व्यक्तिगत अनुभूती असली तरीही रसिकाच्या बंद कुपीतील अत्तराचे झाकण काढले की त्याचा सुगंध सगळीकडे दरवळतो. त्याप्रमाणे तरूण विद्यार्थ्यांच्या हृदयाच्या कप्यातील दडलेल्या पाकळया फुलवीत फुलवीत घेतलेला रसास्वाद हा स्व लाही फुलवितो आणि अखंड आनंद देत असतो. पण अध्यापक व विद्यार्थ्यांच्या मनाची जाणीव समृध्दी व अनुभव संपन्नतेवर, संवेदन क्षमतेवर आत्मसात करण्यावर अवलंबून असते. कवितेच्या प्रत्यक्ष निर्मितीचा आनंद हा जीवनातील भाग्यशाली अनुभूती आणि निर्मितीच्या वाटचालीमध्ये एकाच वेळी अपार समाधान आणि शांतता यांचा संमिश्र अनुभव कवी देत आहे. फ.म. शहाजिंदे यांची कविता आत्मनिष्ठ आहे. Poetry is the essence of literature असे म्हटले आहे ते खरेही आहे. जीवनानुभवाचे किंवा उत्कट भावानुभवाचे निखळ सत्वाबरोबर सूचकतेच्या अंतसौंदर्याची प्रचीती शहाजिंदे यांची कविता देते.

## निष्कर्ष

शहाजिंदे यांच्या कवितेची भाषा ही कोणत्याही नियमात बंधनात अडकू शकत नाही. तर मराठवाडयातल्या आम जनतेची ही भाषा आहे. त्यातले राग द्वेष इर्ष्या लोभ स्पष्ट आहेत. ग्रांथिक कृत्रिम भाषा कवीने टाकलेली आहे. या भाषेत ओबडधोबडपणा कलाकुसरीचा अभाव आहे. कलात्मकता नाही प्राप्त अलंकाराची मिरवणूक नाही. प्रश्नांचे काव्यात्मक भाव नाहीत. रांगडेपणा आहे. अर्वाच्यता आहे. हे दोषही अध्यापकाने विद्यार्थ्यांना सांगून शहाजिंदे यांच्या कवितेची भाषा साधी दिसणारी पण गुंतागुंतीची असणारी गद्यप्राय वाटणारी पण उत्कट असणारी दुःख भोगून अधिक समजूतदार झालेली, पण आक्रस्ताळेपणा हेच भांडवल न समजणारी अशी कविता घेऊन साहित्याचा प्रवेश करून प्रवाह शहाजिंदे यांनी मराठीत आणून मराठी वाङमय समृध्द केले आहे. हे अध्यापकाने विद्यार्थ्यासमोर अध्यापन करताना त्यांच्या काव्याची वाङमयीन अभिव्यक्ती व उंची सांगणे आवश्यक आहे. तर विद्यार्थ्यांना शहाजिंदे यांच्या कवितेचे अध्ययन करून रसास्वाद घेण्याची गोडी चाखावी. हे कार्य आपल्या अध्ययनाद्वारे अध्यापकाने करणे अगत्याचे ठरते. या विषयावरील शोधनिबंधाचा आस्वाद घेताना कांही पुढील निष्कर्ष मांडलेले आहेत.

१. कवितेचे मर्म कवितेचा आशय कवितेतील विचाराचे कल्पनांचे भावनांचे पूर्ण मनन चिंतन होण्यासाठी तसेच काव्यसौंदर्याचा खरा साक्षात्कार होण्यासाठी विद्यार्थ्यांना अध्यापकाने केलेल्या अध्यापनाची जरूरी असते.
२. कवितेचे कवितापण नेमके कशात आहे. याची जाणीव अध्यापकाला असावी.
३. कवितेचे रसग्रहण रसास्वाद घेण्यास विषर्थ्यांना मदत करणे. हा कवितेचा अध्यापन करण्याचा खरा उद्देश आहे.
४. कवीच्या अंतरंगात जीवनचरित्राचा अभ्यास अध्यापकाला असेल तर अध्यापन प्रभावी ठरते व कविता विद्यार्थ्यावर अधिक परिणाम करते.
५. कोणतीही वाङमयीन कलाकृती शिकविताना न्यूनगंड अहंकार गर्व आप परभाव नसावा. अध्यापकाची दृष्टी पूर्व ग्रहविरहीत स्वच्छ आणि स्वागतशील असायला हवे.
६. साहित्याचा अभ्यासक असलेल्या अध्यापकास इतर शास्त्राचा तसेच वाङमयप्रकारांचा अभ्यास असावा लागतो.

७. कवितेच्या अध्यापनामध्ये अध्यापनाचा पर्यायाने त्याच्या विद्यार्थ्यांचाही प्रवास बाहेरून आत म्हणजे बाहयांगाकडून अंतरंगाकडे व्हावा कवितेची रचना भाषा शैली, छंद यांचे विवरण करताना अध्यापकाची दृष्टी कवितेमधील प्राणतत्वाकडे म्हणजेच अनुभवाच्या भावनेच्या गाभ्याकडे सदैव स्थिर असावी आणि अखेरीस कवितेचा भावाशयाचा आपले रूप आपला आकृतीबंध कसा सहजपणे धारण करीत असतो हे सांगून काव्यरूपातील आशय व अभिव्यक्तीच्या एकात्मतेवर कवितेच्या अध्यापनाचे शेवटचे टोक गाठावे लागते.

## संदर्भग्रंथ

१. इ.बा.मंचरकर, गुरूवर्य डॉ. दु.का.संत गौरवग्रंथ, प्रकाशक व.दा. वणकुद्रे, ४९५ ई व्यापारी पेठ, शाहूपूरी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८७
२. म.वा. कुंडले, मराठीचे अध्यापन
३. संपा. श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडूलकर, अंजली किर्तने, साहित्यः अध्यापन आणि प्रकार पॉप्युलर प्रकाशन मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८७
४. संपा. दत्तात्रेय पुंडे, वा.पु. गिंडे, वाङमयाचे अध्यापन मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे
५. फ.म.शहाजिंदे, निधर्मी, आंतर भारती प्रकाशन औराद शहाजनी, प्रथमावृत्ती १९९१

❖❖❖

# स्व–सामर्थ्य व आत्मभान यांचा शोध घेणारी कविता महाजन यांची 'ब्र' कादंबरी

प्रा. पाटील मंगला बन्सीलाल
मु. बुपकरी, पो. डामरखेडा
ता. शहादा, जि. नंदुरबार
सी.एच.बी. प्राध्यापक
पूज्य सानेगुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे
स.ई.पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा
Emai : mangala patil1904@gmail.cm Mob. : 8975035088

## सारांश

जीवनात परिवर्तनाला महत्त्व असते. परिवर्तन म्हणजे बदल. प्रत्येक क्षेत्रात बदल हा होत असतो स्त्री जीवनातही काळानुसार बदल अपेक्षित असतो. वेदकाळात स्त्रीजीवन मुक्त होते. गार्गी, मैत्रेयी यांसारख्या वेदांचा अभ्यास करणाया विदूषी या काळात होऊन गेल्या. मध्ययुगीन कालखंडापासून पितृसत्ताक कुटुंबपद्धतीला सुरुवात झाल्यामुळे स्त्रियांचा अभिव्यक्ति स्वातंत्र्यावर बंधने येवू लागली. तरीही महदंबेने धवळ्यांची निर्मिती करून आद्यकवयित्रीचा मान मिळवला, तर वातावरण प्रतिकूल असताना देखील संत जनाबाईसारखी कवयित्री 'स्त्री जन्म म्हणूनि न व्हावे उदास' असा स्वर काढते. तरीही ब्रिटिश राजवटीपूर्वी स्त्रियांना शिक्षणाचा गंधही नव्हता. तिचे क्षेत्र' चूल आणि मूल', 'रांधा वाढा उष्ट काढा' एवढेच मर्यादित होते. मात्र १८४८मध्ये फुल्यांनी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढून स्त्री शिक्षणाची कवाडे खुली केली.मनूने तर स्त्रीला स्वातंत्र्य असू नये असे मत मांडले. ती बालपणासून ते म्हातारपणापर्यंत वडील, भाऊ, पती, मूले या पुरुषांवर अवलंबून असते. या लोकांशिवाय जसे काही जिचे अस्तित्व गौण आहे असे मनुला वाटत असे. म्हणून पुढे डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले.ताराबाई शिंदे या स्त्रीने स्त्री – पुरुष तुलना' (१८८२ )हा ग्रंथ लिहून स्त्रीयांचा परीस्थितीस पुरुष कसे जबाबदार असतात हे प्रतिपादन केले.पुरुषी व्यवस्थेवर आपल्या लिखाणातून हल्ला चढविला तर १८७३ मध्ये साळुबाई तांबवेकर या स्त्रीने 'चंद्रप्रभाविरहवर्णन' नावाची कादंबरी लिहिली. ही स्त्रीने लिहिलेली पहिली कादंबरी मानली जाते.

वरील सर्व घटना या स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणा–या होत्या ही परिवर्तनाची नांदी होती पुढे १९६०नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी साहित्यातून स्त्रिया कथा, कविता, नाटक, कादंबरी, आत्मचरित्र च्या रुपाने आपले विचार, समस्या मांडू लागल्या मात्र त्यांच्या लेखणीला ख–या अर्थाने धार १९७५ नंतर आली.

१९७५ नंतर सर्वत्र स्त्रीमुक्तीचे वारे वाहूग लागले हर्जिनिया वुल्फ (इंग्रजी लेखिका) व सिमॉन–दि–बोव्हा या पाश्चात्य लेखिकांनी स्त्रीवादाचा जोरदार पुरस्कार केला. सिमॉन – दि– बोव्हा म्हणते की, ''बाई म्हणून कुणी जन्माला येत नाही नंतर तिला बाई बनवलं जाते''.

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला आपल्या सत्वाचा, आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ कळणे, तिचे हक्क कळणे, तिच्यावर होणा–या अन्यायाची जाणीव होणे'' या गोष्टी स्त्रीवादात येतात. आत्मभान म्हणजे आत्मजाणिव जागृत होऊन स्व – सामर्थ्याचा बळावर समोर येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीला, अन्यायाला तोंड देत दुसऱ्यांना प्रेरणादायी ठरेल अशी वाट निवडणे होय.१९७५ हे वर्ष 'आतरराष्ट्रीय महिला वर्ष 'म्हणून साजरे झाले त्याचप्रमाणे ८ मार्च हा दिवस आजदेखील 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा केला जातो यामुळे स्त्रीवादी साहित्यासाठी व्यासपीठ तयार झाले.

१९७५ नंतर ज्योत्सना देवधर, निर्मला देशपांडे , गौरी देशपांडे , सानिया , अंबिका सरकार, मेघना पेठे , शांता गोखले , कविता महाजन यासारख्या लेखिकांनी कादंब–यांमधून स्त्रीयांचा समस्या व आत्मभान मांडण्याचा प्रयत्न केला. ज्योत्सना देवधरांनी आपल्या 'एक श्वास आणखी' व 'उणे एक' या कादंब–यातून स्त्रीजीवनातील दु:ख व आत्मजाणिव व्यक्त केली निर्मला देशपांडेची 'कथा एका बकुळची' (१९९२) ही एक लक्षणीय कादंबरी मानली जाते. कुटुंबातील सुखासाठी नेहमी स्त्रीनेच का बळी जायचे? असा प्रश्न नायिकेला पडतो व त्यातून ती

स्त्रीमुक्तीची वाट शोधते. सुमती क्षेत्रमाडेंची 'वृंदा' ही कादंबरी विधवा विवाहाचा प्रश्न मांडून वाचकांचे लक्ष वेधून घेते स्त्रीने आजच्या काळात प्रत्येक बाबतीत स्वावलंबी असले पाहिजे हा विचार ही कादंबरी देते त्याचप्रमाणे 'रीटा वेलिणकर' (१९९०) ही शांता गोखले यांची कादंबरी साळवी या विवाहित पुरुषाकडून फसविले गेल्यानंतर अविवाहीत रीटा कश्यापध्दतीने स्वत:ला सावरत साळवीशिवाय स्वत:चे असे एक वेगळे घर निर्माण करते, स्वत:ला कसे सावरायचे ही दृष्टी नायिका आपल्याला देवून जाते.

## प्रस्तावना

१९७५ नंतर स्त्रिया व्यापक अर्थाने लिखाण करू लागल्या. स्त्रियांचा कादंब—यांचा आढावा घेतला तर गौरी देशपांडेंचा 'एकेक पान गळावया' (१९८०), 'करावासातून पत्रे', 'मध्य लटपटीत' या लघुकादंबऱ्यांतील नायिकांची विचारसरणी आधुनिक असल्याचे जाणवते. 'एकेक पान गळावया' मधील राधा ही आई आपल्या नीरजा या मुलीस विवाहित पुरुषाशी लग्नाचा निर्णय विचारपूर्वक घेण्यास सांगते. आई तिला विरोध करीत नाही. तसेच त्यांच्या 'मध्य लटपटीत ' या कादंबरीचा नायिकेला एखादया पुरुषाबरोबर लग्न न करता राहण यात काहीही विशेष वाटत नाही. तर 'कारावासातून पत्रे' या कादंबरीत पत्र लिहिण्याची पध्दत वापरुन आधुनिक, उच्चस्तरीय विश्व असणाया स्त्रियांची मानसिक घुसमट व यातून बाहेर पडून माणूस म्हणून जगण्यासाठी केलेली धडपड याचे चित्रण येते. अंबिका सरकार यांच्या 'एका श्वासाचे अंतर,' (१९९०) आणि 'त्या वर्षी' (२००८) या कादंबऱ्यांमध्ये आधुनिक स्त्री आपल्या संसारिक जीवनात विविध ताणतणावांचा ज्या कुशलतेने सामना करते त्याचे वर्णन येते. सानिया यांच्या 'अवकाश,' 'स्थलांतर' या कादंबऱ्यांतील नायिकाही दु:खी आहेत तरीही त्या प्रत्येक संकटाला धैर्याने तोंड देतात. मेघना पेठेंची 'नीतीचरामी' (२००५) मध्ये प्रसिध्द झालेली कादंबरी देखील एका आगळया वेगळया विषयाला हात घालते. या कादंबरीतील नायिका तडजोड करत संसार करते; पण सर्व सुखासाठी स्वाभिमान बाजूला ठेवणे ती मान्य करीत नाही.

## 'ब्र' कादंबरीतील चौकटीबाहेरचे जीवन जगणाऱ्या स्त्रियांचा जीवनसंघर्ष

'ब्र' ही कविता महाजन यांची (२००५) मध्ये प्रकाशित झालेली पहिलीच कादंबरी अल्पावधीतच लोकप्रिय झाली. 'ब्र' म्हणजे अवाक्षर. निषेधाचा चकार, घरातल्यांविरुद्ध, 'नातेवाईकांविरुद्ध, समाजाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध. 'ब्र' न उच्चारणे ही आपली परंपरा. या परंपरेला न जुमानता 'ब्र' उच्चारणे असे या कादबरीचे खरूप आहे. समाजात स्त्रियांच्या तोंडून' ब्र' उच्चारणे निषिद्ध मानले जाते; पण लेखिकेने 'ब्र' कादंबरी लिहून ब्र उच्चारणाऱ्या सर्व स्त्रियांचे प्रतिनिधित्व केले आहे. प्रत्येक प्रकारचा गुलामगिरीला स्त्रियांनी दिलेले सडेतोड उत्तर म्हणजे' ब्र' ही कादंबरी होय.

'ब्र' ही कादंबरी वास्तववादी वाटते. या कादंबरीत लेखिकेने नायिका प्रफुल्ला व आदिवासी स्त्रियांचा असा दुहेरी संघर्ष दाखविला आहे. या कादंबरीची नायिका प्रफुल्ला ही सर्व साधारण गृहिणी आहे. पतीचा लाथा बुक्क्यांचा मार सहन करुन ती मन मारून जीवन जगत असते. तिला बिट्टु नावाचा एक मुलगा आहे पण तोही बापासारखाच आहे.पतीला ती आवडत नाही म्हणून तिला तो घटस्फोट देतो.नव—याने सोडल्यानंतर सैरभैर झालेली प्रफुल्ला 'प्रगत' नावाच्या एका स्वयंसेवी संस्थेत अहवाल लेखनाचे काम करण्यासाठी लागते. या संस्थेत सुमेध हा आधिकारी असतो. १९९२ मध्ये ७३व्या घटनादुरूस्तीनंतर स्थानिक खराज्य संस्थांमध्ये स्त्रियांसांठी राखीव जागा निर्माण झाल्या. पुढे महिलांना ३० टक्के आरक्षण मिळाले व ग्रामपंचायतीवर अनेक आदिवासी स्त्रिया निवडून आल्या. काही सरपंच झाल्या. मात्र या महिला सरपंचांवर मोठया प्रमाणात अविश्वासाचे ठराव दाखल झाले त्यांना राजीनामा दयावा लागला. या संदर्भात वस्तुस्थितीची पाहणी करून अहवाल लेखन करण्याचे काम प्रफुल्लेकडे सोपविले जाते. चौकटीबाहेरचे जीवन जगत ती महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील आदिवासी पाडयांना भेटी देते. तेथील अन्यायग्रस्त स्त्रियांचा व्यथा जाणून घेते. त्यांच्या दु:खाशी एकरूप होते कणखर जीवन ती जगू लागते. म्हणून स्वार्थापोटी परत आपल्याजवळ आलेल्या बिट्टुला म्हणजे स्वत:चा मुलाला ती बाहेरचा रस्ता दाखविते. तिला जसा सुमेधसारखा समाजसेवेला व्यवसाय समजणारा दांभिक व्यक्ती भेटतो तश्याच एंजला व डॉ. दयाळ यांसारखे सच्चे समाजसेवकही भेटतात. डॉ. दयाळांशी जवळीक साधु पाहणाया आपल्या मनाला ती आवर घालते. कोणत्याही मोहपाशात ती अडकत नाही. यातून तिची परिपक्वता लक्षात येते. सुमेधचा दांभिकपणा लक्षात आल्यावरही ती शांतपणे अहवाल लेखेनाचे कार्य करते. व शेवटी राजीनामा देते असा हा तिचा संघर्षाचा प्रवास व प्रगतीचा आलेख उंचावणारा असा आहे.

कादंबरीतील दुसरा संघर्ष हा राजकीय जीवनात कार्यरत असणाया आदिवासी स्त्रियांचा आहे. या स्त्रिया शरणागती न पत्करता राजकीय, सामाजिक अधिकार मिळविण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष प्रशंसनीय आहे. अनेक आदिवासी स्त्रिया ग्रामपंचायतीत काम करू लागल्या. त्यांच्याकडे क्षमता असतानाही तथाकथित लोकांकडून त्यांना या सगळयांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला गेला सरपंच झालेल्या स्त्रीला बसायला खुर्ची न देणे, गावचावडीवरून स्त्रीने अनवाणी जाणे, मिटिंगला न बसू देणे, सहीसाठी रजिस्टर घरी पाठवणे. यासारखे प्रकार करूनही स्त्री ऐकत नसेल त्या स्त्रीची  बदनामी केली जाते. घरच्या लोकांचे किंवा नवऱ्याचे कान भरून तिला मारहाण केली जाते किंवा हातपाय तोडले जातात. कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे वागणाऱ्या स्त्रियांनाच बहुतेक ठिकाणी राजकारणात घेतले जाते. हे सत्य लेखिकेने या कादंबरीतून निदर्शनास आणून दिले आहे.

या कादंबरीतील नायिका ३७ जिल्ह्यांमधील ४७ आदिवासी वस्त्यांना भेट देते. स्त्रियांच्या भाऊ, नवऱ्याकडून छळाच्या करूण कहाण्या येतात. तरीही सीताबाईसारखी खंबीर स्त्री झेंडावंदनाला हजर राहण्याचा निश्चय करते, सरपंचपद गमावलेली कडूबाई हार मानत नाही, चोन्नी या आदिवासी स्त्रीवर कधीही अविश्वासाचा ठराव येण्याची शक्यता असते तरीही या स्त्रिया व्यवस्थेला न घाबरता 'ब्र' उच्चारण्याचे धाडस दाखवतात. शेवटी प्रफुल्ला प्रगत संस्थेचा राजीनामा देते व स्वतंत्रपणे महाराष्ट्र-आंध्रचा सीमेवरील सातटेकडी या राजकारणी आणि नक्षलवादी यांचा त्रास असलेल्या खेड्यात सेवा करण्याचे ठरविते तेही स्वत:चा हिंमतीवर.

## समारोप

अशाप्रकारे स्त्रीलिखित कादंबऱ्या स्वत:चे एक आगळेवेगळे स्थान मराठी साहित्यात निर्माण करतात. स्त्रियांच्या समस्या ज्या प्रकारे या कादंबरीतून व्यक्त झालेल्या आहेत त्याचप्रमाणे त्यांचे स्वसामर्थ्य, आत्मभान चौकटी बाहेर जावून जीवन जगणे या गोष्टी ही वाचकाचा मनाचा ठाव घेतात. कविता महाजन यांची 'ब्र' ही कादंबरी वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडते. कादंबरीचे शीर्षक व आशय हा अतिशय वेगळा आहे. नायिकेचा व आदिवासी स्त्रियांचा संघर्ष वाचकस्त्रियांना नक्कीच प्रेरणा देईल यात तिळमात्रही शंका नाही. म्हणून लेखिकेने ज्यांना ज्यांना 'ब्र' उच्चारता आला त्या सर्व जिभांना ही कादंबरी अर्पण केलेली आहे. रडत कुढत न जगत समर्थपणे जगणाऱ्या या स्त्रिया वाचकांचा हृदयात स्वत:चे एक विशिष्ट स्थान निर्माण करतात हेच या कादंबरीचे यश मानावे लागेल.

## निष्कर्ष

१) नवऱ्याने घटस्फोट दिलेली प्रफुल्ला ही गृहिणी व कादंबरीतील नायिका प्रवाहाच्या विरुध्द जाऊन स्वत:चे एक आगळे वेगळे स्थान निर्माण करते.

२) कादंबरीतील नायिका परिस्थितीवर मात करीत पत्नी, आई हे सर्व मायापाश बाजूला सारीत आदिवासी स्त्रियांची दु:ख समजून घेत यशस्वी जीवन जगते.

३) प्रतिकूल परीस्थितीतही ती स्वत:चा तोल सांभाळते.

४) चौकटीबाहेर जाऊन जगण्याचे व 'ब्र' उच्चारण्याचे सामर्थ्य नायिकेमध्ये व आदिवासी स्त्रियांमध्ये दिसते.

५) नायिका स्वसामर्थ्याच्या बळावर समाजसेवेचे आव्हानात्मक कार्य हाती घेते.

## संदर्भ ग्रंथ

१) ढेरे अरुणा, 'स्त्री लिखित मराठी कांदबरी', पघगंथा प्रकाशन, पुणे.

२) डॉ. फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका – चिंता आणि चिंतन' , श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०.

३) डॉ. महाजन वंदना, 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य' , विजय प्रकाशन, नागपूर.

४) महाजन कविता, 'ब्र' कांदबरी, राजहंस प्रकाशन', पुणे.

❖❖❖

# विद्यार्थी कल्याणकारी शिक्षण

प्रा. अंशुमती भा. पेंडोखरे
(मराठी विभाग प्रमुख)
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती मो.नं. ९४२३६०९३९६

प्रस्तावना

*शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रगटीकरण. (१)*

*स्वामी विवेकानंद*

महात्मा ज्योतीबा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते व म्हणून सर्व दु:खाचे निवारण करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण अशी त्यांची श्रध्दा होती. अज्ञान म्हणजे अंधार व ज्ञान म्हणजे प्रकाश असे महात्मा ज्योतीबा फुले म्हणत. समाजातील अंधश्रध्दा, वाईट परंपरा, बुरसटलेले विचार, अनिष्ठ चालीरिती हे अंधाराचे प्रतिक होय या गोष्टीचा त्याग करून माणसाच्या अंगी योग्यअयोग्य, चांगले वाईट समजण्याची पात्रता शिक्षणामुळेच येते व मानवी जीवन सुखी व समृध्द होऊ शकते, त्यांचा भ्रमनिरास होवून त्यांना दृष्टी प्राप्त होवू शकते. मनुष्याला प्रकाशाकडे नेण्याचे कार्य शिक्षणच करू शकते. माणसाला गतिमान करण्याचे, समाज परिवर्तन करण्याचे प्रमुख साधन शिक्षण होय. मानवाला स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता, आपले हक्क व कर्तव्ये त्याचबरोबर जबाबदाऱ्या यांचीही जाणीव शिक्षणामुळे होऊ शकते हे जाणून स्त्रियांसाठी, पददलितांच्या विकासासाठी, शेतकरी व कामकरी यांच्या समृध्दीसाठी शिक्षण आवश्यक आहे.

भारतीय शिक्षणाची कोणतीही समस्या सोडविण्यासाठी अत्यंत आवश्यक गोष्ट म्हणजे शिक्षकाच्या दैनिक सामान्य कार्याचा अनुभव, आणि त्यासाठी एक सगळयात मोठा आणि अत्यंत आवश्यक गुण अंगी असणे जरुरी आहे, आणि तो म्हणजे शिष्याच्या दृष्टीतून जगाकडे मग ते एक क्षण भरच का होईना पाहण्याची शक्ती शिक्षणशास्त्राच्या प्रत्येक सिध्दांतातून हेच सत्य प्रतिपादीत केले गेले आहे. शिष्याच्या आकांक्षाच्या विरोधी शिक्षण देणे म्हणजे यशा ऐवजी अपयशच पदरी घेणे होय. (२) स्वामी विवेकानंद

शिक्षणाचे मूळ जरी कडू असले तरी त्याची फळे मात्र गोड आहेत. आधुनिक युगात शिक्षणाचा एकीकडे प्रचंड प्रमाणात उत्तुंग पर्वताप्रमाणे झालेला विकास तर दुसरीकडे अज्ञानाची खोल दरी ही दोन्ही चित्रे दिसतात. मानवी कल्याण साधावयाचे तर शिक्षणालाच अग्रस्थान द्यावे लागते, कुटुंब, समाज व राष्ट्र सुधारण्याकरीता शिक्षणाचा विकास होणे अत्यावश्यक आहे.

## विद्यार्थ्यांची ढासळती उपस्थिती

आज शाळा आणि महाविद्यालयाचे प्रत्यक्ष दृश्य बघितल्यानंतर असे दिसते की फक्त निर्जीव इमारती आणि त्यात विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी नेमलेले शिक्षक प्राध्यापक दिसतात. ज्यांच्यासाठी हे ज्ञानाचे मंदिर उभे आहे तोच विद्यार्थी वर्ग अतिशय कमी प्रमाणात या ज्ञानमंदिरात उपस्थित असतांना दिसतो. आजच्या विद्यार्थ्यांत गुणात्मकता ही कमी होत असून त्याची कागदोपत्री संख्यात्मकता वाढविली जात आहे. विद्यार्थी वर्गात अनुपस्थित असण्याचे अनेक कारणे आहेत.

कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक वातावरण, महाविद्यालयीन वातावरण, बेकारी, दारिद्र्य ह्या सर्व बाबी विद्यार्थ्यांची अधोगती घडवून आणतात. महात्मा गांधी यांनी असे म्हटले आहे की, आजच्या विद्यार्थ्यांच्या खांद्यावर उद्याच्या राष्ट्राचे ओझे आहे. विद्यार्थी हाच देशाचा आधारस्तंभ आहे तोच कुचकामी ठरला, तर देश कोसळण्यास वेळ लागणार नाही. वर्गात विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा दर खालावत आहे याचे कारण विद्यार्थ्यांना पाहिजे तेवढ्या सोई उपलब्ध नसतात.

भारतातील प्राचीन शिक्षण पध्दती आधुनिक शिक्षण पध्दतीपेक्षा अगदी भिन्न होती. विद्यार्थ्यांना मोबदल्यात काही द्यावे लागत नसे. ज्ञान हे इतके पवित्र समजले जाई की त्याचा विक्रय कोणालाही अयोग्यच वाटे. ज्ञान अगदी मुक्तहस्ताने व विनामूल्य देणे योग्य, आचार्य कोणत्याही हेतूशिवाय विद्यार्थ्यांचा स्विकार करीत, एवढेच नव्हे तर बहुतेक आचार्य आपल्या विद्यार्थ्यांना अन्न वस्त्रही पुरवीत. या यांच्या निर्वाहाकरीता धनी लोक त्यांना दान देत.

आळस, परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढण्यास व मनुष्याच्या अंगीचे सदगुण वाढण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर, विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा असे दोघेही या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. व्यक्तीच्या जीवनाला हेतू हवा. हेतू नसेल तर ते जिणे व्यर्थ. या हेतूचे दुसरे नाव आहे निष्ठा. माणसाची कुठल्यातरी तत्वावर, मुल्यावर, ध्येयावर विद्यार्थ्यांची निष्ठा हवी. विद्यार्थ्यांची निष्ठा समाजावर हवी. समाजासाठी त्यांना काहीतरी करायचं अहे. विद्या, धन, कला इत्यादी जे काही त्यांनी मिळविले आहे ते त्यांनी समाजाला समर्पण करायचे आहे. विद्यार्थ्यांनी सामाजिक सदाचाराची बीजे मनात रुजवून ठेवावी अनुकूल परिस्थिती निर्माण करीत रहावे. एक दिवस त्या बीजांना नक्की अंकुर फुटतील व स्वत:चे तसे समाजाचे जीवन पानाफुलांनी बहरेल.

सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या बौद्धिक दर्जाची वाढ आणि त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार या गोष्टीवरच राष्ट्राची प्रगती अवलंबून असते. काही मूठभर लोकांनी साऱ्या देशातील बुध्दीचा व शिक्षणाचा मक्ता घेतल्या कारणानेच भारताचे अध:पात झाले. विद्यार्थी म्हणजे मातीचा ओला गोळा त्याला जसा कलात्मक आकार द्यावा, त्यांच्यावर जसे संस्कार करावे तसेच विद्यार्थ्यांचे जीवन घडत असते. विद्यार्थ्यांवर संस्कार करणार अध्यापक हाच बुद्धिमान, कलागुणांनी परिपुर्ण असला तरच विद्यार्थी काहीतरी बनेल.

वास्तविक शिक्षण पध्दती आणि शिक्षणाचे उदिदष्टे बदल्याशिवाय शिक्षकाची भूमिका, विद्यार्थ्यांकडे आणि समाजाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी बदलणार नाही. उदिदष्टांसाठी जेव्हा शिक्षक व विद्यार्थी जाणीवपूर्वक एकत्रित येतील तेव्हाच त्यांच्या परस्पर संबंधातून महाविद्यालयात आणि विद्यापीठात चैतन्यमय वातावरण निर्माण होऊ शकेल.

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना आवड निर्माण करण्याकरिता सभोवतालच्या समाजाशी नाते जोडण्यासाठी आणि त्यांच्या गरजांचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनांसारख्या उपक्रमात विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापकांनाचाही सहवास आवश्यक आहे अशा प्रकरणाच्या सहवासातुन विद्यार्थ्यांशी, सभोवतालच्या वातावरणाशी आणि समाजाच्या प्रश्नांशी शिक्षकांचे अधिक जवळचे संबंध प्रस्थापित होतील. शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या अशा सहवासातून, सहकार्यातून व सहभागातून शिक्षणाच्या सामाजिक अंगाचा विकास होऊ शकेल आणि त्याचे सामाजिक संदर्भ समृध्द होतील.

राष्ट्राच्या घडणीत शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे भावी राष्ट्राचे आधारस्तंभ असलेल्या मुलांना आकार देण्याचे महत्वपुर्ण कार्य शिक्षकच करीत असतो. शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाचे संस्कार मुलांच्या मनावर होत असतात. म्हणून समाज जीवनात वावरत असतांना शिक्षकांना अनेक पथ्ये पाळणे आवश्यक असते. परंतु आजकाल काही शिक्षकाच्या व पालकाच्या निष्काळजीपणामुळे आणि दुर्व्यसानामुळे विद्यार्थ्यांवरही विपरीत परिणाम होतो. याबददल संत तुकडोजी महाराज म्हणतात,

मुलास म्हणे सदवर्तनी राहा
आपण बिडी पिण्यात वाजवी दहा
मग उष्णतेने बोलतो पहा
साजरा रेलगाडी परी

अशाप्रकारे वडीलधारी मंडळीचे मुलांवर कोणते संस्कार होणार? शिक्षकाने आपली जबाबदारी ओळखून आचरण ठेवून कार्य केले तर गावाचा स्वर्ग सहजच होऊ शकतो. शिक्षणाच्या माध्यमातून मुलांवर लहानपणापासुनच उत्तम संस्कार झाले तर त्यांच्यातूनच पुढे ज्ञानेश्वर, रवींद्रनाथ टागोर, शिवाजी इ. सारखे थोर पुरुष निर्माण होऊ शकतात.

दुसऱ्यास सांगे ब्रम्हज्ञान, स्वत: कोरडे पाषाण अशी अध्यापकांची स्थिती नसावी. त्याला आपल्या ज्ञानमंदिरा विषयी आस्था वाटावी. आपुलकिच्या भावनेने विद्यार्थी चांगल्या दर्जाचे ज्ञान प्राप्त करु शकेल इ. नुसती नोकरी मिळविणेच शिक्षणाचे उद्दिष्ट नसले पाहिजे. शिक्षणाचा खरा उद्देश म्हणजे व्यक्तींचा सर्वांगिण विकास करणे होय. शासनाच्या योजना प्रत्यक्ष विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतांना कितीतरी दलाल या शिक्षण क्षेत्रात हस्तक्षेप करत असतात. विद्यार्थ्यांच्या मनातील ज्ञानाच्या आशेचा जळून खाक झालेला मनोवृक्ष विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीला सर्वात जास्त कारणीभूत आहे. विद्या हे फार मोठे बळ असुन सुद्धा भविष्यकाळातील निराशेमुळे विद्येचे बळ प्राप्त करण्याची आकांक्षा विद्यार्थी वर्गात राहिली नाही. विद्यार्थी याचा अर्थ विद्या अधिक अर्थी अर्थी म्हणजे विद्येचे अर्थाजन करणारा, ज्ञानाची इच्छा करणारा, ज्ञानाची आकांक्षा करणारा, उपासना करणारा. शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, व्यवस्थापक यांची असलेली हुकूमशाही काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीला कारणीभूत आहे.

आजच्या आधुनिक काळात मिळणारे पुस्तकी शिक्षण विद्यार्थ्यांना स्वत:चे पोट भरण्यास व जीवन उभे करण्यास काही प्रमाणात असमर्थ आहे.

कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती आपल्या मुलांवर पाहिजे तेवढ्या प्रमाणात नियंत्रण ठेवत नाही. हम दो हमारे दो च्या जमान्यात मुलांचे अतिशय लाड पुरविले जातात. त्यामुळे अशा श्रीमंत बापाच्या मुलांना अध्यापकांनी बोललेले वडिलांना व मुलांना सहन होत नाही त्यामुळे ही लाडावलेली मुले पुढे कोणाचेही नियंत्रण स्विकारत नाहीत व वाटेल त्या पद्धतीने ते वागू लागतात. अशी मुले महाविद्यालयात सतत अनुपस्थित राहतात त्यांच्यातील असलेले दोष दाखविण्यास कुणीच नसतो. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास खुंटतो. महात्मा जोतीराव फुले आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. न्याय व समता यावर आधारलेली आदर्श समाजरचना अस्तित्वात आणण्याचा ध्येयवाद त्यांनी अंगीकारला होता. ज्ञान ही एक शक्ती आहे. शिक्षण हे सर्वांगिण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे. पाश्चात्य देशातील लोकांनी आधुनिक युगात जी आश्चर्यजनक प्रगती केली. त्याचे मुळ त्यांच्या ज्ञानोपासनेत आहे. नव्या राजवटीत शेतकऱ्यांची हलाखी व दुर्बलता जशीच्या तशीच टिकून आहे याचे कारण अज्ञान व अशिक्षितपणा, त्यांच्या पिढ्यान्पिढ्याच्या प्रेरणा शून्य जीवनाच्या ठराविक चाकोरीतून बाहेर काढण्यासाठी धार्मिक, सामाजिक व आर्थिक गुलामगिरीतून त्यांची मुक्तता करायची असेल तर शिक्षणाखेरीज दुसरा मार्ग नाही.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे आजही शिक्षणपद्धती ही बहुतांशी शहरी वळणाची आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा काय आहेत त्यांना कोणते शिक्षण देणे सोयीस्कर होईल. आजही बहुसंख्य जनता खेडयात आहे, आणि त्यांचा शेती हा व्यवसाय असल्याकारणाने त्यांची परिस्थिती व त्यांचे अनेक प्रश्न यांचा विचार करुन शिक्षण प्रणालीचा विचार झााला पाहिजे त्यामुळे शिक्षणाचे प्रयोजन, अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, परिक्षापध्दती इ. बाबतीत बदल झाला तरच वर्गातील उपस्थितीचे प्रमाण वाढेल. विद्यार्थ्यांची वर्गातील दिवसेंदिवस ढासळत चाललेली उपस्थिती याला जर काही कारणीभूत असेल तर ते म्हणजे चांगले शिक्षक खेड्यात जायला तयार नसतात त्यामुळे चांगल्या प्रकारच्या अध्यापनाला हे विद्यार्थी मुकतात.

शिक्षकी व्यवसायाकडे आज अर्थाजनाचे साधन म्हणून पाहिले जात आहे. मग वर्गात विद्यार्थी येवोत की न येवोत, विद्यार्थी शिक्षकाचे म्हणणे ऐको की न ऐको त्याकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. परिणामी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर शिक्षणाचा दर्जा सुधारण्याऐवजी खालावलेला दिसतो. शहरी भागात फार मोठ्या प्रमाणात वर्गातील शिक्षणाऐवजी पालक शिकवणी वर्गात शिक्षणाला जास्त महत्त्व देतात. काही शिक्षक वर्गात अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर देत नाही मग विद्यार्थ्यांना शिकवणी शिवाय मार्ग उरत नाही. शिकवणी तर आज फॅशन व प्रतिष्ठा झाली आहे आपल्या पाल्याने किती शिकविण्या लावल्या यावर त्याचा दर्जा ठरविला जातो. व त्यामुळे विद्यार्थी वर्गात उपस्थित राहत नाहीत. शिकविणे ही एक कला आहे ती सर्वांना जमते असे नाही परंतु केवळ उपजिविकेचे साधन म्हणून अनेक लोक नाईलाजास्तव शिक्षण व्यवसायात शिरलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यात विद्यार्थ्यांबद्दल प्रेम, शिकविण्याची तळमळ, ध्येयवाद, समाजसेवा इ. सारख्या गुणांचा अभाव दिसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा उपस्थितीचा दर खालवत आहे.

सर्वच दोष शिक्षकाला देता येणार नाही. शिक्षणसंस्था ज्या सम्राटाच्या हाती आहेत त्यांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे आज शिक्षकाची स्थिती फार बिकट झाली आहे. शिक्षकांना आपले व्यवसाय स्वातंत्र्य मिळत नाही. काही काही शिक्षण संस्था मध्ये शिक्षकाचे आर्थिक शोषण करतांना दिसतात त्यांना अल्पपगार देणे, वेळोवेळी त्याच्या कडून राजकीय कार्ये करुन घेणे यामुळे शिक्षक ज्ञानदाना ऐवजी स्वत:च्या सुरक्षिततेचाच जास्त प्रयत्न करतो तो विद्यार्थ्यांचे भविष्य काय ठरविणार? परिणामी त्यामुळेच वर्गात विद्यार्थ्यांचा उपस्थितीचा दर खालावत आहे. वर्गात शिकविण्याऐवजी विद्यार्थ्यांना शिकविण्या लावण्या वर भर देणारे शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या अवमूल्यनांस जबाबदार आहेत. विद्यार्थी शिक्षणाबद्दल उदासिन आहे याचे कारण म्हणजे जे आज शिक्षण क्षेत्रात सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार हे होय. आज सर्वत्र ऐकायला मिळते की, पैसे देवून गुण वाढविणे, परीक्षेत कॉपी करण्यास प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्याकडून भेटी स्विकारणे यामुळेच विद्यार्थी वर्गात येत नाही व परिणामी त्याचा शिक्षकाबद्दलचा आदर कमी होतो. इंग्रजी व गणित या विषयाची भीती हे कारण सुद्धा वर्गात अनुपस्थितीचे प्रमाण वाढण्याला कारणीभूत आहे.

जन्मोजन्मी न फिटणारे असे समाजातील ऋणाचे ओझे खांद्यावर घेऊन भावी काळात कर्तव्यदक्ष असा समाज परिवर्तन करणारा एकटा आज विद्यार्थीच आहे. त्याच्याच हातात देशक्रांतीची व देश विकासाची ज्वलंत मशाल भडकत आहे. विद्यार्थ्यांच्या सभोवती दिसणारे वातावरण ही जर रंगभूमी मानली तर त्या रंगभूमी वर विद्यार्थ्यांची भूमिका किती महत्त्वपूर्ण व किती प्रगतीची आहे हे निश्चित कळून येईल. या भूमिकेमध्ये विद्यार्थ्यांना

समाजरूपी प्रेक्षकांचे बारकावे, त्यांच्या आवडी–निवडी, त्यांचे विचार, बौद्धिकता, तणाव, आकांत यासारखे गुणदोष आणखी पुष्कळ मनोधैर्य विद्यार्थ्यांने आपल्या कर्तव्यनिष्ठ भूमिकेतून लोकांच्या काळजापर्यंत पोहचतील अशी भूमिका देशाच्या सामाजिक व राजकीय रंगभूमीवर साकार केली पाहिजे. आजच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांने परस्पर ऐक्य, प्रेम आणि आदर हीच त्रिसुत्री मानली पाहिजे तर विद्यार्थ्यांच्या भूमिकेकडे रंगभूमीवरील नाटक लोकमन जागे केल्याशिवाय राहणार नाही.

वाढती मनोरंजनाची साधने व त्या विषयी वाटणारे आकर्षण हे सुध्दा वर्गात विद्यार्थी उपस्थित न राहण्यास कारणीभूत आहे. तारुण्यावस्थेतील विद्यार्थी वर्ग ही सतत आयुष्याचा अमूल्य वेळ व्यर्थ घालवतात. नट नटयांची फॅशन कपडे, बोलणे इ. चे अनुकरण करतात. उत्ताण चित्रे, भडक चित्रे व कथानक यामुळे मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतो व ते विद्यार्थी अशा चित्रपटाच्या नादी लागतात पर्यायाने वर्गात विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीला महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिक परिस्थिती हे आहे. पैशाशिवाय काहीही मिळू शकत नाही. ज्ञान मिळविण्यासाठी पैसा आवश्यक आहे. दारिद्रयामुळे अनेक विद्यार्थी महाविद्यालयात उपस्थित राहू शकत नाही. कारण भारतात दारिद्रय इतके आहे की गरीब विद्यार्थी शाळेत जाण्याऐवजी शेतात राबणाऱ्या आपल्या बापाला कामधंद्यात हातभार लाववण्यास किंवा पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आणखी इतर मार्गानी प्रयत्न करतील अशा अवस्थेत गरीब मुले जर शिक्षण घेऊ शकत नसतील तर शिक्षणानेच त्यांच्याकडे गेले पाहिजे. पर्यायाने वर्गातील उपस्थितीचे प्रमाण वाढेल. दारिद्र्यामुळे पालक मुलांना शैक्षणिक साहित्य देऊ शकत नाही. त्यामुळे ते आर्थिक व मानसिक स्थितीने कंटाळलेले असल्यामुळे महाविद्यालयात उपस्थित राहत नाहीत. त्याच्या समोर प्रथम भाकरीचा प्रश्न असतो व नंतर शिक्षणाचा. शिक्षणाविषयी अज्ञान असल्यामुळे महाविद्यालयात काही पालकांना शिक्षणाचे महत्त्व कळत नाही. मुलींच्या शिक्षणाबद्दल तर ते पूर्णपणे बेफिकीर असतात. मुलींना महाविद्यालयात पाठविणे त्यांना रुढीविरुद्ध वाटते. अशाप्रकारे अज्ञान, अंधश्रद्धा, रुढी ही कारणे सुद्धा विद्यार्थ्यांच्या वर्गातील खालावत चाललेला हा जो काही दर आहे त्यास कारणीभूत आहेत.

अशाप्रकारे संपूर्ण प्राणिमात्रात मनुष्य हा अधिक बुद्धिमान समजल्या जातो. त्याने आपल्या बुद्धीसामर्थ्यांने नवे विश्व निर्माण केले. विश्वात तो एकमेव बोलणारा व विचार करणारा प्राणी आहे. पूर्वी हा मानव भटक्या अवस्थेत होता पण आज त्याने आपल्या बुद्धीसामर्थ्यांच्या जोरावर आजचे विज्ञानयुग निर्माण केले व बुद्धीचा विकास अनेक अनुभवाद्वारे वाढविला. बुद्धीला नवे शिक्षण दिले. शिक्षणानेच खरे परिवर्तन घडवून आणले. हा सगळा बदल घडवून आणण्यास शिक्षणच कारणीभूत आहे. म्हणूनच शिक्षणाचे जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. आणि शेवटी सांगायचे म्हणजे मनुष्य शिक्षणाशिवाय पशूच आहे. मनुष्य बुद्धिमान आहे त्यांच्या मध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण हवे खऱ्या अर्थाने परिवर्तन शिक्षणानेच होऊ शकते. शिक्षणामुळे ज्ञान मिळते व ज्ञानी मनुष्य सर्वत्र पुजिला जातो.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. शिक्षण, स्वामी विवेकानंद: पृष्ठ क्र. २: आवृत्ती ६ वी : १९८५
२. तत्रैव, स्वामी विवेकानंद: पृष्ठ क्र. १: आवृत्ती ६ वी : १९८५
३. तत्रैव, स्वामी विवेकानंद: पृष्ठ क्र. ३१: आवृत्ती ६ वी : १९८५
४. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय, संपादक डॉ. मा. गो. माळी : पृष्ठ क्र. ९७: प्रथम आवृत्ती : १९८८
५. आजचे शिक्षण, स्वप्न आणि वास्तव: डॉ. जनार्दन वाघमारे: पृष्ठ क्र. ६०: प्रथम आवृत्ती : १९९३
६. ग्रामगीता, राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज: पृष्ठ क्र. १७५: आठवी आवृत्ती : १९८६

❖❖❖

# मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीचे भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून विश्लेषण

बालाजी मदन इंगळे
इंद्रायणी नगर, डिग्गी रोड, उमरगा
ता. उमरगा, जि. उस्मानाबाद
मेल आय.डी. balajimingale@gmail.com मो.नं. ९८८१८२३८३३
(एक कादंबरी, तीन कविता संग्रह प्रकाशित, विविध मासिके व वृत्तपत्रातून लेखन, शालेय व विद्यापिठीय अभ्यासक्रमात साहित्याचा समावेश, अध्यक्ष : राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन औरंगाबाद)

## प्रास्ताविक

मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीचे भाषा वैज्ञानिक दृष्टीकोनातून विश्लेषण करणे हे या लेखाचे उद्‌दिष्ट आहे. भाषावैज्ञानिक दृष्टीकोनातून या बोलीचे विश्लेषण करताना या बोलीची स्वनिम व्यवस्था, व्याकरण, शब्दसिध्दी अशा विविध पातळीवर या बोलीचा आढावा घ्यायचा आहे. यामध्ये उच्चार प्रक्रिया, वर्ण प्रक्रिया, लिंगव्यवस्था वचन प्रक्रिया, विभक्ती प्रक्रिया, सामान्यरुप, वाक्य व्यवस्था, क्रियापदे, अर्थव्यवस्था, प्रत्यय प्रक्रिया, व्याकरण व्यवस्था इत्यादी दृष्टीकोनातून या बोलीचा विचार करायचा आहे.

बोली या मौखिक असल्यामुळे बोलीच्या उच्चारणात बदल होत असतात. इतर काही कारणांमुळेही बोलीच्या उच्चारणात फेरबदल होत असतात. ब्राईट विल्यम व ए. के. रामानुज यांनी लिहिलेल्या 'सोशोलिंग्विस्टिक्स : सिलेक्टिव्हरीडिंक्स' पुस्तकात समाविष्ट केलेल्या 'सोश्योलिंग्विस्टिक व्हेरिएशन ॲण्ड लॅग्वेज चेंज' या निबंधाचे भाषांतर करताना विवेक भट आणि मिलिंद मालशे यांनी लिहिले आहे की, ''सामाजिक परिस्थितीनुसार भाषेत होणारी परिवर्तने असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ती परिवर्तने ही बोलणारी, ऐकणारी आणि जिला अनुलक्षुन बोलली जाते ती अशा सर्व व्यक्तिंच्या सामाजिक सत्वाशी निगडीत असतात.'' बोलीतील असे बदल सामान्यत: नकळत असे घडत असतात. असे बदल हे दिर्घकाळ अथवा अल्पकाळ अशा स्वरुपात असतात. बोली ही व्यवहारभाषा असल्यामुळे एक प्रकारचा जीवंतपणा असतो. दैनंदिन व्यवहारासाठी बोलीभाषेचा प्रामुख्याने वापर होत असतो. बोली परिवर्तनशील असते. बारा कोसावर भाषा बदलते असे म्हटले जाते ते यामुळेच. बोली ही समाज, परिस्थिती, व्यक्ती, व्यवसाय, धर्म, प्रदेश यानुसार बदलते. बोली ग्रामीण असते. म्हणुन सतत नवनवीन बदल तिच्यात होत असतात. नवीन बदल पचवण्याची ताकद बोलीमध्ये असते.

मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोली तर दोन राज्यांच्या सीमेवर बोलली जाणारी बोली आहे. दोन राज्यांबरोबर वेगवेगळे प्रदेश, वेगवेगळे माणसे, वेगवेगळे धर्म, वेगवेगळी परिस्थिती अशांमध्ये ही बोली बोलली जाते. या सगळ्यांचा इथल्या बोलीवर परिणाम दिसून येतो. या परिणामांचा भाषा वैज्ञानिक दृष्टीकोनातून इथे आढावा घ्यायचा आहे. या आढाव्यामधून या बोलीत घडणाऱ्या उच्चार प्रक्रिया आपल्या लक्षात येतील. ही बोली कशी बदलत असते ही बदलाची दिशाही लक्षात येईल. या बोलीच्या उच्चारव्यवस्थेतील बदल लक्षात घेऊनच या बोलीचे विशेष नमूद करता येतील. प्रस्तुत लेखाचा हाच उद्‌देश आहे.

## उच्चार प्रक्रिया

उच्चार प्रक्रियेत वेगवेगळ्या कारणांनी बदल होतो. त्यापैकी आळस, अनुकरण, सुलभीकरण, भौगोलिक परिस्थिती अशी प्रमुख कारणे आहेत. मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीच्या उच्चार प्रक्रियेतही या कारणांचा समावेश झालेला दिसून येतो. मराठीची ही स्वतंत्र बोली नाही. त्यामुळे मराठीची जी वर्णमाला आहे तीच या बोलीची वर्णमाला आहे. वर्णमाला एकच असली तरी मौखिक भाषा असल्याने तिचे उच्चार स्वरुपात काही वेळा बदल झालेला दिसतो. या संदर्भाने ना. गो. कालेलकर आपल्या 'भाषेचा इतिहास आणि भूगोल' या ग्रंथात म्हणतात— ''मराठी लिपी ही संस्कृतसाठी वापरण्यात येणाऱ्या देवनागरीतून वेगळी नाही पण तिची ध्वनी पध्दती मात्र स्वतंत्र आहे.'' त्यामुळे उच्चारप्रक्रियेत लिखित स्वरांपेक्षा मौखिक स्वरांना महत्व असते. म्हणून मिलिंद मालसे म्हणतात— ''मौखिक परंपरेत भाषेच्या ध्वनीरुपाला जवढे महत्त्व असते तेवढे लिखित परंपरेत असणार नाही.'' कारण हे उच्चारवैविध्य अर्थप्रकटीकरणात वैविध्य निर्माण करणारे असते.

याबाबतीत वि.ना. ढवळे म्हणतात, '' भाषेच्या अनेक अंगापैकी उच्चार एवढाच भाग घेतला तरी कोणत्याही भाषेत सर्वांचे उच्चार अगदी सारखे कधीच असत नाहीत. ऐतिहासिक, भौगोलिक, प्रादेशिक कारणांनी व प्रत्येकाच्या वैयक्तिक मर्यादा व अनुभव यामुळेही उच्चारात फरक दिसतो.''
मराठवाडा–कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोलीच्या प्रक्रियेतील वैशिष्टये या अनुषंगाने आपणाला पाहायची आहेत.

## स्वरलोप

या बोलीचा ओढा उच्चार सुलभीकरणाकडे जास्त असल्यामुळे या बोलीत स्वरलोपाची प्रवृत्ती दिसून येते.

उदा: करत असतील – करतासतील

प्रमाण मराठी–

करत असतील – क + अ + र् + अ +त् + अ + अ + स् + अ् + त् + ई + ल् + अ = करत असतील.

मराठवाडा–कर्नाटक सीमेलगतच्या लोकांची मराठी बोली–

करतासतील– क + अ + र् + त् + आ् + स् + अ् + त् + ई + ल् + अ = करतासतील.
वरील शब्दामध्ये 'अ' चा स्वराचा लोप झालेला आहे. या मराठवाडा–कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीत अशाप्रकारे बऱ्याच शब्दात स्वरलोप होताना दिसतो.

| प्रमाण मराठी | मराठवाडा–कर्नाटक सीमेलतची बोली |
|---|---|
| आणत असतील | आणतासतील |
| म्हणत असतील | म्हणतासतील |
| सांगत असतील | सांगतासतील |
| देत असतील | देतासतील |
| घेत असतील | घेतासतील |
| पळत असतील | पळतासतील |
| जेवत असतील | जेवतासतील |
| बघत असतील | बघतासतील |
| येईल | यील |
| घेईल | घील |
| आला असेल | आलासल |
| बोलते आहे | बोलत्याय |
| करणार आहेस | करणाऱ्यासं |
| वाचत आहे | वाचणाऱ्यासं |
| जात असतील | जातासतील |
| येत आहे | यिवलाल्यास |

## व्यंजन लोप

मराठवाडा–कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीमध्ये स्वरलोपाप्रमाणे व्यंजनलोपही दिसून येतो. उच्चार सुकर होण्याच्या/करण्याच्या स्वभावामुळे हे व्यंजन लोप दिसून येतात.
उदा: या बोलीमध्ये 'नाही' चा 'नी' होतो. तसेच 'होती' मधील 'ती' वापरण्याची पध्दत आहे. कधी–कधी व्यंजनाऐवजी केवळ स्वर राहणे इत्यादी गोष्टीही होतात.

उदा: प्रमाण मराठी–

क् + अ + द् + आ + य् + अ + ल् + आ = करायला
बोली

क् + अ + र् + आ + य + आ = कराया.
तसेच
नाही ऐवजी नी
येत नाही—येतनी

| प्रमाण मराठी | मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतची बोली |
|---|---|
| बसायला | बसाया |
| उठायला | उठाया |
| तोडायला | तोडाया |
| काय | का |
| जात नाही | जातनी |
| करत नाही | करतनी |
| बोलत नाही | बोलतनी |
| केले नाही | केलनी |
| अजून | आजू |
| उभारली होती | उभारलती |
| जेवायला | जेवाया |
| मारायला | माराया |
| बांधत असतील | बांदतासतील |
| खणत असतील | खणतासतील |
| लिहित असतील | लिहितासतील |
| खाण्यासाठी | खायला |
| वहिनी | वैनी |
| विहिन | ईन |

## व्यंजनागम

मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीमध्ये व्यंजनाम होताना दिसते.
उदा:

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| देते | — | देत्याय | खाती | — | खात्याय | ओस | — | वस |
| फक्त | — | फकस्त | ओटी | — | वटी | | | |
| पडती | — | पडत्याय | इस्त्री | — | ईस्तरी | | | |

बऱ्याच वेळा शब्दामध्ये एका वर्णाऐवजी दुसरा वर्ण येतो. मराठीतील मूळ वर्ण जाऊन त्याजागी नवीन वर्ण येतो. उदा: 'व' चा 'य' होतो'

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेळ | — | येळ | वेसन | — | येसन | व्यापार | — | यापार |
| वेणा | — | येणा | वेलांटी | — | येलांटी | वित | — | यित |
| वेणी | — | येणी | वेगळा | — | येगळा | विद्यार्थी | — | यिद्यार्थी |
| वेस | — | येस | व्याज | — | याज | व्यासंग | — | यासंग. |

'व' चा 'इ' अथवा 'य' होतो

| | | |
|---|---|---|
| विचार — इचार | वित — ईत | विस्तव — ईस्तू |
| विशेष — इशेष | वेचू — येचू | विमान — इमान |
| विज — ईज | विळी — ईळी | विग्रह — इग्रह |
| विज्ञान — इज्ञान | विक्रम — इक्रम | वेल — येल |
| विकलो — ईकलो | विशाल — इशाल | विकास — ईकास |
| विद्रुप — इद्रुप | विंचु — ईच्चू | वेग — येग |
| विटीदांड — इटीदांडू | विमल — इमल | विठ्ठल — इठ्ठल |
| विमल — इमल | विट — इट | विस्तार — इस्तार |
| विशाल — इशाल | विपरीत — इपरित | विना — इना |
| विद्या — इद्या | विरुध्द — इरुध्द | विजय — इजय |
| विडा — इडा | विचका — इचका | वेणी — ईनी |
| विश्वास — इश्वास | विजार — इजार | विहीर — हीर |
| विभाग — इभाग | विनोद — इनोद | वेड — येड |

'अ' चा 'ई' होतो

| | | |
|---|---|---|
| डब्बा — डब्बी | खड्डा — खड्डी | डमरगा — उंबरगी |
| अड्डा — अड्डी | गुंडगा — गुंडगी इ. | |

'ण' चा 'न' होतो

| | | |
|---|---|---|
| पण — पन | शिक्षण — शिक्षन | जाणार — जानार |
| होणार — होनार | फणी — फनी | कणा — कना |
| वाण — वान | खाण्यासाठी —खान्यासाठी | कोणी — कोनी |
| कणसे — कनसे | आण — आन | पाणी — पानी |
| कित्येकजण —कित्येकजन | | |

कोण — कोन

| | | |
|---|---|---|
| काणी — कानी | राणे — राने | बाण — बान |
| पाहुणे — पावने | दाणे — दाने | घाण — घान |
| जेवणाला —जेवनाला | | |

'ठ' चा 'ट' होतो

| | | |
|---|---|---|
| माठ — माट | ओठ — ओट | गाठ — गाट |
| काठ — काट | उठणे — उटणे | अंगठा — अंगटा |
| कठिण — कटिन | मराठी — मराटी | उठवणे — उटवणे |
| काठी — काट | बैठक — बैटक | उठाव — उटाव |
| साठ — साट | ठपका — टपका | ठसठस — टसटस |
| कुठे — कुटे | कठोर — कटोर | जठर — जटर |
| आठ — आट | विठ्ठल — विट्टल | |
| मुठ — मुट | ठिपका — टिपका | |

'भ' चा 'ब' होतो

| | | |
|---|---|---|
| मुठभर — मुटबर | जांभई — जांबळी | अभ्यास — आब्यास |
| आभाळ — आबाळ | गंभीर — गंबीर | अभिषेक — अबिषेक |
| भिसी — बिश्शी | भाभी — भाबी | चांभार — चांबार |
| भाषण — बाषण | संभाजी — संबाजी | सभा — सबा |
| सौरभ — सवरब | शंभर — शंबर | |
| जीभ — जीब | हरभरा — हरबरा | |

'थ' चा 'त' होतो

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नथ | — | नत | इथे | — | इते | लाथ | — | लात |
| अंथरुन | — | अंतरुन | तिथे | — | तिते | पालथा | — | पालता |
| पंथ | — | पंत | अनाथ | — | अनात | रथ | — | रत |
| संथ | — | संत | साथ | — | सात | | | |

'ढ' चा 'ड' होतो

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पंढरपूर | — | पंडरपूर | एवढे | — | एवडे | चढणे | — | चडणे |
| दाढ | — | दाड | केवढे | — | केवडे | वाढणे | — | वाडणे |
| गाढव | — | गाडव | ओढा | — | ओडा | चढणे | — | चडणे |
| वाढ | — | वाड | कढ | — | कड | मेंढरं | — | मडरं |
| दाढी | — | दाडी | कढी | — | कडी | ढारढूर | — | डारडूर |
| काढ | — | काड | पांढरा | — | पांडरा | ओढातान | — | वडातान |

'झ' चा 'ज' होतो

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| माझे | — | माजं, माजे | ओझं | — | वज्जं | पाझरा | — | पाजरा |
| तुझे | — | तुजे, तुजं | वांझ | — | वांज | | | |

'घ' चा 'ग' होतो

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बघ | — | बग | आघात | — | आगात | अवघड | — | आवगड |
| वाघ | — | वाग | चघळणे | — | चगळणे | रघुनाथ | — | रगुनाथ |
| माघ | — | माग | आघळपघळ — आगळपगळ | | | घुस | — | गुस |
| बिघडले | — | बिगडले | रीघ | — | रीग | घोस | — | गोस |
| माघारी | — | मागारी | घासणे | — | गासणे | | | |

## प्रत्यय प्रक्रिया

मराठवाडा–कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीत नामाची व सर्वनामाची सामान्यरुपे होतात. प्रमाण मराठीप्रमाणे प्रत्यय लावण्यापूर्वी नाव आणि सर्वनामाचे सामान्य रुप केले जाते. शब्दाचे सुलभीकरण करण्याची प्रवृत्ती इथेही दिसते. या बोलीत सर्वनाम वेगळ्या पध्दतीने उच्चारली जातात. पुढील तक्त्यावरुन लक्षात येईल.

| प्रमाण मराठी | | सीमेलगतची बोली | |
|---|---|---|---|
| नाम/सर्वनाम | प्रत्यय | नाम/सर्वनाम | प्रत्यय |
| तो, ती,ते, | त्याला, तिला, त्यांना, | त्य,तीनं, त्ये | त्यला, तिला, त्येंना |
| आण्णा | आण्णाला | आण्णा | आण्णाला |

या बोलीमध्ये तो सर्वनामाचे सामान्यरुप 'त्य' असे होते; आणि मग प्रत्यय लागतात. उदा. त्यला, त्याचा, त्यंचे इ.

नामाच्या बाबतीतही असेच होते. उदा. राम–रामा, दगड–दगडा, म्हणजे सामान्यरुप धारण करण्याची मध्यवर्ती मराठीची प्रवृत्ती या सीमावर्ती बोलीतही आढळून येते.

काहीवेळा क्रियापदांचे सामान्यरुप होताना 'जी' हा प्रत्यय कालदर्शक म्हणून येतो. उदा. खेळजीपरेंत, जेवजीपरेंत, करजीपरेंत, जाईपरेंत इ.

या बोलीमध्ये क्रियापदाचा दुहेरी वापर करण्यावर भर आहे.

उदा. जेवण कर ऐवजी 'जा जेवजा जा'

किंवा

खेळायला जा ऐवजी 'जा खेळजा जा'

किंवा

झोपायला जा ऐवजी 'जा झोपजा जा' इ.

या सीमेलगतच्या बोलीमध्ये संबोधनाचा अनेकवचनी स्त्रीलींगी प्रत्यय 'वा' असा होतो.

उदा. गायीवा — गायीवाला रानात सोडा
पोरीवा — पोरीवाला खेळू द्या.
दोस्तीनीवा — दोस्तीनीवाला बोलवा.
बायावा — बायावालाबी सांगा इ.

सीमेलगतच्या या बालीमध्ये कधी—कधी विनाप्रत्ययी भाषिक चलन आढळते.

उदा. मी शाळेला गेले
मी जेवण केलो

कधी कधी व्यंजन प्रत्ययाऐवजी व्यंजनाचा लोप होऊन केवळ स्वर वापरला जातो.

उदा. पकडायला — पकडाया
खेळायला— खेळाया
जेवायला — जेवाया
शिकायला — शिकाया इ.

मराठवाडा—कर्नाटक सीमेलगतच्या लोकांच्या मराठी बोलीत कृदंताची रुप बनताना 'ण' ऐवजी 'न' होतो.

उदा.
बघणे — बगनं
वागणे — वागनं
चावणे — चावनं
पोहणे — पवनं इ.

उच्चार सुलभीकरणासाठी क्रियापदाचे प्रत्यय योजलेले या बोलीमध्ये दिसतात.
पुढील तक्त्यावरुन ही गोष्ट लक्षात येते.

| | प्रमाण मराठी | सीमेलगतची बोली |
|---|---|---|
| १ | तो जेवत आहे | त्यनं जीवलालंय |
| २ | ते रान नांगरत आहे | त्यनं रान नांगुरलालंय |
| ३ | ते झाडाखाली बसले आहेत | त्यनी झाडाखाली बसलेत |
| ४ | ती पाणी भरत आहे | तिनं पानी भरलाल्याय |
| ५ | ते काम करत आहे. | तिनं काम करलाल्याय |

## संदर्भग्रंथ


१. कालेकर ना. गो. — इतिहास आणि भूगोल
मौज प्रकाशनगृह, मुंबई—४.

२. ढवळे वि. ना. — साहित्याचे नविन भाषा तत्वज्ञान,
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे—३०.

३. वाळंबे मो.रा. — सुगम मराठी व्याकरण लेखन,
नितीन प्रकाश पुणे—३०.

४. मालशे मिलिंद स. — आधुनिक भाषविज्ञान : सिध्दांत आणि उपयोजन
लोकवाड्मय गृह प्रकाशन, मुंबई—२५.


❖❖❖

# लोकसाहित्यातून येणारी मिथके संकल्पना आणि स्वरूप

प्रा.डॉ. अपर्णा अ. पाटील
बा.बु. कला, ना.भ. वाणिज्य बा.पा. विज्ञान महाविद्यालय
दिग्रस, जि.यवतमाळ भ्रमणध्वनी क्र.९७३०७७५५८५

## सारांश

पुराणकथा, मिथ्यकथा, मिथ म्हणजे जे खरोखर अस्तित्वात नव्हते किंवा ज्याला वस्तुनिष्ठ अशा सत्याचा आधार नाही अशी दिव्यकथा. यातील व्यक्ती अति मानवी असतात, म्हणून ह्या कथांना 'दैवतकथा' असेही म्हणतात. मिथ हे परंपरेतून आलेले असल्याने भूतकालीन मानवी आकलनाची परंपरा उलगडण्याचे साधन म्हणुन मिथकांचा अभ्यास केला गेला. मिथके दिव्य कथात्मक असतात. त्यांना अतिमानवीय असे संदर्भ असतात. त्या लोकविधीचा भाग म्हणून आलेल्या असतात. सृष्टीची उत्पत्ती वगैरे सारख्या गूढ आदिम आकलन सांगणाऱ्या कथा असतात.

## प्रस्तावना

भारतीय लोकसाहित्यातील मिथकांचा उगम इ.स.पू. १२०० पर्यंत मागे नेता येतो. अगदी सुरुवातीची मिथके आपल्याला ऋग्वेदातील ऋचांमध्ये आढळतात. माणसाचा सृष्टीविषयीचा प्रारंभीचा अनुभव, त्याच्या निसर्गाबद्दलचा पहिला उद्गार, ऋग्वेदाच्या ऋचात आहे.

मिथकांची निर्मिती मानवी संस्कृतीच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यावर झाली असे म्हटले जाते. माणसाला भाषेचा शोध लागला आणि त्यामुळे तो निसर्गाची गुढे उकलू लागला. त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करू लागला. त्याने निसर्गातील विविध घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यातून मिथकांची निर्मिती झाली. इथे सृष्टीतील घटित आणि त्याचा अनुभव घेण्याची पध्दती ह्या दोहोतून मिथक जन्मले, हे स्पष्ट होते. मानवाचा प्रारंभीचा इतिहास अभ्यासतांना मिथकांचा उपयोग होतो, हे महत्त्वाचे आहे. ब—याचवेळा मिथक म्हणजे असत्य, अविश्वासनीय, खोटे दिशाभूल करणारे, ओढुन ताणुन रचलेले, गारुड, भुलथापा अशा अर्थाने ह्या संज्ञेचा उपयोग होतो. अर्थात 'मिथक' हे इतिहासाच्या सत्या सारखे सत्य ही नसते ती हकीकत सुध्दा नसते मिथक ही कथा असते या कथेत इतिहास किंवा ऐतिहासिक सत्य नसते.

'मिथ' हे परंपरेतून आलेले परंपरेत मुरलेले असावे लागते. पूर्वापार चालत आसलेली पुराणकथा हा मिथकाचा एक अर्थ आहे. पण त्याला सत्याचा आधार नसतो. त्यातील व्यक्ती अतिमानवी असतात. देवदेवता, राक्षस, भेतेखेते अशी पात्रे असतात. सृष्टीच्या निर्मीती विषयीच्या दिव्यकथा असे मिथकाचे स्वरूप असते.

## विवेचन :

ऋग्वेदामध्ये सृष्टीतल्या दिवस—रात्र, सूर्यप्रकाश, चंद्रप्रकाश, वारा, पाऊस, वादळे, नद्यांचे प्रवाह, जंगले, विविधप्रकारचे नाद, ध्वनी अशा विविध अनुभवांना शब्दरूप प्राप्त झाले. ह्यातुनच पुढे विश्वदेवाची मिथके निर्माण झाली. अग्नी, वायू सूर्य हे तीन प्रमुख विश्वदेव मानले गेलेत. पुढे यांनाच देवत्व दिले गेले. आकाश, पृथ्वी, वायू, पर्जन्य, समुद्र, अग्नी, अदिती, अश्विनी, रुद्र यम, ह्या देवता सृष्टी तत्वाच्या मानवी आकलनातूनच मिथकरूपाने पुढे आल्या.

उत्तर वैदिक काळात रामायण—महाभारत व पुराणे या तीन इतिहास ग्रंथात देवकथांचा विस्तार आढळतो. ह्या ग्रंथात विष्णू आणि वैदिक देवती, वासुदेव आणि कृष्ण अशा नावाने विस्तार पावली. मुरलीधर, वासरी वाजवणारा गुराखी अनेक कथांचा मुलाधार बनला वाङ्मयात ह्या देवतांची संख्या वाढली, ब्रम्हा—विष्णू—महेश ह्या त्रिमुर्ती देवतांची अनेक मिथके पुराणात आढळतात. लोकमानसात ह्या पुराणातूनच पुढे अनेक लोककथा जन्माला आल्या. त्यामुळे लोककथांचा आणि मिथकांचा मुलाधार म्हणुन पुराणांना उल्लेख केला जातो. भारतीय मिथकांचे हे उगमस्त्रोत समजावुन घेतले तर पुढे मिथकांचे आकलन व विश्लेषण करता

येण्यासाठी काही आधारसूत्र हाती लागतात म्हणुन आपण ठळकपणे भारतीय मिथकांचे हे उगमस्त्रोत समजावून घेऊ या...

वेदवाङ्मय, रामायण, महाभारत आणि पुराणातील भारतीय मिथकांच्या स्त्रोतांचे वर्गीकरण खालील प्रमाणे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| १) तीन प्रमुख सृष्टी देवता | :— | अग्नी—वायू—सूर्य |
| २) तीन प्रमुख हिंदू दैवते | :— | ब्रम्हा—विष्णू—महेश |
| ३) इतर दैवते | :— | इंद्र, हनुमान, वरुण, सोम, काम, कुबेर, विश्वकर्मा, यम, नारद, गायत्री, गंगा |
| ४) अलौकिक व्यक्ती | :— | बळी, भगीरथ, भीष्म, ध्रुव, अंबरीष, एकलव्य, हरीश्चंद्र, कर्ण, वाल्मिकी, महावीर, नचिकेत, प्रल्हाद, वशिष्ठ, व्यास, बिभीषण, युधिष्टीर, द्रौपदी, सावित्रीत्र |
| ५) स्वर्गीयपात्रे | :— | अप्सरा, गंधर्व, किन्नर, यक्ष, सिध्द |
| ६) नवग्रह | :— | सुर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनी, राहु, केतु |
| ७) प्राणिदैवते | :— | एरावत, कासव, रेडा, कावळा, कुत्रा, घोडा, गरुड, जांबुवंत, कामधेनु, मकर, उंदीर, नंदी, मोर, पोपट, बोकड, शेषनाग, वाघ |
| ८) पर्वत | :— | हिमालय, मेस, मंदार, कैलास, परिजात, मलयगिरी, चित्रकुट, गोवर्धन, कामगिरी, शक्तीमान, रैवंतागिरी |
| ९) नद्या | :— | गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, सिंधू, कावेरी |
| १०) लोकदैवत | :— | खंडोबा, म्हसोबा, पीर, मतोबा, विठोबा इ. |

वेदांमध्ये विश्वातील सूर्य, अग्नी, वायू या सृष्टीतत्वांची मिथके आहेत. माणसाने ज्याचा अनुभव घेतला ते विराट आकाश, तेजाने प्रकाशणारा सुर्य, रात्र आणि दिवस यात मध्यंतर साधणारी उषा आणि संध्या वारा आणि पाउस, चंद्र आणि तारका, नद्यांचे खळाळणारे प्रवाह, जंगलातील विविध ध्वनी यांची विविध रूपांची वर्णने वाङ्मय आढळतात.

निसर्गातील या गुढांना माणसाने देवत्व बहाल केले आणि मिथक सृष्टीचा उगम झाला. वेदांमध्ये ह्या सृष्टीदेवतांना फारसा मानवी चेहरा नाही... म्हणजे त्यांच्यात लहाण... मोठा... अशी उतरंड नाही. त्यांच्या विवाहाच्या कथा नाहीत. कौटुंबीक आप्तसंबंधाच्या साखळ्या नाहीत. आकाशाकडे पितृत्व आणि पृथ्वीकडे मातृत्व इतकी ढोबळ विभागणी फक्त आढळते. अशा या मिथक सृष्टीचे स्वरुप समजावुन घेण्यासाठी थोडक्यात त्यांची वैशिष्ट्ये पाहू या...

## वैशिष्ट्ये

उषा :— ही आकाशाची मुलगी, अत्यंत तेजस्वी सर्वकाही व्यापुन टाकणारी उषेने आपल्या लख्ख प्रकाशाने सा—या भुवनांना जागे केले. सर्व जगात चेतना आणुन नेटाने कामाला लावले. ही उषा शुभ्रवस्त्रधारण करणारी असुन पृथ्वीच्या सर्व वैभवाची, मांगल्याची ती स्वामिनी आहे. तिच्या अस्तित्वाने अंधकार दूर पळतो. सूर्यासाठी उषेने मार्ग मोकळा केला. अशी ही उषा सर्व प्राणी मात्रांना जागृत करुन परस्पर माणसा—मानसात प्रेमभाव उत्पन्न करणारी आहे.

सूर्य :— हा स्वयंप्रकाशी, असुन सर्वांना प्रकाश देणारा. तो सर्वांना दिसतो, त्याच्या प्रकाशामुळे सर्व प्राणिमात्रांना पाहता येते. सुर्य हा सर्वसाक्षी आहे. जन्मना—या सर्व प्राण्यांना तो पाहतो. तोच दिवस आणि रात्र निर्माण करतो. त्याच्या रथाला सात तेजस्वी घोड्यांनी स्वत:ला जुंपुन घेउन ते सुर्याचा रथ ओढुन नेतात. सुर्याच्या अस्तित्वामुळे विश्वातील अंधार दुर झाला. आकाश उजाळले असा हा सूर्य अतिशय मंगल, चैतन्यरूप असून तो सर्वमाणसांत विराजतो. तो जंतुनाशक, रोगनाशक, आरोग्यदाता आहे.

सोमदेव (चंद्र) :– हा संपत्ती वाढविणारा, रोगनिवारक, पोषक वस्तुंची व वैभवाची वृध्दी करणारा, मांगल्याची प्राप्ती करविणारा उत्तम मित्र होय. जशा गायी कुरणात आनंदीत असतात, जसा मनुष्य घरात आनंदीत असतो, तसा सोमदेव आमच्या हृदयात आनंदित राहो, अशी प्रार्थना ऋग्वेदात आढळते.

'सोम' हे चंद्राचे दुसरे नांव शुभ्र, चकाकणारा असा चंद्र, त्याच्या भ्रमण मार्गावरील २७ कला म्हणजे २७ नक्षत्र होत. ह्या नक्षत्रांशी चंद्राचे लग्न लावले असुन तो २७ रात्री ऐकेला पत्नीला भेटतो अशी मिथक कथा आहे. 'सोम' हे शांतीचे प्रतिक आहे. समुद्रमंथनात विषप्राशन केलेल्या शिवाची अंगाची दाहकता शीतल करण्यासाठी त्याने चंद्र डोक्यावर धारण केला. अशी मिथककथा आहे. पुढे कविंनी चंद्रला प्रेमदेवतेचे रूप दिले आहे.

अग्नी :– अग्नी हिंसारहित यज्ञाला सर्व पिशांनी व्यापून असतो. अग्नी व्दारे माणसाची वृध्दी होते. त्यामुळे घराघरातुन तो प्रज्वलीत होतो. अशी प्रार्थना ऋग्वेदात आहे. अग्नी हा अतिशय चपळ, त्वेषयुक्त, तेजयुक्त, आहे. तो तुपासारखी पवित्र, स्वच्छ, निर्दोषमुर्ती अत्यंत सुंदर आणि सुवर्णासारखी सतेज आहे. या अग्नीमुळे विकारी मानणसांचे विकार जळुन भस्म होतात. तसेच आपल्याशी शत्रृत्व करणा–याचे सारे डबोले तो डाळुन भस्म करील अशी लोकश्रध्दा ऋग्वेदातील ऋचांमध्ये आढळते.

वरुण :– वरुणाने सुर्याला प्रवासाचा मार्ग मोकळा केला. वरुणामुळे नद्या वाहतात, त्या थकत नाहीत. ह्या वरुणाची मनुष्यमात्रावर श्रध्दा आहे.त्याला माणसाचा आप्त म्हटले आहे. तो माणसाचे भरण पोषण करतो अशी समजुत आहे. त्याच्यामुळे वनस्पतीत नाना रुपे प्राप्त होतात. सर्वप्राण्यांसाठी विपुल अन्न निर्माण होते. गायींसाठी पिण्याच्या पाण्याचे जलाशय निर्माण होते. सा–या विश्वाचा राजा वरुण याने अशा प्रकारे भुमिला भिजवुन टवटवी आणली.

आसरा /अप्सरा :– उर्वशीच्या सख्या, अथर्व वेदात, उग्रजित, गुग्गुल, पीला, नालदी, औक्षगंधी, प्रमोदीनी, या अप्सरांचे उल्लेख आढळतात. शकुंतलेच्या कथेत मेनका या अप्सरेचा उल्लेख असुन ती विश्वमित्राचा तपोभंग करते. या सर्वामध्ये उर्वशी ही प्रमुख आहे. या सातही अप्सरा जलदेवता आहेत. यांचा सहचर गंधर्व तो मात्र आकाशात राहतो. आणि अप्सरेपासुन पहिली मानवी संतती म्हणुन यम आणि त्याची जुळी बहीण यमी जन्मलेत. 'पाणी'हे गर्भाक्षयातील पाणी हा अर्थ या मिथकात अपेक्षीत आहे. लोकवाङ्‍मयात साती अप्सरांचा वारंवार उल्लेख येतो. त्या नदी, तळे, विहीरी अशा जलस्थानाजवळ राहतात.

रुद्र :– हा मारुतीचा पिता, रोग व साथीचे उच्चाटन करणारा त्याने दिलेल्या अतिसुखद औषधांनीच माणुस शंभर हिवाळे प्राप्त करु शकला. म्हणुन त्याला सर्वोत्तम वैद्य म्हटले गेले. तो शरीराने सुदृढ, पिंगट वर्णाचा, चकचकीत सुवर्णरुपाने शोभीवंत असल्याचे वर्णन ऋग्वेदात आहे. 'हिरण्यवर्णीय' ह्या विशेषणाने त्याच्या रुपाने वर्णन केले गेले आहे. हा रुद्र सज्जनांचा प्रतिपालक आहे.

अदिती :– विश्वातील सर्व तुड्यांना शिवुन अखंड स्वरुप देणारी शक्ती म्हणजे 'अदिती' अदिती म्हणजे समृध्द प्रेमळ, शांती, करुणा, अदितीने आपल्याला व्देषाच्या पलीकडे घेउन जावे अशी प्रार्थना ऋग्वेदात आहे.

इंद्राचे मिथके :– इंद्र हे भारतातील आद्‍य मिथक मानले जाते. श्रीमती दुर्गाताई भागवत यांनी इंद्राला भारतातला पहिला विरनायक म्हटले आहे. लोकसाहित्यात इंद्राच्या भरपुर कथा आढळतात. पावसाची देवता म्हणुन 'इंद्र' लोक साहित्यात आला आहे. इंद्र हा जेता आहे, तो अपराजित आहे, इंद्राने वृत्राला मारले, उदकाला मुक्त केले, जलमार्ग तयार केले. लोकांना उपद्रव्य देणा–या ठकाला मारले. त्यामुळे लोकांना स्वराज्य प्राप्त झाले आपल्या पराक्रमाने इंद्र सर्व देवांचा रक्षक झाला. ऋग्वेदात इंद्रला अजिंक्य, नित्यजेता संबोधले आहे.

देवांचा देव इंद्राचा आकाश हा पिता, पृथ्वी माता आणि इंद्राणी ही पत्नी असल्याचा उल्लेख ऋग्वेदात येतो. जयंत, मिधुष, निलांबर, ऋषभ ,चित्रगुप्त, अर्जुन अशी त्या पुत्रांची नावेही आढळतातत्र इंद्र पांढ–या शुभ्र ऐरावत या हत्तीवर बसून किंवा सुवर्णरथातुन आकाशात भ्रमण करतो. त्यामुळे त्याच्या ठिकाणी शक्तीचा संचार होतो. इंद्र हा पर्यावरणाचा रक्षक ऋतूंचा स्वामी मानला जातो.

इंद्र उत्तम नेतृत्वकुशल, व्यवस्थापक, सर्वावर सत्ता चालवणारा, विजयी, सदापराक्रमी, उत्तम योध्दा, बराढ्य, गंभीर आणि उदात्त आहे.इंद्राला केली गेलेली प्रार्थना हे देवा इंद्रा सर्व व्याजबट्टा करणा—याचा, पायापुरते पाहणा—यांचा तु पराभव करतोस, आमचा द्वेष तिरस्कार करणा—यांना तू हाकलुन लाव, हे इंद्रा, तुझा अशेच्या आधारावरच मी हातात विळा घेतला आहे. आता तू कृपा कर, वरुन पाउस पाड या प्रार्थनेत वेदकालीन मावसांची शांतीची, सुखाची अपेक्षा व्यक्त होते. इंद्र हा त्यांच्यासाठी आश्वासक माता बनुन येतो.

महादेव :— लोकसाहित्यात महादेवाची मिथककथा अनेक ठिकाणी आढळते. गोंड आदिवासींच्या लोकसमजुती नुसार देवाच्या हातावर फोड आणि त्यातुन महादेव—पार्वती जन्माला आले. या महादेवाने जमिनीवर लघवी केली, त्यातुन फुले—फळे, भाजीपाला अशी वनस्पती जन्माला आली. पार्वतीने ही पाने—फुले खाल्ली आणि तिला दिवस गेले. त्यानंतर पार्वतीने गोंड देवांना जन्म दिला.

दुस—या एका लोककथेत पृथ्वी आणि मानवाची निर्मीतीच महादेवापासुन झाली. एकदा शंकराला खुप राग आला त्यांने तांडवनृत्य सुरु केले. त्यामुळे पृथ्वीवर जलप्रलय झाला. तेव्हा एका म्हातारीने मोठी युक्ती करुन आपल्या लहान मुलाला आणि मुलीला बारा वर्षे पुरणारी शिधासामग्री देउन नावेत बसवुन पाठवुन दिले. पुढे महादेवाचा राग शांत झाल्यावर त्याने या दोन्ही मुला—मुलींना दत्तक घेतले, गेंडुळापासून थोडी माती उधार घेतली आणि पृथ्वीव मानवाची निर्मीती केली. अशी मिथककथा आहे.

प्राणी दैवते :— निसर्गातील विविध अविष्काराची अनेक रुपे मानवी मनाने मोठ्या कुतुहलाने न्याहाळली, कधी जिज्ञासेने, कधी भितीने, कधी लोभाने, प्राणीसृष्टीचा अनुभवही माणसाने असाच आपल्या भाव भावनांशी जोडला. लोकथांतुन लोकगीतातुन याची प्रचिती येते. प्राण्यांना केवळ प्राणी म्हणुन नव्हे तर एखादे तत्व म्हणुन श्रध्दा म्हणुन भय वासनेचे प्रतिक म्हणुन या कथांमध्ये स्थान आहे. उदा. नागाला पुरुषतत्वाचे प्रतिक म्हणुन, मांजरीला मुले खाणारी विघ्नदेवता म्हणुन, लोककथा, कहाण्यांमध्ये रंगविण्यात आले. मांजर हे सटवीचे वाहन आहे. सटवी म्हणजेच मांजर अशीही लोकसमजुत आहे. मांजरी स्वत:ची नवजात पिल्ले खाते यावरुन ही लोकसमजुत रुढ झाली असावी.

निष्कर्ष :— अशा त—हेने भारतीय लोकसाहित्यातील मिथकांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करता येतो एका अर्थाने आदिम आदिम प्रकृतीचा मानवाने लावलेला हा अन्वयार्थ आहे. असे आपण म्हणु शकतो. त्याच्या चिंतनाचा आणि संस्कृतिचा वारसा समृध्द करणारी ही मिथकसृष्टी आहे. म्हणुन लोक साहित्या असो वा आधुनिक साहित्य ही जीवनाची आदिम प्रकृती रुपे पुन्हा पुन्हा साहित्यात येणार आहेत आणि हि मिथकेच वाङ्मयीन परंपरेला समृद्ध करणारा आहेत. हाच निष्कर्ष आपण या विवेचनातून काढू शकतो.

❖❖❖

# संत नामदेवांचे महाराष्ट्राबाहेरील कार्य

प्रा.डॉ. गजानन घोंगटे
सहा. प्राध्यापक
श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा, जि. वाशिम
E-mail :- ghongategajananb@gmail.com Mob.No. :- 9822406115

नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे ।
संत पाय हिरे देती वरु ।।

असे संत नामदेवांनी विनयाने म्हटले असले तरी परमार्थाच्या प्रांतात त्यांची पायरी फार वरची आहे. भावभक्तिच्या अथांग सागरात डुंबणारे, अद्वैतनिष्ठ भक्तीमार्गाची पताका आपल्या खांद्यावर घेणारे, हिंदू आणि मुसलमान, राव आणि रंक, स्त्री आणि पुरुष इ. चा भेदभाव न करता पंढरीपासून पंजाबपर्यंत आमजनतेच्या हृदयात समतेचे अमृत शिंपून भाव भक्तीचा फुलोरा फुलविणारे, सर्वाभूती परमेश्वर पाहणारे, ज्ञानेश्वराचे चरित्र लिहून महाराष्ट्र शारदेच्या दरबारात 'आद्य चरित्रकार म्हणून मानाचा किताब संपादन करणारे संत नामदेव म्हणजे वारकरी संप्रदायाच्या प्रभावळीतील मुकुटमणीच होय.

नामदेवाचे वडील दामाशेटी हे परभणी प्रांतातील नरसीबामणी या गावी राहत होते. दामाशेटी व त्यांची पत्नी गोणाई हिने पुत्र प्राप्तीसाठी विठ्ठलाला नवस केला आणि या नवसाला देव पावून तिला जो मुलगा झाला तोच नामदेव. नामदेवांचा जन्म (माझे जन्मपत्र बाबाजी ब्राम्हणे या अभंगाच्या आधारे ) शके ११९२ म्हणजे इ. स. १२७० मध्ये कार्तिक शुद्ध एकादशीस रविवार दि. २६ ऑक्टोबर रोजी नरसी–बामणी येथे झाला.

लहानपणापासूनच पंढरीच्या विठोबाची भक्ती करण्यात नामदेव रंगून जाऊ लागले. जन्माने शिंपी असूनही त्यांच्या हाती सुई व कातरी ऐवजी टाळ व चिपळया दिसू लागल्या.
नामदेव म्हणतात,

शिंपियाचे कुळे जन्म मज जाला ।
परि हेतु गुंतला सदा शिवी ।।
रात्री माजी शिवीं दिवसा माजी शिवीं ।
आराणूक जीवी नाही माझ्या ।।
सुई आणि सातुळी, कात्री गज दोरा ।
मांडिला पसारा सदा शिवी ।।
नामा म्हणे शिवी विठोबाची अंगी ।
त्याचेनि मी जगी धन्य जालो ।।

संसारात मन रमून त्या ओढीने धंद्यात लक्ष्य घालेल या ओढीने दामाशेटीने नामदेवाचे लग्न गोविंदशेट सदावर्ते यांची मुलगी राजाई हिच्याशी लहानपणीच लावून दिले. परंतु नामदेवांचे सारे लक्ष्य विठ्ठलाच्या भक्तीतच होते. ज्ञानदेवांचे समकालीन, काहीसे निराळे व्यक्तिमत्व असलेले, पण तितकेच कर्तृत्ववान असे संत म्हणजे नामदेव १७–१८ वर्षाचे असतानाच त्यांचा वारकरी संप्रदायात बोलवाला झाला. ते वारकरी पंथाचे आद्य प्रचारक होते. तसे कीर्तनाचे प्रवर्तक, आद्य चरित्रकार, आद्य आख्यानक कवी देखील होते. ज्ञानदेव व नामदेव या दोघांच्या प्रभावामुळे भक्तीगंगेचा प्रवाह महाराष्ट्रात अठरापगड जातीमध्ये पोचला व एक प्रकारची आध्यात्मिक लोकशाहीच निर्माण झाली.

संसारतापाने पोळलेल्या बहुजन समाजाला भक्तिपंथाच्या कासेला लावणारे नामदेव हे पहिले मराठी संत होते. गुरुपदेशाच्या अख्यायिकेप्रमाणे व नामदेवांच्या स्वतःच्या उक्तीवरुन विसोबा खेचर हेच त्यांचे पारमार्थिक दृष्टीने दीक्षागुरु होते.

ज्ञानेश्वरांनी शके १२१८ मध्ये समाधी घेतली. त्यावेळी नामदेवांचे वय २६ वर्षाचे होते. त्यानंतर ते २–३ वर्षांनी महाराष्ट्राबाहेर पडले. आपल्या आयुष्याची उरलेली पन्नास वर्षे त्यांनी भारतात भक्तीमार्गाचा प्रचार करण्यात घालविली. त्यापैकी २०–२१ वर्षे त्यांनी पंजाबात वास्तव्य केले. नामदेवांनी उत्तर हिंदुस्थानात भक्तीमार्गीयांच्या वसाहती बसविल्या. त्यात सर्वात प्रसिध्द वसाहत गुरुदासपूर जिल्हयातील घोमानची. घोमान जवळील पिंडोरी या ठिकाणची वस्ती नामदेव सांप्रदायी आहे. पंजाब व राजपुताना या प्रांतात नामदेवांचे अनुयायी असलेल्या शिंपी समाजाने तेथे अनेक नामदेव मंदिरे उभारलेली आहेत. ही मंदिरे त्यांच्या कार्याच्या

यशस्वितेची साक्ष आजही पटवीत आहे. घोमान येथील त्यांचे स्मारक अनन्य महत्वाचे ते गुरुद्वार बाबा नामदेवजी किंवा देहुरासाहेब या नावाने प्रसिध्द आहे. तसेच ते उत्तरेकडील पंढरपूरही आहे.

महाराष्ट्रात जन्म घेऊन महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राबाहेर पंजाब, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहारपर्यंत आपले कार्य करणारे नामदेव हेच एकमेवाद्वितीय संत होते. गुरुनानकांना सुध्दा आपल्या कार्याची प्रेरणा नामदेवांच्या कार्यातून मिळाली होती. श्री. रमेशचन्द्र दल यांनी “Critical Notes of Indian History” या आपल्या ग्रंथात “Nanak drew his inspiration from Namdeo & Kabir, & founded the sikh religion” असे म्हटले आहे. भारत ही त्यांची एकच पुण्यभूमी होती. त्यांची भाषा एकच ती म्हणजे भक्ती. पंजाबात त्यांना भक्तियोगाच्या प्रसाराला अनुकूल भूमी आहे असे वाटले म्हणून त्यांनी तेथे अधिक वास्तव्य केले. या काळात भागवत धर्माचा प्रसार आणि काव्यरचना त्यांनी केली. त्यासाठी ते पंजाबी भाषा शिकले पंजाबातील शिखांनी संत नामदेवास गुरु मानून त्यांची ६१ पदे शिखधर्माचे ‘गुरु ग्रंथ साहेबात’ समाविष्ट केलीत व ही ६१ कवने भक्त नामदेवजीकी मुखवानी या नावाने प्रसिध्द आहेत. पंजाबातील बहुतेक शिंपी नामदेवांचे सांप्रदायिक अनुयायी असून त्यांना चिंबा किंवा छिंपा म्हणतात. पंजाबात त्यांची अनेक मंदिरेही आढळतात. मंदिरात पत्र्यावर कोरलेले नामदेवांचे एक चित्रही आहे.नामदेवांच्या अनुयायांना तिकडे बाबा नामदेविए म्हणतात. नामदेवांची मधुरवाणी आणि तितकेच त्यांचे शुध्द वागणे पाहून अनेकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले.

त्या काळात प्रचाराची फारशी साधने उपलब्ध नसताना नामदेवांनी जे अफाट कार्य केले, ते पाहून मन आश्चर्याने थक्क होते. भागवत धर्माच्या मेळाव्यात उत्तरेकडील सर्व धर्मानुयायांना नामदेवांनी एकत्र आणले, सामाजिक जागृती केली, परमार्थ शिकविला, खऱ्या जिवीत ध्येयाची जाणीव दिली. पंढरपूरच्या या संतकवीचे पंजाबवरील उपकार कधीही न फीटणारे आहेत. त्यांच्या परंपरेतूनच रामानंद, कबीर निर्माण झाले. अत्यंत नि:स्वार्थपणे स्वत:चा कुठेही उदो उदो न करता खऱ्या सत्वशील जीवनाचा आदर्श त्यांनी अखिल भारतासमोर उभा केला. पंजाबमध्ये अजूनही सुमारे ३० हजारावर नामवंशी श्री. नामदेवांचे अनुयायी आहेत. वेष, भाषा, अन्न, चालीरिती यामध्ये कोणत्याही प्रकारचे साम्य नसतांना नामदेवांचा प्रभाव परप्रांतात टिकतो हाच नामदेवांच्या कार्याच्या श्रेष्ठत्वाचा निकष आहे.

नामदेवांनी उत्तरेकडे केलेल्या धर्मप्रसारातून रामानंद, कबीर,नानक, रैदास, पीपा इ. संत निर्माण झाले. नामदेवांच्या विष्णुस्वामी बहोरदास, जाल्लो, लध्धा, केसो कलाहारी या पाच शिष्यांनी पंजाब व राजस्थानमध्ये श्री. नामदेवांच्या भक्तीमार्गाचा प्रसार केला. पंजाबमधील श्री. सोंधी (लेखक) लिहितात की, ‘‘ कबीर, नानक, मीरा, तुकाराम, पलटू, दरिया साहिब आदि संतोंने नामदेव का नाम आदर के साथ लिया है । मूर्तिपूजा, कर्मकांड जात–पात के विषय में इनके स्पष्ट विचारोंके कारण हिन्दी विद्वानोंने इन्हे कबीर आदि संतो का आध्यात्मिक अग्रज कहा है ।’’ वेदशास्त्र संपन्न ब्राम्हण भूदेव पंडित परसा भागवतादी उच्चवर्णियांकडून शूद्र म्हणून उपेक्षिलेल्या संत नामदेवाला मात्र सारा पंजाब गुरुंचा अग्रगण्य गुरु म्हणून गुरु ग्रंथससाहेबात स्थान व मान देऊन पूजतो.

उत्तरेकडील संत परंपरेचे आदिगुरु श्री. नामदेव आहेत. महात्मा कबीर, रविदास, गुरु नानकदेव, रज्जबदास, सुंदरदास, अमरदास आदि हिंदी संतकवींना शीख सद्ग ुरुंनी संत नामदेव कार्याचा महिमा कथन केला, असा इतिहास दिसून येतो. श्रीत्र नामदेव हेच गुरु नानकदेवांचे स्फूर्तिस्थान होते व त्या प्रेरणेनेच नानकांनी पंजाबात शिखधर्म स्थापन केला. नामदेवांचे कार्य महान आहे. त्यांच्या घरासमोरील गल्लीपासून दिल्ली ओलांडून पंजाबपर्यंत अजूनही ते जागत आहे. ‘‘ क्या कहू उनोकी (संत नामदेवांची) तारीफ बाबा तीनो लोक में भरा है ।’’ अशी महाराष्ट्रीय सर्व संतापेक्षा वरचढ स्तुती कबीराने उत्तर हिंदूस्थानात गाईली आहे. जर नामदेव पंजाबात गेले नसते तर आज राहिला तेवढाही पंजाब भारतात राहिला नसता. पंजाबातील जातीयता मिटवून नामदेवाने माणूसकी वाढविण्याचे जे कार्य केले ते राजा महाराजा व बादशहाने केले नाही.

नामदेवांच्या कार्याबद्दल हिंदी लेखक श्री. रामलाल म्हणतात – ‘‘ संत नामदेवाने कुछ दिनों तक पंजाब प्रांत में भी रहकर कृष्णभक्ति का प्रचार किया था । गुरुदासपूर जिलेमें घोमान गॉव मे उन्होने असंख्य जीवोंका अपने सत्संग और पांडुरंग भक्तीसे कल्याण किया । उन्होंने घेमान गॉव के निवास कालमे अनेक पद हिंदी भाषामें बनाये । जिनमें से अधिकांश गुरु ग्रंथसाहिब में संग्रहित आहे. श्रेष्ठ हिंदी संत कवी कबीर नामदेवाची महती मोकळेपणाने वर्णन करतात. कबीरानंतर रोहिदास, दादु दयाल, रज्जबदास, धर्मदास, सहजोबाई, मलुकदास अशा अनेक संत कवींनी नामदेवाच्या विचारांचे, शैलीचेच नव्हे तर शब्दांवलीचेही अनुकरण केले आहे. पश्चिमोत्तर भारतात त्यांच्या प्रभावखुणा सर्वत्र विखुरलेल्या आहेत. गुजरातचे आदिकवि नरसी मेहता नामदेवांच्या विचार विश्वाचे ऋण मान्य करतात. अलाहाबाद जिल्हयातील बांदूगडचे श्री संत सेनाजी हे देखील श्री

नामदेवांच्या कार्याने प्रभावित झाले. जाता पंढरीसी सुख वाटे जीव । हा प्रसिध्द अभंग सेना न्याव्याचाच आहे. पुढे सेना न्हावी पंढरीचे वारकरी बनले. राजस्थानमधील संत मीराबाईनी संत नामदेवांपासुनच प्रेरणा घेतली. भट्टीवाल गावात नामदेवांनी सांगितलेल्या ठिकाणी तलाव खोदला गेला. तलावात पाण्याचे पुष्कळ झरे लागले. या तलावाला आजसुध्दा 'नामीयाना' असे म्हणतात. केशव कलंदर याला नामदेवांनी महारोगातून मुक्त केले. भावलपुर राज्यात (सध्या पाकिस्थानात ) त्याने भागवत धर्माचे कार्य केले.

हिंदी काव्यात जसा विठ्ठलाचा उल्लेख नामदेव करतात, तसा पंजाबी काव्यातही आहे.

इभै बीठलु उभै बीठलु, बीठलु बिनु संसार नाही ।
थान थनंतरी नामा प्रणवै पूरी रहिऊ तु सरव मही ।।

तसेच मराठी व हिंदीतील साम्य दाखविणारी वचने –

जत्र जाऊ तत्र विठ्ठल भैला ।
जिकडे जावे तिकडे अवघा विठोबा ।

नामात रंगून जाऊन भक्तीमार्गाची ध्वजा घेऊन प्रवास करणारे नामदेव निवृत्तीमार्गी व प्रवृत्तीमार्गी असे दोन्ही आहेत. मनी निवृत्त, जनी प्रवृत्त अशी त्यांची वृत्ती आहे. निवृत्ती व प्रवृत्ती या दोन्ही पंखाच्या जोरावर नामदेव परमार्थाच्या आकाशात उंच उंच उडाले व त्यांनी स्वत:चे नि लोकांचे कोटकल्याण केले. तेरा व चौदाव्या शतकात महाराष्ट्रीय व भारतीय जीवनात अध्यात्म व व्यवहारविचार यांचा प्रकाश उजाळणारे नामदेव हे एक महान संत होय. त्यांचे कार्य म्हणजे भक्तीपंथाच्या प्रसारास झालेले अमोल साहाय्य आहे.

पंढरीचा वास चंद्रभागेमध्ये स्नान ।
आणिक दर्शन विठोबाचे ।।
हेचि घडो मज जन्म जन्मांतरी ।
मागणे श्रीहरी नाही दुजे ।।

स्वत:बद्दल असे मागणे मागणाऱ्या हया मनात संताने भक्ती प्रसाराचे फार मोठे कार्य करुन वयाच्या ८१ व्या वर्षी आषाढ कृष्ण १३ शके १२७२, इ. स. १३५० मध्ये समाधी घेतली. विठ्ठलाच्या महाद्वारी नामदेवाची पायरी दाखविली जाते, तीच नामदेवांची समाधी होय. उद्बत्ती जळून गेली आहे आता दरवळतोय सुगंध । अशा या भक्तिप्रेमाची साखर वाटली जाणाऱ्या, नामरुपी द्राक्षांचे गोड घड असणाऱ्या, पिकलेले आनंदरुपी आंबे असणाऱ्या व समतेचे फणसगरे असणाऱ्या पंढरीत –

लपलासि तरी नाम कोठे नेसी ।
आम्ही अहर्निशी नाम गाऊ ।।

असे म्हणणाऱ्या व नाम हाच ज्यांचा वेद नि नाम हाच त्यांचा देव, त्या नामदेवांची समाधी पाहून नतमस्तक होऊन म्हणावेसे वाटते.

'स्फुंदत स्फुंदत नामा उभा महाद्वारी ।
दृष्टी पायावरी विठोबाच्या ।। '

पंढरीचा विठोबा युगे अठ्ठावीस विटेवरी उभा आहे आणि पंढरी ते पंजाब भक्तिप्रेमाचा प्रसार करणाऱ्या नामदेवांचे नाव देखील महाराष्ट्राच्या मनाच्या विटेवर युगे अठ्ठावीस उभे राहील यात अणूरेणू इतकाही संदेह नाही.

## संदर्भ ग्रंथ

१) जोग, प्रा.ल.ग : संत नामदेव जीवन आणि कार्य प्रकाशन विभाग, पतियाला हाऊस, नवी दिल्ली– १ नोव्हेंबर १९७०.
२) पाटील, शंकर विठोबा : वारकरी पंथाचा इतिहास, चैतन्य प्रकाशन, दुधलगाव बु., आवृत्ती पहिली.
३) गोसावी, प्रा. र. रा. : श्री. नामदेव चरित्र, सारथी प्रकाशन पुणे.
४) स्वामी, व्ही. एन. : महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि विचारवंत, विद्याभारती प्रकाशन.
५) सपकाळ, डॉ. प्र. ना. : संतवाणी मधुरा संतवाणी चतुरा.
६) जावरकर, प्र. वा. व जाऊरकर, र. ना. (संपा.) : श्री. संत नामदेव जीवन व कार्य श्री. वैष्णव शिंपी समाज, जि. अमरावती प्रथम मुद्रण १९७२.

❖❖❖

# ऋतुरंग : एक आकलन

प्रा. रा.तु. आदे
सहयोगी प्राध्यापक
इंदिरा महाविद्यालय, कळंब जि.यवतमाळ
भ्रमणध्वनी: ९४२२६०८७१५

'मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह' या प्रबंधाचे लेखन करून संशोधन क्षेत्रात मोलाची भर टाकणा—या डॉ. रा.गो.चवरे यांनी कवी, कथाकार, कादंबरीकार,ललित लेखक म्हणूनही साहित्य क्षेत्रात मानाचे पान मिळवले आहे. 'ऋतुरंग' मधून त्यांनी ललितबंध साकारला आहे. ललित लेखकानी जपावयाची अनुभवातील आत्मनिष्ठा त्यांनी जपल्यामुळे त्यांचे लेखन मनाला स्पर्श करणारे ठरले आहे. निसर्ग आणि मानवी जीवनातील भावबंध त्यांनी काव्यात्म शैलीत उलगडला आहे. निसर्गावर त्यांनी मानवी भावभावनांचा अध्यारोप केल्यामुळे त्यांचे लेखन एकाच वेळी निसर्ग आणि मानव यांच्यातील सहसंबंध उलगडतो. मानवाचे बदलते जीवनवास्तव त्यांच्या चिंतनाचे विषय ठरले आहेत. त्याचेच शब्दांकण त्यांनी या ललितबंधातून केले आहे.

'इसाप प्रकाशन', नांदेड या प्रकाशन संस्थेने 'ऋतुरंग' हा ललितलेखसंग्रह प्रथमत: फेब्रुवारी १९९५ मध्ये प्रसिद्ध केला. त्याचीच द्वितीयावृत्ती २००४ मध्ये निघाली. ललित लेखसंग्रहाला डॉ. श्रीकांत तिडके यांची प्रस्तावना लाभली असून त्यात त्यांनी ललित गद्याचे स्वरूप उलगडले आहे .प्रा. ना.सी.फडके यांच्या 'गुजगोष्टी' पासून आजचे ललितगद्य सुरू झाले ते आता कोणत्या टप्प्यावर आले आहे याचा उल्लेख डॉ.तिडके यांनी केला आहे. एकूण आठ ललित लेखांनी त्यांचा हा ललितबंध सजला असून त्या लेखातून लेखकाची समाजसन्मुखता,जुने संस्कार,जुन्या चालीरिती पुसट होत असल्याची खंत, बदलते ग्रामीण वास्तव, सामाजिक बांधीलकी, नातेसंबंधाची उसवलेली वीण ,यासोबतच निसर्गाचा घमघमणारा सुवास वाचकाला आकृष्ट करतो. आत्मनिष्ठ स्वानुभवकथनामुळे या लेखनाला आगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

प्रकृतीने मूलत: कवी असलेल्या डॉ. चवरे यांना जीवनानुभवाचा व्यापक पट वाचकांसमोर उलगडावयाचा असल्यामुळे अल्पाक्षर,व्यंगार्थसूचक कवितेपेक्षा ललित गद्याचा आश्रय त्यांनी घेतला. मनात दाटून असलेल्या भावोर्मी त्यांनी या प्रकारातून व्यक्त केल्या. ललित साहित्य हे आनंददायी,प्रेरक व सर्जनशील असते. त्यामुळेच या साहित्याला 'प्रतिभाशक्तीने प्रेरीत केलेले व आनंद देणारे लेखन म्हणजे ललित साहित्य' असे म्हटले जाते.'ललित' या विशेषणाचा अर्थ सुंदर,आल्हादक,आकर्षक,असा आहे. व हे विशेषण अर्थपूर्ण आहे. ''स्वरूपाची सुंदरता व परिणामाची आनंददायकता ललित साहित्यात असली पाहिजे.'सुंदर' हा शब्द वास्तविक सौंदर्यशास्त्रातील एक वादग्रस्त संज्ञा आहे. परंतु ललित साहित्य व ललित कला यांच्या मौलिक विशेषाचे वर्णन स्थूलमानाने 'सुंदर' व म्हणूनच ललित या शब्दाने केले जाते. डॉ. चवरे यांच्या प्रस्तुत ललितबंधातही लालित्याची अनेक उदाहरणे आढळतात. पण त्याहीपेक्षा अधिक उदाहरणे वाचकाला विचारप्रवण,कृतिप्रवण करणारी,वास्तवतेतील दाहकता चितारणारी आहेत. येथे अनुभवाचे गद्यप्राय शब्दांकण वाचकाभिमुख झाल्याचे जाणवते.

१९४५ नंतर ललित निबंधाला प्रा.ना.सी.फडके यांच्या 'गुजगोष्टी' पासून प्रारंभ झाल्याचे मानले जाते. या कालखंडात फडके यांच्या सोबतच वि.स.खांडेकर, कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत या अनेक ललित निबंध लेखक—लेखिकांनी ललित निबंधलेखनाची कक्षा विस्तारण्याचे काम केले आहे. त्यांच्या निबंधांमधून ध्येयवाद,चिंतनशीलता,जागतिक पातळीवरील संदर्भाची रेलचेल, आनंददायी जीवनदृष्टी ,संवेदनशीलता ही वैशिष्टये विशेषत्वाने आढळतात. ललित गद्य लेखनात दुर्गाबाईंनी स्वत:चे असे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांच्यानंतर पुढे श्रीनिवास कुळकर्णी,अनिल अवचट, रविंद्र पिंगे या लेखकांनी ललित लेखनाला पुढे नेले आहे. आजवर अनेक ललित लेखकानी त्यात मोलाची भर घातली आहे. मात्र, दुर्गाबाईंच्या व्यासपर्व, पैस,ऋतुचक्र या ललितगद्यपर ग्रंथाचा विचार न करता पुढे जाता येऊ नये , एवढे महत्त्व त्यांच्या ललित गद्याला लाभले आहे. डॉ. चवरे यांच्या 'ऋतुरंग' ने त्यात मोलाची भर घातली आहे.

समाजाकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी त्यांना लाभली असल्यामुळे दुर्लक्षित, अपरिचित, अतीपरिचित अशा विषयाकडे ते वळतात. इतरांचे लक्ष ज्याकडे सहसा वळत नाही, अशा विषयाकडे ते आपली दृष्टी वळवितात आणि अत्यंत जीवंत आणि बोलक्या प्रतिक्रिया त्यातून व्यक्त करतात. वाचकांच्या मनाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनातून जाणवते. त्यांच्या ललितबंधातील 'दोन धृव' हा त्यांचा पहिला ललितलेख.

असतेपणाचे दु:ख मानणा—यांनी नसतेपणात समाधान मानणा—यांकडे बघावे,म्हणजे माणसे कशी सुखी असतात हे दिसेल. सुखवस्तु कुटुंबातीत व्यक्तीची सुखासाठी चाललेली धडपड, पिलांना चारा भरविणारी चिमणी आणि रखरखत्या उन्हात अनवाणी रस्स्ता तुडविणारे दांपत्य हे त्रिकूट निर्माण करून माणसांची बदललेली जीवनशैली व माणसाची असंवेदनशीलता टिपली आहे. व्यक्तींचे नेमके, हुबेहुब चित्र रेखाटण्याची कला त्यांना चांगली अवगत असल्याचे जाणवते. या लेखातून त्यांनी चंगळवादी मनोवृत्तीच्या माणसांची भौतिक सुखलोलुपता वेगळेच वळण घेताना दाखविली आहे.तर कष्टक—याची निसर्गाच्या ऋतुचक्राच्या स्थित्यंतराशी समायोजन साधणारी जणू प्रगल्भ मानसिकता अतिशय बोलका आशय व्यक्त करणारी आहे.

'मंतरलेले दिवस' या लेखामध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच्या आठवणी सांगितल्या आहेत. निसर्गातील बदलाशी सांगड घालत त्यांनी आपला अनुभवकोष विणला आहे. ऋतूमानाप्रमाणे निसर्गात अनेक परिवर्तने होत राहतात, महाविद्यालयीन जीवनही असेच परिवर्तशील असते. मित्र—मैत्रिणींच्या सुखद सानिध्यात दिवस कसे निघून जातात ते कळत नाही. झोपाळयावाचून झुलायचे दिवस संपून जबाबदारी पेलणा—या दिवसात कधी पदार्पण केले ते समजतही नाही. अशा हर्षामर्षाच्या दिवसाचे काव्यात्म प्रतिपादन त्यांनी केले आहे. तारूण्यसुलभ भावनांचे काव्यात्म प्रकटीकरण असे काहीसे रूप या ललितबंधास लाभले आहे.' उन्हाची झळ सोसण्यासाठी रात्रीचं शीतल चांदणं ती प्राशन करीत होती' अशा वाक्यांना काव्यपंक्तीचे वैभव लाभले आहे. 'अस्थि' या ललित लेखामधून व्यक्तिगत भावनाचा तपशील लेखकानी मांडला आहे. निसर्ग हा मूळातच निर्मळ, निरामय, निरिच्छ याउलट माणूस , त्याच्या जगण्या—वागण्याच्या त—हा वेगळयाच! आहे त्यात समाधान शोधण्यापेक्षा नाही त्याचे दु:ख करण्याची माणसांना सवय लागलेली असते. चांगल्या गोष्टींचे बीजारोपण सहजतया होत नसते, वाईट बाब मात्र झुडपांसारखी अस्ताव्यस्त,बेडौल वाढते. अत्यंत शोचनीय परिस्थितीत आयुष्य घडविताना पराकोटीच्या यातना सहन कराव्या लागल्या पण कुणालाही दोष न देता त्या सहन करणे व कालमहिमा बदलल्यानंतर स्वत:मध्ये किंचितही बदल न करणे याला माणुसकी शिवाय दुसरे नाव देता येत नाही. अर्थात कष्टाने मिळालेल्या मीठ—भाकरीत फुकाने पुरणपोळीपेक्षा अधिक गोडवा असतो. बदलत्या ऐषआरामी जीवनात कष्टाला हीन लेखण्याकडे कल असल्यामुळे झगमगाटाला महत्त्व प्राप्त झाले आहे, याचे आणि उसवलेल्या नात्याचे प्रतिबिंब यात उमटलेले आहे.

डॉ. रा.गो. चवरे यांचे ललित लेख काव्यात्मतेशी नाते सांभाळणारे आहेत. त्यांच्या ललित लेखामध्ये ' रस्ते ' हे अतिशय सुंदर असा ललित लेख आहे. वाटा होत्या तोपर्यत 'वाट पाहणे' होते. वाटांच्या सडका झाल्यात. सासुरवाशीणीला वाटेचा वाटसरू आपला वाटायचा. रस्ते डांबरी झाले आणि त्यांनी जगण्यातील सगळा आनंद हिरावून घेतला. अपघाताला निमंत्रण देणा—या रोडने रूक्ष,कंटाळवाणेपण बहाल केले. निसर्गाशी सन्मुख असलेले ग्रामजीवन वाटांनी सुशोभित वाटायचे आता धकाधकीच्या काळात माणसातील सौंदर्यदृष्टीच लोप पावत असल्याचे अनुभवास येते. निसर्गसन्मुख ग्रामजीवन आणि निसर्गविन्मुख शहरी जीवन यांच्यातील बदलाचे सूचक दर्शन या लेखात घडवले आहे. काव्यात्म शैली हा या लेखाचा उल्लेखनीय विशेष आहे. 'एक पाय घरात ... एक पाय दारात ' हा खेडयापाडयात पौर्णिमेच्या शीतल,पिठूर प्रकाशात खेळला जाणारा खेळ. त्यावेळी केवळ त्याला खेळाचेच रूप प्राप्त झाले होते. आजच्या बदलत्या व्यवहाराच्या धकाधकीच्या काळात त्या खेळासारखीच माणसाची गत झाल्याची खंत, लेखक सहजच बोलून दाखवितात. अनेक व्यवधाने सांभाळताना जीव मेटाकुटीला आला आहे, हे जगण्यातील दाहक वास्तव प्रकर्षाने व्यक्त केले आहे.

'शहानूर प्रकल्पावरील एक रात्र' हे स्थळवर्णन असो की, 'दीक्षाभूमी ते यक्षभूमी' या लेखातून केलेली दोन स्थळांची तुलना असो ती कवितेच्या अंगाने व्यक्त होत असल्याचा प्रत्यय येतो. शहानूर परिसरातील आनंद व्यक्त करताना लेखक सहजच म्हणतात, 'मानवी तनामनात हा गारवा उतरत जाईल. आयुष्य जणू आकाश होउन त्यात चांदण्याचं सुखाच निदान झिरपत राहील. 'दीक्षाभूमी ते यक्षभूमी' यात ते अत्यंत काटेकोर शब्दात दोन्ही स्थळांची तुलना करतात व त्यांची वैशिष्टये नोंदवितांना ते म्हणतात, ' एकीत जीवनाचं शांतवन. अवतीभवती विश्रब्धता, दुसरीत धुंद उन्मुक्तता. एकीत निरामयता.दुसरीत निरागसता. एकीत सात्वीकता. दुसरीत अल्लडता.' नेमके आणि चपखल शब्दयोजना कशी करावी याचा आदर्श वस्तुपाठच यातून मिळतो.

डॉ. चवरे यांचा मूळ पिंड कवीचा असल्यामुळे त्यांच्यातील ललितलेखकावर कवी हुकूमत गाजविताना दिसतो. त्यांच्या ललितबंधातील लेखांमध्ये समाजसन्मुखता, आत्मनिष्ठा, प्रसंगरेखाटनातील कौशल्य,घटनाप्रसंगांचे जीवंत रेखाटन, निसर्गाशी समरस झालेली त्यांची काव्यवृत्ती, बालकाच्या आश्चर्यातिरेकाने निसर्गाची रूपे न्याहाळणारी जिज्ञासूवृत्ती, रसिकांच्या मनावर प्रभाव टाकणारी शब्दरचना इ.अनेक वैशिष्टयांमुळे हा ललितबंध वाचनीय ठरला आहे. या लेखसंग्रहात त्यांनी अनेक शब्दरूपे नव्या स्वरूपात व्यक्त केली आहेत. उदा०

भरारली,मळसर,चिंबलेलो, संध्याकाळलेल्या,झगमगाटिचा,प्रवासणाऱ्या इ. अर्थात यामुळे आशय समृद्धच झालेला आहे. काव्यात्म वाक्यरचना हाही त्यांच्या ललित लेखनाचा उल्लेखनीय विशेष आहे.
उदा० १. तिनं आपल्या थकलेल्या पायांच्या चाकाला थोडी गती दिली!
२. कधी कधी प्रश्नांचे अंकुरणेही निरवतेला गालबोट लावून जाते.
३. धुंद निशिगंधाचा परिमजल दरवळतो. ओंजळभर फुलांचा तिच्या तलमकेतकी देहावर वर्षाव होतो.
४. आभाळाच्या एकजात मोहरलेल्या वेलीवर चांदण्यांची अमाप फुलं फुललेली!
५. झाडाच्या शिरोभागी चांदणं अंथरलेलं दिसत होतं. अशा काव्यात्म अवतरणांमुळे या लेखांना आगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. रा.गो. चवरे, ऋतुरंग, इसाप प्रकाशन,नांदेड, द्वितीयावृत्ती, २००४.
२. रा.ग. जाधव, वाड्.मयीन निबंधलेखन: स्वरूप आणि साधने, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,३० तृतीयावृत्ती १९८७
३. अ.ना.देशपांडे, आधुनिक मराठी वाड्.मयाचा इतिहास, भाग दुसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे ३०, पुनर्मुद्रण जानेवारी, १९७९
४. प्रा.डॉ. आर.एस. घोडे, प्रा.रा.ना. घाटोळे, मराठी वाड्.मयीन निबंधलेखन, श्रीगजानन प्रकाशन, महाल, नागपूर, २ प्रथमावृत्ती, १९९२—९३

❖❖❖

# प्रारंभीच्या कादंबरीप्रवासातील वळणे

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## सारांश

अव्वल इंग्रजी कालखंडात अवतरलेली व अनुकरणात अडकलेली कादंबरी कालांतराने स्वतंत्र आणि लोकप्रिय झाली. १८४१ मध्ये हरी केशवजींची 'यात्रिक क्रमण' ही भाषांतरित कादंबरी मराठी कादंबरीच्या निर्मितीचा आणि वाटचालीचा खरा प्रारंभ होता. १८५७ मध्ये बाबा पद्मनजींनी 'यमुना पर्यटन अथवा हिंदू विधवांच्या स्थितीचे निरूपण' या पहिल्या स्वतंत्र सामाजिक कादंबरीची निर्मिती केली. 'यमुना पर्यटन' कादंबरीच्या निर्मितीनंतर पाच वर्षांनी आलेली लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्‌भुतरम्य कादंबरी अत्यंत लोकप्रिय झाली. १८६१ ते १८८५ हा काळ तर 'मुक्तामालायुग' म्हणून ओळखला जातो. अद्‌भुतरम्य कादंबऱ्यांनी जोर पकडला असताना ऐतिहासिक कादंबरी हा प्रकार पुढे आला. रा.भि. गुंजीकरांची 'मोचनगड', वि.ज. पटवर्धनांची 'हंबीरराव व पुतळाबाई', ना.वि. बापटांच्या 'संभाजी' आणि 'चितुरगडाचा वेढा' या कादंबऱ्या गाजल्या. १९३९ साली प्रकाशित झालेल्या 'रणांगण' या विश्राम बेडेकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण कादंबरीमुळे मराठी कादंबरीला एक नवे चैतन्यदायी वळण मिळाले. समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी रंजनवादी कादंबरी पुढे आणली. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळून नायक–नायिकेची भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद–ताटातूट –विरह–पुनर्मिलन हा मार्ग तसेच आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र रंजनवादी कादंबरीचे होते. साधारणतः १९३५ ते १९४० च्या दरम्यान मराठी प्रादेशिक कादंबरीचा आणखी एक प्रवाह आला. प्रादेशिक कादंबरी ही व्यक्तिप्रधान कादंबरीच्या अगदी विरुद्ध टोकाची होती. १९३९ साली र.वा. दिघे यांनी 'पाणकळा'ची निर्मिती करून मराठी प्रादेशिक कादंबरीचा पाया रचला. र.वा. दिघे, श्री.ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकरांच्या प्रादेशिक कादंबरीने हा प्रकार अत्यंत लोकप्रिय केला. व्यक्ती आणि समाज यांच्यातील परात्मतेच्या जाणिवेतून मराठी कादंबरीत अस्तित्ववादी कादंबरीचा प्रवाह निर्माण झाला. 'कोसला', 'बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'वासुनाका', 'कोंडुरा' अशा कादंबऱ्यांतून या अस्तित्ववादी जाणिवा दिसून पडतात. एकंदरीत विविध लेखकांनी कादंबरीचे विविध प्रकार लीलया हाताळून मराठी कादंबरीला समृद्ध केले.

**बीजशब्द** : मराठी कादंबरी, उदयकाल, सामाजिक, अद्‌भुतरम्य, ऐतिहासिक, प्रादेशिक, अस्तित्ववादी

## प्रस्तावना

खऱ्या अर्थाने मराठी कादंबरी अव्वल इंग्रजी कालखंडात अवतरली. कथा व कादंबरी यांच्या तांत्रिक भेदांविषयी संभ्रमावस्थेतच मराठीत कादंबरी प्रकार रूढ झाला. सरुवातीला चाचपडत आणि अनुकरणातून निर्माण झालेला तसेच भाषांतरित, अद्‌भुत, ऐतिहासिक आणि सामाजिक परिघात फिरणारा हा प्रकार कालांतराने स्वतंत्र आणि लोकप्रिय झाला. कथा हा प्रकारही प्रगत झालेला नव्हता. गोष्ट म्हणजे छोटी कादंबरी आणि आणि मोठी गोष्ट म्हणजे कादंबरी असे काहीसे समीकरण जोडले जायचे. 'अनेक कथा मिळून एक कादंबरी तयार होत नाही किंवा एका कादंबरीतून अनेक कथा तयार करता येणार नाहीत हा ग्रंथविचार पुस्तकी पांडित्याचा ठरावा असे पुरावे या काळात मिळतात.... कथेच्या गुंफणीतून कादंबरीच्या रचनेकडे वळायचे हा या काळातील बहुविध कादंबऱ्यांचा एक विशेष म्हणावा लागेल.'[१] या कालखंडातील मराठी कथा या बऱ्याच प्रमाणात भाषांतरित, अनुकरणातून उगम पावलेल्या किंवा अद्‌भुतरम्य आहेत.

१८१८ च्या सुमारास परकीय सत्तेने घट्ट पाय रोवल्यानंतर अनुकरण आणि अद्‌भुतरम्यतेबद्दल आत्मीयता असल्याच्या बाल्यावस्थेतील पाऊलखुणा मराठी कथावाङ्मयात दिसतात. मराठी कादंबरीच्या उत्क्रांतीची ही पूर्वतयारी होती.

## उदयकालातील मराठी कादंबरी

१८४१ मध्ये हरी केशवजींनी बनियनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या ख्रिस्तीधर्माविषयी कल्पनांवर आधारित कादंबरीवरून 'यात्रिक क्रमण' ही कादंबरी भाषांतरित केली. हा मराठी कादंबरीच्या निर्मितीचा आणि वाटचालीचा खरा प्रारंभ होता. इहलोकांपासून परलोकात केलेले यात्रिक क्रमण स्वप्नाच्या रूपकाने या कादंबरीत कथन केले आहे. लेखकाने आपला इंग्रज उपकारकर्ता फॅरिससाहेब यांच्या आग्रहावरून या कादंबरीची निर्मिती केली, असा उल्लेख आढळतो.

मराठी कादंबरीच्या उदयकालात भाषांतरित अथवा अनुवादित, सामाजिक, अद्‌भुतरम्य, ऐतिहासिक अशा प्रकारात कादंबरी होती.

## सामाजिक कादंबरी

१८५७ मध्ये बाबा पद्‌मनजींनी 'यमुना पर्यटन अथवा हिंदू विधवांच्या स्थितीचे निरूपण' या पहिल्या स्वतंत्र सामाजिक कादंबरीची निर्मिती केली. महाराष्ट्रातील ब्राम्हण विधवांच्या तत्कालीन स्थितीचे हृदयाला पाझर फोडणारे चित्रण यात आहे. पहिले भौगोलिक व दुसरे वैचारिक अशा नायिकेच्या द्विविध पर्यटनाची कथा यात आहे. 'समाजपरिवर्तनाबद्दल उत्कट आकांक्षा, सहृदयता व भाषेची अनलंकृत सरलता या सर्व गोष्टींत बाबा पद्‌मनजींची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी म्हणजे हरी नारायण आपट्यांच्या वाङ्मयकृतीचे पूर्वचिन्ह होय.'[२] हा मराठी सामाजिक कादंबरीचा उदय अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरला.

१८८१ मध्ये वि.को. ओक यांची 'शिरस्तेदार' आणि १८८४ मध्ये म.वि. रहाळकरांची 'नारायण व गोदावरी' या पूर्णत: सामाजिक कादंबऱ्या म्हणून पुढे आल्या. 'नारायण व गोदावरी' या कादंबरीला श्री.कृ. कोल्हटकरांनी पहिली स्वतंत्र व्यावहारिक कादंबरी म्हटले आहे.

## अद्‌भुतरम्य कादंबरी

१८६१ मध्ये म्हणजेच 'यमुना पर्यटन' कादंबरीच्या निर्मितीनंतर पाच वर्षांनी लक्ष्मणशास्त्री हळबे यांची 'मुक्तामाला' ही अद्‌भुतरम्य कादंबरी आली आणि ती अत्यंत लोकप्रिय झाली. १८६१ ते १८८५ हा काळ तर 'मुक्तामालायुग' म्हणून ओळखला जातो. या वीस–पंचवीस वर्षांत निर्माण झालेल्या कितीतरी कादंबऱ्यांवर 'मुक्तामाला'चीच छाप दिसून येते. संकट, साहस, योगायोग, सुटका अशा सुसंगत साखळीत आलेले सुटसुटीत कथानक प्रथमच कादंबरीतून प्रकट झाले होते. यात शांतवर्मा नावाच्या जहागिरदाराच्या 'मुक्तामाला' नावाच्या एकुलत्या एका मुलीचे लग्न भयानक राजाच्या दुय्यम प्रधान असलेल्या धनशंकरशी होते. धनशंकरच्या वशिल्याने नोकरीला लागलेल्या शांतवर्माच्या शुक्लाक्ष नावाच्या पुतण्याला शांतवर्मा याची संपत्ती आपल्याला मिळावी अशी इच्छा असते. मुक्तामाला जन्माला आल्याने त्याची इच्छा पूर्ण होणे अशक्य असते. तो धनशंकर आणि मुक्तामाला यांची ताटातूट करून त्यांच्या आयुष्यात संकटे निर्माण करतो. योगायोगाने विविध संकटांतून त्यांची सुटका होते. शुक्लाक्षाला त्याच्या कृत्याबद्दल शासन होते आणि धनशंकर–मुक्तामालाचे मीलन होते, असे कथानक यात आहे 'मुक्तामाला'चे घटनाप्रधान कथानक अव्वल इंग्रजी काळातील कथा–कादंबऱ्यांमधील मुख्य प्रवृत्तींची जाणीव करून देते.पुढे १८६६ पासून 'रत्नप्रभा', 'मंजुघोषा', 'विश्वासराव', 'मंदाकिनी', 'विलासिनी', 'चंद्रकांत', 'विचित्रपुरी', 'मित्रचंद्र', 'वसंतकोकिळा', 'हिरालाल', 'प्रेमबंधन', 'सुवर्णमालिनी', 'शृंगारमंजिरी', 'मदनमंजिरी' अशा कितीतरी अद्‌भुतरम्यतेचा पुरस्कार करणाऱ्या घटनाप्रधान कादंबऱ्यांची निर्मिती झाली. 'राजा मदन' ह्या शोकान्तिकेव्यतिरिक्त अन्य कादंबऱ्या नीतिमान नायकाचा व विचारांचा विजय व दुष्ट प्रवृत्तींचा संहार हाच शेवट आढळतो.

## ऐतिहासिक कादंबरी

अद्‌भुतरम्य कादंबऱ्यांनी जोर पकडला असतानाच ऐतिहासिक कादंबरी हा प्रकारही पुढे आला. इंग्रजी ग्रंथांच्या परिशीलनाने नवी पिढी अद्‌भुतापासून काहीशी दूर जाऊन वास्तवाभिमुख होत गेली. विविध ठिकाणी घडून गेलेल्या ऐतिहासिक घटनांची उजळणी आणि ब्रिटिशांविरुद्ध होत चाललेल्या घडामोडींमुळे जनमानसावर

सखोल परिणाम होत गेला. इतिहासाचे दाखले जे वास्तव होते, त्यात सुशिक्षितांच्या पिढीला रस वाटू लागला. या गरजेतून ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती झाली जी अद्‌भुतरम्यता आणि वास्तव यांच्यातील एक कडी होती.

१८७१मध्ये स्कॉटच्या कादंबऱ्यांचा प्रभाव असलेल्या रा.भि. गुंजीकरांची 'मोचनगड' ही ऐतिहासिक कादंबरी आली. ग्रँट डफचा इतिहास रा.भि. गुंजीकरांपुढे उपलब्ध होता. कुसुमावती देशपांडे यांच्या मते ही कलाकृती ऐतिहासिक कादंबरीची खरी प्रकृती आहे. या साहित्याला स्वत: लेखकाने काल्पनिक कादंबरी म्हटले असले तरी प्रियोळकरांच्या मते ही आदर्श ऐतिहासिक कादंबरी आहे. नरहर कुरुंदकर मात्र या विधानाला नाकारतात. त्यांच्या मते, 'मोचनगड ही कोणतीही नवी परंपरा सुरुवात करणारी कादंबरी नाही. ती मुक्तामालेच्या परंपरेतील तिच्यातील काही तांत्रिक अंगांचा विकास करणारी व रंजकदृष्ट्या तिच्याही पेक्षा कमी असणारी अशी कादंबरी आहे.'[३]

१८५७ च्या युद्धाच्या कथासूत्राशी जोडून वि.ज. पटवर्धनांनी 'हंबीरराव व पुतळाबाई' ही एक कादंबरी १८७३ मध्ये लिहिली. ना.वि. बापटांनी याच कालखंडात 'संभाजी' आणि 'चितुरगडाचा वेढा' या कादंबऱ्या लिहिल्या. १८८३ मध्ये रणदिव्यांनी 'शिक्षक' ही कादंबरी लिहिली. त्यात अव्वल इंग्रजी काळ, पेशवाई अखेरची राजकीय स्थिती, लॉर्ड डलहौसीची संस्थाने खालसा करण्याची नीती व त्यामुळे संस्थानांवर झालेले परिणाम वर्णन केले आहेत. १८८४ मध्ये श.मो. रानडे यांची 'शिलादित्य भाग १' ही कादंबरी आली. त्यात आंध्र प्रदेशातील हिंदू राजाच्या कारकिर्दीतील छळाला कंटाळून जैन व बौद्ध बंडाला कसे प्रवृत्त होतात, हे दर्शविले आहे. अशा काही मोजक्या कादंबऱ्यांव्यतिरिक्त या काळात फारशा ऐतिहासिक कादंबऱ्या पुढे आल्या नाहीत.

## कादंबरीप्रवासातील काही नवी वळणे

१९३९ साली प्रकाशित झालेल्या 'रणांगण' या विश्राम बेडेकरांच्या वैशिष्ट्यपूर्ण कादंबरीमुळे मराठी कादंबरीला एक नवे चैतन्यदायी वळण मिळाले. संज्ञाप्रवाहात्मक पद्धतीने लिहिलेल्या या कादंबरीत लेखकाने आपले विचार जसेच्या तसे उतरवलेले दिसतात. जे जे अनुभवले ते ते तसेच्या तसे मांडणी न करता उतरवले. अशा पद्धतीची ही कादंबरी अखिल कादंबरीविश्वाला वेगळा अनुभव देऊन गेली. केवळ ११ दिवसांच्या बोटीवरील प्रवासाच्या कालावधीत घडणारी हार्टा आणि चक्रधर यांच्या प्रेमजीवनाची कथा या कादंबरीत आली. हे प्रेम नेहमीसारखे वाचकांना सुखावणारे नव्हते, तर त्यांना अंतर्मुख करून जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी विशाल करणारे होते. वैश्‍विक पार्श्वभूमी लाभलेली ही प्रेमकथा हार्टाची शोकांतिका आणि सोबतच जर्मन, ज्यू आणि संपूर्ण मानवजातीची शोकांतिका ठरते. माणसातील पशूपातळीवर उतरलेले क्रौर्य, माणसांनीच माणसाला अगतिक बनविल्याचे विदारक चित्र, मन विषण्ण करणारे अनुभव या कादंबरीत पहायला मिळतात. बेडेकरांनंतर बा.सी. मर्ढेकरांनी 'रात्रीचा दिवस' १९४२ या कादंबरीतून संज्ञाप्रवाहाचा प्रयोग केलेला आहे. 'ह्या लेखनवैशिष्ट्याचे मुख्य म्हणज संपूर्ण मनाचे दर्शन. हे दर्शन बेशिस्त, विस्कळीत असेल. त्याच्या प्रतिमासृष्टीत सुबोधता नसेल. मनात उद्  भुत होऊन नीतीच्या दडपणाखाली क्षीण होणारे अनेक असभ्य, अमंगल, अश्लील प्रतिक्रियांचे दर्शन घडेल. हेही दर्शन निर्भयपणाने घेणे हा या संज्ञाप्रवाही कादंबरीचा हेतू म्हणावा लागेल.'[४]

वसंत कानेटकरांनी याच पद्धतीचा वापर करून 'घर' १९५०, 'पंख' १९५३, 'पोरका' १९५७ या तीन कादंबऱ्यांची निर्मिती केली. मुंबईतील घरांची टंचाई, मेंदूचा विचित्र विकार जडलेला एक नाट्यवेडा पांडूमास्तर, गुन्हेगारी विश्व असे विषय त्यांनी या कादंबऱ्यांतून हाताळले. संज्ञाप्रवाहामुळे या विषयात सखोलपणाने विचार मांडलेला आहे. मानवाच्या अशा प्रसंगी होणाऱ्या मानसिक आंदोलनाची प्रतिबिंबे या कादंबऱ्यांत दिसतात. यापूर्वीची कादंबरी पात्रांचे संवाद, प्रसंगांची रेलचेल यांतून साकारणारी होती, तर ही नवी कादंबरी छोटासा प्रसंग, कमीतकमी संवाद, कमीतकमी कालावधी आणि प्रचंड मानसिक उलथापालथ यांनी भरलेली होती.

## रंजनवादी कादंबरी

हरिभाऊंच्या कालखंडातच ना.सी. फडक्यांनी आणि खांडेकरांनी कादंबरी लेखन सुरू करून समाजाभिमुख प्रश्नानिष्ठ कादंबरीकार वा.म. जोशी, केतकर, वरेरकर यांच्यापेक्षा वेगळा प्रकार हाताळून अल्पावधीतच हरिभाऊंसह या सर्वांपेक्षा अधिक लोकप्रियता मिळवली. समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दु:खाला कंटाळून कल्पनाविश्‍वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली. नायक–नायिकांच्या भेटीगाठी, ओळख, सहवास, मैत्री, यातून निर्माण होणारे प्रेम, कधी भांडणे,

विरह, पुनर्भेटी अशी वर्णने वाचकांना मोहविणारी होती. कधी रहस्य, संकट, साहस, योगायोग, सुटका यांचीही त्यात पेरणी असायची. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातही क्रांतिकारकांचे आदर्श डोळ्यापुढे असल्याने अनेक रंजनवादी कादंबऱ्यांमध्ये हे विषय किंवा पात्र निर्माण करण्यात आले. तारुण्य, प्रेम, शृंगार, प्रणय अशा विषयांना रंजकतेने वर्णिल्याने या कादंबऱ्या नव्या पिढीला आकर्षित करीत होत्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात एक लढाई संपून समाधानाचे आयुष्य काढण्याची स्वप्ने पाहणाऱ्या समाजाला विरंगुळा हवा होताच आणि तो या रंजनवादी कादंबऱ्यांनी मिळवून दिला.

खांडेकरांच्या कादंबरीतही रंजनवाद आहे; पण फडक्यांपेक्षा काही बाबतीत वेगळा आहे. कादंबरी रंजक होण्यासाठी त्यांनी फडक्यांसारखी उत्कंठा आणली; पण त्यापेक्षाही भाषेच्या बाजूने त्यांची कादंबरी फडक्यांपेक्षा पुढे निघून गेली. कोल्हटकर, गडकरी यांच्या भाषाशैलीचा विलक्षण परिणाम खांडेकरांवर झाला होता. त्यांच्या कादंबऱ्यांत सुभाषितवजा वाक्ये सर्वत्र विखुरलेली दिसतात. गांधीवादावर असीम श्रद्धा असल्यामुळे त्यांच्या कादंबरीतील नायक गरिबीत राहून देशाची सेवा करण्यात आनंद मानणारे आहेत. 'अश्रू', 'कांचनमृग', 'उल्का', 'रिकामा देव्हारा' या कादंबऱ्यांतील नायक खांडेकरांच्या मन:सृष्टीतून निर्माण झालेले आहेत, त्यामुळे खांडेकरांचे स्वप्न, ध्येय, मार्ग ते अनुसरताना दिसतात. खांडेकरांनी काही कादंबऱ्यांतून रहस्यमयता, खून, मारामाऱ्या, अपघात, विषप्रयोग अशा विषयांनीही रंजकता वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'हृदयाची हाक', 'हिरवा चाफा' यांतून खांडेकरांनी ही वेगळी आवड जोपासली; पण मर्यादित प्रमाणात. त्यांची मूळ गांधीवादी विचारसरणी त्यांचे संपूर्ण कादंबरीविश्व व्यापून उरली आहे.

ग.त्र्यं. माडखोलकरांच्या 'स्वप्नांतरिता', 'अनघा', 'अरुंधती', 'रुक्मिणी' या चारही कादंबऱ्या नायिकाप्रधान असून त्याच त्या गोष्टींचा पुन:प्रत्यय येतो. समकालीन राजकारणाचे व्यापक चित्रण, क्रांतिकारकांविषयी आत्मीयता आणि उग्र शारीरिक प्रेम हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विशेष. कादंबरीच्या कथानकाशी किंवा एकंदर प्रकृतीशी राजकारणाचा मेळ बसतो की नाही याचा विचार न करता त्यांनी हे लिखाण केले आहे. 'रुक्मिणी'मध्ये उत्तरार्धात जे राजकारण आले आहे, ते कथानकाशी ठिगळवजा जुळले आहे की काय असे वाटते. 'आरंभीचे भाग चटका लावणारे व कथानकाला ओघ देणारे असले तरी नंतरचा बराचसा भाग आगंतुक वाटतो किंवा कदाचित 'राजकीय कादंबरीकार' हे आपले लौकिकप्राप्त व्यक्तिमत्त्व लेखकाला विसरावेसे वाटत नसल्यामुळेही असे झाले असावे.'[५]

स्वातंत्र्योत्तर काळात समकालीन वाचकांच्या आवडीनिवडी आणि सुखासीन कादंबरीकडे तरुणांचा ओढा लक्षात घेऊन फडके, खांडेकर, माडखोलकर अशा कादंबरीकारांनी लेखन केले. जीवनातील दु:खाला कंटाळून कल्पनाविश्वात रमणाऱ्या सुशिक्षित तरुण वाचकांची नस या साहित्यिकांनी अचूक पकडली. 'प्रेम' हा विषय मोठ्या प्रमाणावर हाताळून नायक–नायिकेची भेट–ओळख–प्रेम–भेटीगाठी–वाद–ताटातूट –विरह–पुनर्मिलन हा मार्ग तसेच आदि–मध्य–अंत याच पद्धतीने शेवट गोड करणे, हेच तंत्र स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय रंजनवादी कादंबरीचे दिसते.

## प्रादेशिक कादंबरी

साधारणत: १९३५ ते १९४० च्या दरम्यान मराठी कादंबरीत आणखी एक प्रवाह आला आणि त्याला पुढे प्रादेशिक कादंबरी म्हणून ओळखले गेले. प्रादेशिक कादंबरी ही व्यक्तिप्रधान कादंबरीच्या अगदी विरुद्ध टोकाची होती. सुधारलेल्या जीवनापासून दूर जाणारे मागासलेले जीवन, तिथला मानवसमूह, त्यांच्या विशिष्ट बोली, चालीरीती, तिथला निसर्ग अशा बाबींनी वैशिष्ट्यपूर्ण असणारी ही प्रादेशिक कादंबरी होती. समूह हाच मुख्य असायचा. समूहमनाचा गजर ऐकू यायचा. निसर्ग हा केवळ सौंदर्याचा आविष्कार म्हणून येथे नसायचा तर तर तो एक महत्त्वाचे पात्र म्हणून रंगवलेला असायचा. अशी ही प्रादेशिक कादंबरी उदयाला आली.

१९३९ साली र.वा. दिघे यांनी 'पाणकळा'ची निर्मिती करून मराठी प्रादेशिक कादंबरीचा केवळ पायाच रचला नाही तर कातोड्यासारख्या वन्यजमातीच्या सरस चित्रणाचे श्रेयही त्यांनी मिळविले. पुढे त्यांनी १९४३ मध्ये निर्माण केलेली 'सराई' ही दुसरी प्रादेशिक कादंबरीही वैशिष्ट्यपूर्ण होती. यातील रानावनात मनमोकळा विहार करणारी निसर्गकन्या 'लाडी' विवाह बंधनात गुंतत नाही; परंतु प्रेमपाशात लगेच गुरफटते. अ.ना. देशपांडे म्हणतात, 'सराईतील लाडीची व्यक्तिरेखा तर केवळ अविस्मरणीय वाटते. लाडी निर्माण करून र.वा. दिघे यांनी व्यक्तिचित्रण कौशल्याचा उच्चांक गाठला असे दिसून येते.'[६]

पुढे श्री.ना. पेंडसे यांच्या 'हद्‌पार' (१९५०), 'गारंबीचा बापू' (१९५१), हत्या (१९५७), 'रथचक्र' (१९६२), इत्यादी कादंबऱ्यांमधून वाचकांना कोकणच्या निसर्गरम्य भूप्रदेशाचे दर्शन घडते. कोकणच्या एका विशिष्ट पट्टीवर लेखकाचे निरतिशय प्रेम आहे. हर्णे, मुरुड, आंजर्णे, मुर्डी ही बंदरपट्ट्याची गावे आणि दापोली या त्रिकोणावर त्यांनी हाडामासाच्या माणसाप्रमाणे प्रेम केले, असे तेच सांगत असत. कोकणचा परिसर त्यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांमधून ओतप्रोत भरलेला दिसतो.

गो.नी. दांडेकरांनीही कोकणच्या पार्श्वभूमीवर कादंबऱ्या लिहिल्या. 'पडघवली' (१९५५) ही कोकणातील एका नष्ट होऊ पाहणाऱ्या गावाची कहाणी. प्रस्तावनेतच लेखक म्हणतात, 'सगळ्याच ग्रामसंस्था उद्ध्वस्त झाल्या आहेत.... प्राचीन समाज व्यवस्थेवर हे जे वादळ कोसळले आहे त्याचा साक्षी होऊन मी व्यथीत मनाने ही पडझड प्रत्यक्ष अनुभविली आहे.'[७] कारखाने व उद्योगधंद्यांमुळे खेड्यातील माणूस शहराकडे वळला. गावे ओस पडायला लागली. पडघवलीच्या वाट्याला अशीच स्थिती येते. एकेकाळी भरभराटीला आलेले गावाला कशी अवकळा प्राप्त होते, त्याचे वर्णन या प्रादेशिक कादंबरीत आहे.

दांडेकरांनी कोकणाप्रमाणेच विदर्भाच्याही पार्श्वभूमीवर वऱ्हाडी भाषेतील पहिली कादंबरी 'पूर्णामायची लेकरं' (१९५२) लिहिली. प्रदेश कोणताही असो, त्यांची लेखणी सारख्याच ताकदीने त्या प्रदेशाचे चित्रण करताना दिसते.

व्यंकटेश माडगूळकर यांनी लिहिलेली व १९५५ मध्ये प्रकाशित झालली 'बनगरवाडी' ही कादंबरी प्रादेशिक कांदबीचा मानदंड ठरते. ऋतुचक्राच्या लहरीप्रमाणे फुलणारे, फळणारे आणि उद्ध्वस्त होणारे एक माणदेशी गाव लेखकाने कादंबरीतून उभे केले असून राजाराम विठ्ठल सोंदणीकर नावाच्या या वस्तीवर बदलून आलेल्या शिक्षकाच्या नजरेतून खेड्याचे चित्रण आले आहे. हे गाव एकजीव व्हावे म्हणून हा शिक्षक सर्व प्रयत्न करतो. साध्याभोळ्या पण राकट धनगरांच्या वस्तीला अवर्षणाचा फटका बसतो आणि माणसे बहुदिशांनी पांगतात व गाव ओसाड होते. 'प्रादेशिक या शब्दाचा संपूर्ण अर्थ लागू पडेल अशी ही छोटी — तरीही फार मोठी कादंबरी होय',[८] असे ल.ग. जोग म्हणतात.

अशा प्रादेशिक कादंबरीने मराठी कादंबरीला नवा प्रवाह दिला आणि हा प्रकार लोकप्रियही झाला.

## अस्तित्ववादी कादंबरी

व्यक्ती आणि समाज यांच्यातील परात्मतेच्या जाणिवेतून मराठी कादंबरीत अस्तित्ववादी कादंबरीचा प्रवाह निर्माण झाला. मानवी विश्वाचा केंद्रबिंदू मानव हा असून माणसाची समोरच्या वस्तुविश्वाबरोबर आणि दुसऱ्या माणसाबरोबर जी कृतिरूप देवघेव चालते, त्या अस्तित्वजन्य प्रत्यक्ष कृतीमधूनच मानवी अस्तित्वाचा शोध घेणे हे अस्तित्ववादाचे ध्येय समजले जाते. या शोधात मानवी अस्तित्वाच्या तळाशी आलेल्या अनेक वृत्तीप्रवृत्ती आढळतात.

'कोसला', 'बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर', 'वासुनाका', 'कोंडुरा' अशा कादंबऱ्यांतून या अस्तित्ववादी जाणिवा दिसून पडतात. यांतील नायकांना परात्मजाणिवेने घेरले असल्याने ते समाजापासून अलिप्त होऊन स्वत:च्या जीवनाचे आणि सभोवतालच्या समाजाचे मूल्यमापन करीत, प्रस्थापित मूल्यव्यवस्थेतील दोष दाखवीत, या मूल्यव्यवस्थेने आपला बळी कसा घेतला ते सांगत असतात. हा आक्रोश अर्थपूर्ण व मूल्याधिष्ठित असतो. भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर अशाच तऱ्हेने कुटुंब आणि समाज या दोहोपासून उखडल्या गेला आहे. या विश्वाच्या पसाऱ्यात मानवी जीवनाला काही अर्थ आहे का? मी का जन्मलो? माझे जगणे कशासाठी? अशा प्रश्नांमध्ये तो अडकला आहे. ही कादंबरी त्याच्या आत्मभानाची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परात्मवृत्तीची कथा आहे. त्याच्या सभोवतालचा समाज, कुटुंबव्यवस्था, शिक्षणसंस्था, समाजातील खोटे व्यवहार या सर्वांवर तो टीका व टिंगल करतो. भेदकपणे त्यातील अर्थशून्यता मांडतो. त्याला रूढ मार्गाचा कंटाळा आहे. नायकासंदर्भातील सर्व पारंपारिक संकेत त्याने उधळून लावले आहेत. रंगरूपाने तो अद्वितीय नाहीच. तो स्वत:च म्हणतो, 'मी लाल पडत नाही इतका काळा आहे.'[९] विविधांगी अनुभव एका पातळीवर आणणारी ही कादंबरी वरवर विस्कळीत वाटत असली तरी मुळात रचनादृष्ट्या अतिशय रेखीव व समग्र जीवनाचा भंकसपणा दाखविणारी आहे.

भाऊ पाध्ये यांची 'बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर' ही कादंबरीसुद्धा 'कोसला'तील नायकाप्रमाणे स्वत:च्या आणि समाजाच्या परात्मतेची जाणीव करून देणारी आहे. या कादंबरीतील नायकाला मध्यमवर्गीय उच्चभ्रू वर्गाची प्रतिष्ठाप्रदर्शनाची हौस, त्यांची सुखासीन वृत्ती यांचा उबग येतो. या वर्गात स्वत:ला दुबळे समजून यातील

नायक आपला व्यवसाय, सामाजिक शिष्टाचार, सुसंस्कृत बायको याविषयी उदासीन होतो. त्यालाही स्वत:च्या जन्माचे आणि जगण्याचे प्रश्न पडतात.

चिं.त्र्यं. खानोलकरांच्या 'रात्र काळी घागर काळी', 'कोंडुरा' या कादंबऱ्या अस्तित्ववादी कादंबऱ्यांमध्येच मोडतात. विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या लोकविलक्षण शक्तीच्या हातचे माणूस खेळणे आहे. या शक्तीची हुकुमत माणसावर कायम असते. ' 'कोंडुरा'तील सर्व सामाजिक जीवनाने अशा प्रकारच्या अद्‌भुत शक्तीचे दास्य पत्करले आहे. 'कोंडुरा' या शक्तीचा प्रतिनिधी आहे. या 'कोंडुऱ्या'च्या निमित्ताने खानोलकर सर्व मूल्यकल्पनांचा विश्वव्यवहारातील अंतिम आधार आणि श्रद्धांच्या व्यर्थतेच्या निमित्ताने जीवनातील सर्वच मूल्यांची व्यर्थता प्रतीकरूपाने साकार करीत आहेत.'[१०]

अशा विविध उदाहरणांवरून लक्षात येते की या कालखंडात अस्तित्ववादी कादंबरीने माणसाला पडलेल्या स्वत:च्या अस्तित्वाविषयीच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला.

## समारोप

असा हा मराठी कादंबरीचा सुरुवातीचा प्रवास होता. कथा व कादंबरी यांच्या तांत्रिक भेदांविषयी संभ्रमावस्थेतच मराठीत कादंबरी प्रकार रूढ झाला होता. हरिभाऊ, वा.म. जोशी, केतकर, वरेरकर, फडके, खांडेकर, माडखोलकर अशा दिग्गजांच्या लेखणीतून साकारलेला हा प्रवास विविध प्रकारच्या कादंबऱ्यांनी समृद्ध झाला होता. सुरुवातीला सामाजिक, ऐतिहासिक, अद्‌भुत अशा प्रकारांमध्ये कादंबरी निर्माण होत होती. पुढे रंजनवादी, असित्ववादी, प्रादेशिक असे कितीतरी प्रवाह कादंबरीत अवतरले. त्यांची लोकप्रियताही उल्लेखनीय अशी होती. विविध लेखकांनी हे प्रकार लीलया हाताळून मराठी कादंबरीला समृद्ध केले.

## संदर्भ


१. देशपांडे कुसुमावती, पासंग, मौज प्रकाशन गृह, मुंबई, तृतीयावृत्ती, १९७१, पृ. ६५–६६
२. देशपांडे कुसुमावती, मराठी कादंबरीचे पहिले शतक, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९७५, पृ. २१
३. कुरुंदकर, नरहर, धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९७१, पृ. ३९
४. जोग ल.ग., कादंबरी, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६३, पृ. ७५
५. मांडवकर डॉ. भाऊ, वैदर्भीय कादंबरी–विश्व, सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. २४
६. देशपांडे अ.ना., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृती, १९७०, पृ. १७४
७. दांडेकर गो.नी., प्रस्तावना, पडघवली, मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, १९५५
८. जोग ल.ग., कादंबरी, उनि., पृ. ११७
९. नेमाडे भालचंद्र, कोसला, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९६३, पृ. ६४
१०. कुरुंदकर नरहर, धार आणि काठ, उनि., पृ. २६५–२६६


❖❖❖

# राष्ट्रसंतांची शिक्षण विषयक भूमिका

प्रा.पी.एस. निर्मळ
श्री संत गजानन महाराज कला महाविद्यालय,
बोरगांव मंजू, ता.जि. अकोला
भ्रमणध्वनी ९९२११३२७६४

## सारांश

विदर्भ ही संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. विदर्भामध्ये संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गुलाबराव महाराज इत्यादी अनेक महान संत होऊन गेले. संतांनी समाजाच्या कल्याणाकरिता सतत समाज प्रबोधन केले. भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे खेड्याचा विकास झाला पाहिजे. खेडे सुधारले तरच देशाचा विकास होईल, म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' हा बहुमूल्यग्रंथ लिहिलेला असून या ग्रंथात एकेचाळीस अध्याय आणि चार हजार सहाशे त्र्याहत्तर ओव्या आहेत. या ग्रंथातून राष्ट्रसंतांनी ग्रामीण समाजजीवनाची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट केली असून हा ग्रंथ फक्त ग्रामीण वर्गाकरिताच नव्हे तर शहरी वर्गाकरिता सुद्धा तेवढाच महत्त्वपूर्ण आहे. ग्रामगीतेच्या एकोणविसाव्या अध्यायात राष्ट्रसंतांनी आपली शिक्षणविषयक भूमिका स्पष्ट केली असून मानवजीवनाच्या कल्याणाकरिता पुस्तकी शिक्षण महत्त्वाचे नसून व्यवसाय शिक्षण, तसेच विविधांगी शिक्षणावर भर दिल्याचे लक्षात येते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात,

नुसते नको उच्च शिक्षण ।
हे तो गेले मागील युगी लपोन ।।
आता व्हावा कष्टीक बलवान ।
सुपुत्र भारताचा ।। (अ.१९,ओ.९)

मागील काळात उच्च शिक्षणाला महत्व होते. परंतु आजच्या काळात उच्च शिक्षणाबरोबरच कष्टाळू आणि बलवान, सामर्थशाली सुपुत्र भारतात निर्माण होणे काळाची गरज आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीत बदल करणे अत्यंत आवश्यक आहे आणि तो बदल लवकरात लवकर झाल्यास समाजाला अधिक फायदा होईल. नुसते दिखावू कपडे, कोरडी ऐट हे शिक्षणाचे साध्य नसून सर्वांगीण विकास हे त्याचे साध्य आहे. शाळेतून पुस्तकी ज्ञानाशिवाय उद्योग निर्मीतीचे शिक्षण, संशोधनास वाव देणारे शिक्षण, दिले जावे असे राष्ट्रसंत म्हणतात.

**बीजशब्द** – राष्ट्रसंत तुकडोजी, ग्रामजीवन, शिक्षण, राष्ट्रविकास

## प्रस्तावना

महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभलेली असून अठरा पगड जातीच्या संतांनी समाजाच्या कल्याणाकरिता आपले संपूर्ण जीवन वाहिले. याची अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील. यापैकीच एक म्हणजे विदर्भाच्या कुशीत जन्माला आलेले वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे या संत परंपरेतील एक अनमोल रत्न होय. जगात माणसे येतात आणि जातात अगदी समुद्राच्या लाटांसारखी. पण काही थोर व्यक्ती अशा असतात की, आपल्या जीवन सागरातील प्रचंड लांटावर स्वार होऊन आपली जीवननौका वल्हवीत पैलतीर गाठतात. वर्तमानकाळ हा विशाल भूधरासारखा असून जो मनुष्य आचाराने, विचाराने आणि कृतीने मानवतेच्या सुगंधासाठी आपले जीवन समर्पित करतो, तो अमर होतो. विसाव्या शतकात ज्या महाविभुतींनी समाजसेवेचे कंकण हाती बांधून आपली नोंद सुवर्णअक्षरांनी करून अमर स्थान प्राप्त केले. त्या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

## राष्ट्रसंतांनी सांगितलेले व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी पुस्तकी शिक्षणापेक्षा व्यवसाय शिक्षणाला अधिक महत्त्व दिलेले आहे. पूर्वी समाजात अठरापगड जातीचे लोक निरनिराळे व्यवसाय करीत होते. पुढे जसजसा शिक्षणाचा प्रसार झाला,

तसतसे लोक पुस्तकी ज्ञान मिळवू लागले परिणामी त्यांना आपल्या व्यवसायाचा विसर पडला म्हणून राष्ट्रसंत म्हणतात, समाजाला उच्च प्रतीचे जीवन जगायचे असल्यास व्यवसायिक शिक्षण महत्त्वाचे आहे.

राष्ट्रसंत म्हणतात,

कित्येक होतील न्यायधीश ।
कित्येक काव्य सृष्टीचे ईश ।।
कित्येक पिकवतील शेतीस ।
नव्यानव्या शोधांनी ।। (अ–१९, ओ.७९)

मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था गावातच करावी. भगवान श्रीकृष्ण, महात्मा गांधी यांनी खेडयात राहूनच राष्ट्रसंघटनेची सूत्रे हलविली शिक्षण घेतलेला तरुण आपल्या बुद्धिमत्तेचा वापर गावाच्या विकासाकरिता करेल. शिक्षणाने मुले इंजिनिअर, डॉक्टर, वकील, न्यायाधीश, लेखक, कवी, राजकारणी, तत्वज्ञानी होतील परिणामी देशाचा विकास साधला जाईल.

## शिक्षणातून सर्वगुणसंपन्न नागरिक निर्माण व्हावा.

शहराप्रमाणे खेड्यापाड्यात उच्च शिक्षणाची सोय व्हावी, परस्परांमध्ये सहकार्याची भावना निर्माण करणारे शिक्षण दिले जावे, तसेच शिक्षणातून सर्वगुण संपन्न नागरिक निर्माण व्हावा असे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना वाटते.

नदी तलाव आणि विहीर ।
यात पोहणे नानापरी ।।
आपत्ती येता धावुनी तारी ।
ऐसे शिक्षण असावे ।। (अ. १९, ओ. १३)

नदी, तलाव,विहीरीत पोहता आले पाहीजे म्हणजेच आजचा युवक सर्वगुण संपन्न असावा असे राष्ट्रसंतांना वाटते.

## शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात जातीव्यवस्थेवर आधारीत समाज ही भारतीय समाजव्यवस्थेची शोकांतिका असून ही सामाजिक विषमता नष्ट झाली पाहिजे. आपण सर्व एकाच मातीचे कण आहोत. एकाच ईश्वराची लेकरे आहोत, म्हणून आपआपसातील मतभेद विसरून जीवन जगले पाहिजे. राष्ट्रसंत म्हणतात.

व्यक्तिधर्म,कुटुंबधर्म । समाजधर्म, गावधर्म
बळकट होई राष्ट्रधर्म । प्रगतीपथाचा ।
व्यक्ती व्हावी कुटुंबपुरक । कुटूंब व्हावे समाजपोषक
समाज व्हावा राष्ट्र सहायक । राष्ट्र विश्वशांतीदायी ।

व्यक्तीपासून निर्माण होणारे कुटूंब, समाज,राष्ट्र, गावधर्म एकत्र आल्यास राष्ट्राच्या प्रगतीचा मार्ग सुकर होतो आणि विश्वशांतीची भावना समाजात निर्माण होते. थोडक्यात 'हे विश्वची माझे घर' अशी प्रत्येकाची विचारसरणी असली पाहिजे.

## कृषी जीवनात शिक्षणाचे महत्त्व

भारत हा कृषीप्रधान देश आहे. या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे, परंतु पुस्तकी ज्ञानामुळे शेतीच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष होत आहे. पुस्तकी ज्ञान घेवून पोट भरण्याकरिता नोकरी मिळविणे हेच आजच्या तरूणाचे मुख्य ध्येय आढळून येते. प्रा.रघुनाथ कडवे सांगतात, शेतीचे शिक्षण घेणाऱ्या तरूणाला शेतात नांगर चालवता येत नाही. शेतात फवारा मारता येत नाही. शेतात पेरणी करता येत नाही. शेतात काम करण्याची शरम वाटते असे उच्च शिक्षण घेऊन होत असेल तर आजची शिक्षणप्रणाली चुकीची आहे. राष्ट्रसंत म्हणतात,

करिती शेताचे निंदण ।
उपणने, उतारी, नांगरण ।।
शेण काढावयासही उत्सुक मन ।
दिसे जयाचे ।। (अ.१९, ओ.६८)

शेतकऱ्याच्या मुलाला शेतीची सर्व कामे आली पाहिजे,निंदण,खुरपण,उपणणे,नांगरणे,शेत फवारणे इत्यादी शेतीविषयक काम विद्यार्थीदशेत शिकविली जाणे राष्ट्रसंतांना आवश्यक वाटते. तसेच शिक्षणामुळे शिक्षण घेतलेली मुले नवेनवे शोध लावून आधुनिक पद्धतीने शेती करतील.

नही अवजारात सुधारणा ।
सुधारू न शके पिके नाना ।।
घाण्याच्या बैलापरी धिंगाणा ।
जीवनाचा त्याच्या ।। (अ.१९, ओ.४१)

अशिक्षित मनुष्य कोणत्याही क्षेत्रात प्रगती करू शकत नाही. तर अशिक्षित व्यक्तीचे जीवन हे घाण्याच्या बैलाप्रमाणे असते. त्यामुळे उत्तम शेती करायची असल्यास शिक्षणाची आवश्यकता असल्याचे राष्ट्रसंत सांगतात.

## समारोप

राष्ट्रसंतांच्या मते, मनुष्याला सुखी आणि समाधानी जीवन जगायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. अशिक्षित मनुष्य समाजाचा विकास करू शकत नाही. त्यामुळे शिक्षणाची गंगा घराघरापर्यंत पोहचली पाहिजे. राष्ट्रसंतांना अपेक्षित असलेले राष्ट्र निर्माण करायचे असल्यास साक्षरतेचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे. राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेतून माणुस घडविण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रसंतांच्यामते खरा भारत खेडयात आहे, त्यामुळे खेड्याचा विकास झाला पाहिजे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे शुद्ध आचरणाचे आराधक होते. ग्रामीण समाज जीवनाशी एकरूप झालेले समाज प्रबोधनाचे खरे पाईक होते यात शंकाच नाही.

## निष्कर्ष

१. आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.
२. शिक्षणामुळे सामाजाचा पर्यायाने देशाचा विकास होतो.
३. सर्वगुणसंपन्न समाज निर्माण करण्याचे काम शिक्षण करते.
४. ग्रामीण भागात शिक्षणाच्या सुविधा निर्माण होणे काळाची गरज आहे.
५. शिक्षणामुळे मनुष्याच्या सर्वांगीण विकास होतो.
६.

## संदर्भ ग्रंथ

१. राष्ट्रसंत तुकडोडोजी महाराज व्यक्ती आणि वाङ्मय, संपादक – डॉ.अक्षयकुमार काळे
२. राष्ट्रसंत तुकडोडोजी महाराज गौरव गंथ, संपादक – प्राचार्य रा.तु.भगत, सहसंपादक डॉ.सुभाष सावरकर
३. ग्रामगीतेची निर्मीतीप्रक्रीया – डॉ.योगीता पिंजरकर
४. राष्ट्रसंत समग्रगद्य वाङ्मय – खंड ७, संपादक प्रा. रघुनाथ कडवे
५. संतसाहीत्य आणि समाज प्रबोधन संपादक – प्राचार्य रा.तु. भगत

❖❖❖

# 'संतकृपा जाली' हा अभंग नक्की कोणाचा?

प्रा. डॉ. वीरा मांडवकर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com    भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## सारांश

'संतकृपा जाली' हा अभंग कुणाचा? या प्रश्नाचा शोध घेताना लक्षात येते की, हा अभंग संत तुकाराम आणि संत बहिणाबाई या दोघांच्याही गाथांमध्ये आढळतो. बहुतेक अभ्यासकांनी हा अभंग संत बहिणाबाईंच्या ज्या विविध गाथा प्रकाशित झाल्या आहेत, त्यात समाविष्ट असल्याची पुष्टी केली आहे. तुकारामांच्या गाथांमध्येही हा अभंग आहे. काही गाथांमध्ये हा अभंग मुख्य भाग म्हणून न येता 'क्षेपक अभंग' म्हणून बाजूला काढला आहे. म्हणजे हा अभंग तुकोबांचा असेल, अशी खात्री संपादकांना नव्हती. सर्व गोष्टींचा विचार करता एक निष्कर्ष निघतो, तो म्हणजे मूळ अभंग तुकारामांचाच आहे; पण बहिणाबाईंनी त्याची अनुवादात्मक पुनर्रचना केली आहे; म्हणून तो त्यांचाही आहे. तुकोबा व बहिणाबाई यांच्या अभंगांची तुलना केल्यास असे दिसते, की तुकारामांच्या गाथांमध्ये 'संतकृपा जाली' हा अभंग भिन्न भिन्न सदरात असला, तरी अभंगाची शब्दरचना सर्वत्र सारखीच आहे. त्यात अर्थांतर करणारे पाठभेद दिसत नाहीत.

## प्रस्तावना

'संतकृपा जाली' हा अभंग कुणाचा? तुकारामांचा की बहिणाबाईंचा? कुणाचाही असला, तरी तो अप्रतिम आहे, यात शंका नाही. वारकरी संप्रदायाची थोडक्यात परंपरा, विविध संतांची कामगिरी अशा गोष्टी या छोट्याशा अभंगात सर्वार्थाने आलेल्या आहेत. 'मंदिर' हा शब्द उच्चारताच डोळ्यांसमोर पवित्र अशी वास्तू उभी राहते. भागवत धर्माला मंदिराची उपमा देण्याची कल्पना ज्याची आहे, त्याच्यासमोर खरोखरच नतमस्तक व्हावेसे वाटते.

'संतकृपा जाली' हा अभंग संत तुकाराम आणि संत बहिणाबाई या दोघांच्याही गाथांमध्ये आढळतो. त्यामुळे हा अभंग कुणाचा? या प्रश्नाची चर्चा नेहमीच होत असते. त्याचेच विश्लेषण या निबंधात केले आहे.

**बीजशब्द** : संतकृपा, तुकाराम, बहिणाबाई, गाथा, जानार्दन

## विषय विवेचन

संत बहिणाबाईंच्या गाथेत 'संत कृपा झाली' हा अभंग पुढील ठिकाणी आलेला आहे.

१. इ.स. १९१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या कै. धोंडो विश्वनाथ उमरखाने संपादित 'बहेणाबाईंचा कवितासंग्रह' भाग १ च्या पृ. ४८ वर या अभंगाची सुरुवातीची चार कडवी घेतली आहेत. बहिणाबाई व तुकोबांचा उल्लेख असलेले दोन्ही चरण यात समाविष्ट केले नाहीत.

२. इ.स. १९२६ मध्ये प्रथमत: प्रकाशित व इ.स. १९५६ मध्ये द्वितीयावृत्ती निघालेल्या कै. विश्वनाथ नारायण कोल्हारकर संपादित 'बहिणाबाईचा गाथा' मध्ये हा अभंग २२९ व्या क्रमांकावर आला आहे.

३. इ.स. १९६७ मध्ये प्रकाशित श्री. का.अ. जोशी संपादित 'श्रीसकलसंतगाथा' खंड २ यात पृ. ४१२ वर बत्तीसाव्या क्रमांकावर हा अभंग आहे.

४. इ.स. १९७९ मध्ये प्रथमत: प्रकाशित झालेल्या, इ.स. १९८९ मध्ये सुधारित आवृत्ती निघालेल्या आणि २००४ मध्ये तृतीयावृत्ती निघालेल्या, शिऊरच्या हस्तलिखितावरून संपादित केलेल्या सौ. शालिनी जावडेकर यांच्या 'संत बहिणाबाईंचा गाथा' मध्ये हा अभंग १४३ व्या क्रमांकावर आहे. यात सर्वच चरणांचा समावेश आहे.

५. इ.स. १९९८ मध्ये 'वरदा प्रकाशन', पुणे तर्फे प्रकाशित झालेल्या 'संत बहिणाबाईंचा गाथा' मध्ये हा अभंग २२९ व्या क्रमांकावर आहे. यात तुकारामांनंतर बहेणीला 'फडकत्या ध्वजे'ची उपमा देईपर्यंत सर्व चरण आहेत.

संत तुकारामांच्या गाथेत हा अभंग पुढील ठिकाणी आलेला आहे.

१. इ.स. १९२४ मध्ये प्रकाशित 'सकलसंतगाथा' आवटे प्रतीत 'भिन्नपाठ' ह्या पाचव्या भागात 'आत्मस्थिती' सदरात ४१९८ व्या क्रमांकावर हा अभंग आलेला आहे.

२. शके १८४७ (इ.स. १९२५) मध्ये वै. शं.वा. दांडेकर व मा.कृ. देशमुख संपादित, 'चित्रशाळा प्रेस'तर्फे प्रकाशित 'तुकारामांची गाथा' मध्ये 'क्षेपक अभंग' या सदरात ४३३३ व्या क्रमांकावर हा अभंग आला आहे.

३. इ.स. १९२७ मध्ये प्रकाशित वा.ल. पणशीकर संपादित 'तुकारामांची गाथा' 'निर्णयसागर प्रती'च्या चौथ्या आवृत्तीत 'क्षेपक अभंग' या सदरात ४३९९ या क्रमांकावर आलेला आहे.

४. इ.स. १९५० मध्ये प्रकाशित 'श्रीतुकारामबाबांच्या अभंगांची गाथा' या सरकारी प्रतीत (पंडितप्रत) उपरोक्त अभंगाचा समावेश आहे.

५. शके १८९२ (इ.स. १९६०) मध्ये 'ढवळे प्रकाशना'ने छापलेल्या विष्णू नरसिंह जोग संपादित 'सार्थ तुकारामाची गाथा' खंड तिसरा, आवृत्ती तिसरी मध्ये 'क्षेपक अभंग'मध्ये ३१६ व्या क्रमांकावर हा अभंग आहे.

६. इ.स. १९६८ मध्ये गं.बा. सरदार संपादित 'तुकारामदर्शन' या ग्रंथात 'आम्हा हे कौतुक जगा द्यावी नीत' या शीर्षकाखाली पृ. १०० वर हा अभंग आलेला आहे.

७. स.के. नेऊरगावकर संपादित 'वै.प्रा. दांडेकर प्रकाशन', पुणे तर्फे प्रकाशित 'तुकाराम महाराजांची सार्थ गाथा' यात ३१६ व्या क्रमांकावर हा अभंग आला आहे.

गुरुदेव रानडे यांनी उपरोक्त अभंग तुकोबांचा मानला आहे. ह.भ.प. शंकरमहाराज खंदारकर, अनंत वासुदेव मराठे, का.अ. जोशी आदींनी संपादित केलेल्या गाथांमध्ये अथवा ग्रंथांमध्ये या अभंगाचा समावेश केलेला नाही. उपरोक्त काही गाथांमध्ये हा अभंग मुख्य भाग म्हणून न येता 'क्षेपक अभंग' म्हणून बाजूला काढला आहे. म्हणजे हा अभंग तुकोबांचा असेल, अशी खात्री संपादकांना नव्हती. 'बहिणाबाईंचा गाथा' इ.स. १९१३ साली प्रथम प्रसिद्ध झाला व ही शंका दृढावली. पण आधुनिक संपादक तो अभंग संत बहिणाबाईंचा म्हणूनच छापतात. त्यामुळे 'संतकृपा जाली' या अभंगासंदर्भात प्रा. गं.बा. सरदार यांनी 'दै. केसरी'मध्ये 'तुकाराम दर्शन'मध्ये हा अभंग समाविष्ट करून तो तुकोबांचा ठरविला. यावर प्रा. (डॉ.) सुशीला पाटील यांच्या १०–१–१९७७ च्या 'दै. केसरी'मध्ये प्रकाशित झालेल्या पत्रात 'प्रा. सरदारांनी अनवधानाने तुकारामांच्या अभंगात हा समाविष्ट केला असावा; पण मूळचा तो बहिणाबाईंचा आहे.'[१] असे म्हटले आहे. त्याला पुष्टी देताना प्रा. द. पु. कौलागी यांनी दि. १७–१–१९७७ च्या दै. केसरीत त्यांचे पत्र प्रकाशित केले. ते म्हणतात, 'सकलसंतगाथेत हा अभंग बहिणाबाईंचा आहे, यात दुमत होण्याचे कारण नाही.'[२] मात्र हे.वि. इनामदार यांनी दि. ३–२–१९७७ च्या दै. केसरीत पत्र लिहून प्रा. सरदारांचेच म्हणणे उचलून धरले.

प्रा. सुशीला पाटील यांनी हा अभंग बहिणाबाईंचा आहे, याचे कारण देताना तुकोबा स्वत:ला वारकरी संप्रदायाचा कळस म्हणवून घेतील, अशी शक्यता नव्हती, उलट आपल्या गुरूचा सन्मान करण्याच्या हेतूने बहिणाबाई मात्र त्यांची प्रशंसा करतील याचीच शक्यता जास्त आहे, असे म्हटले आहे.

यावर उत्तर देताना भा.पं. बहिरट व प.ज्ञा. भालेराव 'वारकरी संप्रदाय : उदय व विकास'मध्ये म्हणतात, 'जितका स्वाभिमान तितकीच त्यांच्या ठायी नम्रताही आहे. कधी ते स्वत:ला संतकृपारूपी इमारतीचा कळस म्हणतील, तर कधी ज्ञानदेवांच्या पायातली वहाणही स्वत:ला म्हणतील.'[३] त्याचप्रमाणे हे.वि. इनामदारांच्या मते तुकारामांच्या या उक्तीत 'आत्मप्रत्यय आहे, अहंकार नाही.' तुकोबांनी स्वत:ला कळस म्हणणे अशक्य नाही व अनुचितही नाही. 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा', 'तुका म्हणे सत्ता । अवघी आमचीच आता ।।' किंवा 'अणुरेणुया थोकडा । तुका आकाशाएवढा ।।', 'तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।।' अशी आत्मगौरवपर अथवा अत्युच्च पातळीवरून अधिकारवाणीने बोलणारी वाक्ये तुकारामांच्या गाथेत ठिकठिकाणी विखुरलेली आहेत. तुकोबांनी हा अभिमान बाळगावा, यात गैर काहीच नव्हते. तुकोबा भक्तीच्या मार्गावरून चालत असताना हळूहळू अशा अवस्थेस येऊन पोचले, जेथे परमेश्वरापासून त्यांना भिन्न रूपात पाहणेही अशक्य होते. परमेश्वराशी एकरूप होण्यापर्यंतच्या त्यांच्या खडतर मार्गक्रमणाच्या अनुभवानंतर परमेश्वरात विलीन होणाऱ्या तुकोबांना आत्मसाक्षात्काराचा जो अनुभव आला, तो अवर्णनीय असा होता आणि म्हणूनच ते आत्माभिमानाने स्वत:ला 'तुका झालासे कळस' किंवा 'तुका आकाशाएवढा' म्हणून घेत असतील तर त्यावर आक्षेप घेता येत नाही आणि असा आत्माभिमान प्रकट करत असतानाच ते तितकेच नम्रही होतात, यातही शंका नाही; आणि म्हणून उपरोक्त अभंग तुकोबांचा नाही, असे म्हणता येत नाही.

वरील सर्व गोष्टींचा विचार करता एक निष्कर्ष निघतो, तो म्हणजे मूळ अभंग तुकारामांचाच आहे; पण बहिणाबाईंनी त्याची अनुवादात्मक पुनर्रचना केली आहे; म्हणून तो त्यांचाही आहे. तुकोबा व बहिणाबाई यांच्या

अभंगांची तुलना केल्यास असे दिसते, की तुकारामांच्या गाथांमध्ये 'संतकृपा जाली' हा अभंग भिन्न भिन्न सदरात असला, तरी अभंगाची शब्दरचना सर्वत्र सारखीच आहे. त्यात अर्थांतर करणारे पाठभेद दिसत नाहीत. बहिणाबाईंच्या अभंगात इ.स. १९२६ व इ.स. १९५६ च्या गाथांमध्ये 'बहिणी म्हणे' अशी नाममुद्रा आहे; तर उमरखाने गाथा व शिऊर हस्तलिखितात नुसती 'बहेणी' अशी नाममुद्रा आहे. हाच महत्त्वाचा फरक शब्दरचनेत दिसतो.

तुकोबांच्या सरकारी गाथेत हा अभंग कसा दिलेला आहे, हे पाहणेही आवश्यक आहे. : —

'संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे रचिले पाया । रचियेलें देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।३।।
जानार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ।।४।।
भजन करा सावकास । तुका जालासे कळस ।।५।।

(यातील तिसऱ्या कडव्यातील 'जानार्दन' हा शब्द लक्षणीय व अन्वर्थक आहे. सरकारी गाथेव्यतिरिक्त अन्य गाथांमध्ये 'जनार्दन' असा शब्दप्रयोग आढळतो.)

संत बहिणाबाईंच्या गाथेत हा अभंग असा आहे :—

'संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।।१।।
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।२।।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।३।।
जनार्दन येकनाथ । खांब दिल्हा भागवत ।।४।।
तुका जालासे कळस । भजन करा सावकास ।।५।।
बहेणि फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा ।।६।।'

तुकोबा व बहिणाबाईंच्या अभंगांची तुलना केल्यास त्यात पुष्कळ पाठभेद आढळतात. तुकोबा 'ज्ञानदेवे रचिला पाया । रचियले देवालया ।।' असे म्हणतात, तर 'ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।' असे बहिणाबाई म्हणतात. दोघेही नामदेवांना या देवालयाचे 'किंकर' म्हणतात; पण नामदेवांचे कार्य तुकोबांच्या दृष्टीने 'तेणे केला हा विस्तार' असे आहे, तर बहिणाबाई 'तेणे रचिले आवार' असे म्हणून त्यांचा गौरव करतात. जनार्दनएकनाथांनी 'ध्वज उभरिला भागवत' असे तुकोबा म्हणतात, त्यानंतर स्वत:ला 'कळस' म्हणवितात, तर बहिणाबाई जनार्दनएकनाथांस या इमारतीचा 'खांब' म्हणजे आघारस्तंभ मानतात आणि या सर्वांवर 'कळस चढविणारे' म्हणून तुकोबांचे स्थान निश्चित करतात. कळसाजवळच जी 'ध्वजा' फडकत असते, तेथे स्वत:चे स्थान निश्चित करून आपल्या गुरूजवळ सदैव वास करण्याची आपली इच्छा मनोमन पूर्ण करतात. बहिणाबाईंच्या मनातला तुकोबांविषयीचा आदरभाव असा लहानसहान गोष्टींतूनही व्यक्त होतो. दूरच्या लोकांना प्रथम ध्वजेचे दर्शन होते. फडकणारी ध्वजा पाहून त्याखाली असणाऱ्या देवालयाच्या अस्तित्वाची व वैभवाची जाणीव होते. आपल्या अभंगवाणीद्वारे आपण ध्वजेप्रमाणे फडकण्याचे कार्य सतत करू, असा आत्मविश्वास बहिणाबाईंनी व्यक्त केला आहे. याबाबतीत त्यांनी आपल्या गुरूचेच अनुकरण केले आहे. त्यांच्याही या आत्मविश्वासात आत्मप्रत्यय आहे, आत्मगौरव नाही.

बहिणाबाईंनी तुकोबांच्या अभंगांचे अनुकरण करतानाही जे काही बदल केले, त्यात त्यांची संतांकडे पाहण्याची वेगळी दृष्टी दिसते. तुकोबांची इमारतीची कल्पना बहिणाबाईंनीही आपल्या अभंगात वापरली आहे. तुकोबांच्या अभंगातील नामदेवांना दिलेली 'किंकरा'ची उपमा बहिणाबाईंनाही योग्य वाटते, परंतु नामदेवांनी पंढरपूरपासून पंजाबपर्यंत वारकरी संप्रदायाचा प्रसार केला, हे तुकोबांना महत्त्वाचे वाटते. म्हणून ते नामदेवांनी 'विस्तार' केल्याचे सांगतात, तर बहिणाबाईंना नामदेवांनी वारकरी संप्रदायाला विस्तृत केले असले, तरी त्याला बांध घालून सुरक्षितता आणली, ही गोष्ट महत्त्वाची वाटते. म्हणून त्या नामदेवांच्या कार्याला 'आवार' संबोधून त्याचा विस्तृतपणाही नजरेत आणून देतात व त्यांनी वारकरी संप्रदायाला दिलेले विशिष्ट स्वरूपही स्पष्ट करतात.

तुकोबांच्या इमारतीत 'खांब' ही संकल्पना नाही. बहिणाबाईंनी इमारतीच्या रूपकात खांबाचे महत्त्व जाणून आपल्या अभंगात ही कल्पना मांडली. एका अर्थाने इमारतीला बळकट खांबाचा आधार मिळवून दिला. यामागे बहिणाबाईंची जनार्दन एकनाथांना बत्तीस अध्यायरूप बत्तीस खांबांचा आधार भागवत मंदिरास देण्याची दृष्टी असावी, असे वाटते. तुकोबांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांची नाममुद्रा शेवटच्या कडव्याच्या प्रथम चरणात यावयास पाहिजे होती, अशी आलेली नाही. बहिणाबाईंनी इमारतीचे रूपक संपूर्ण करण्यासाठी हा चरण प्रथम घेतला आहे. मग या मंदिरात 'भजन करा सावकाश' असा दिलासा दिला आहे. त्याचबरोबर आपली स्वत:ची

रचना आहे, हे लक्षात आणून देण्यासाठी त्यांनी पुढे एक चरण वाढवून आपली कामगिरी स्पष्ट केली आहे. म्हणून हे शेवटचे कडवे श्री. भा.पं. बहिरट म्हणतात, त्याप्रमाणे बहिणाबाईंनी तुकोबांच्या अभंगाला जोडलेली पुस्ती नव्हे, की डॉ. हे.वि. इनामदार म्हणतात, त्याप्रमाणे बहिणाबाईंच्या कोण्या भक्ताने जोडलेली पुस्तीही नाही. कारण पुस्ती जोडणाऱ्याने स्वत:चे नावही घातले असते.

## समारोप

बहिणाबाईंनी अनुकरणात्मक अभंग रचल्याचे 'संतकृपा जाली' हे पहिलेच उदाहरण नव्हे. जनाबाईंचा 'लेकुरवाळा विठू', त्यातील संतनामे बदलून बहिणाबाईंनी पुन्हा आपल्या शब्दांत वर्णिला आहे. हा अभंग ४४५ व्या क्रमांकावर आलेला आहे. नामदेवांच्या 'तू माझी माऊली । मी हो तुझा तान्हा ।।' या अभंगांतील माऊली व तान्ह्याचे रूपक घेऊन 'तू माझी माऊली । तुझे मी बालक ।।' (अभंग क्र. ३७१) हा अभंग लिहिला. तुकोबांच्या अभंगांतील 'आपुले मरण पाहिले म्या डोळा ।' व 'झाला प्रेतरूप शरीराचा भाव ।' अशी मृत्यूची किंवा मृत्यूशी असलेल्या निकटत्वाची कल्पना व पुष्कळशी शब्दरचना घेऊन 'आपुले आपण देखिले मरण ।' (अभंग क्र. २००) हा अभंग रचला आहे. याशिवाय 'वज्रसूची उपनिषदा'चे भाषांतर करून त्यांनी 'ब्रम्हकर्मपर अभंग' लिहिले. म्हणजेच 'संतकृपा जाली' हा बहिणाबाईंचा अभंगही तुकोबांच्या मूळ अभंगावर आधारित आहे किंवा बहिणाबाईंनी त्याची अनुवादात्मक पुनर्रचना केली आहे, असे म्हणता येते. दुसऱ्या शब्दांत जो निष्कर्ष निघतो, तो म्हणजे मूळ अभंग तुकारामांचाच आहे; पण बहिणाबाईंनी त्याची अनुवादात्मक पुनर्रचना केली आहे; म्हणून तो त्यांचाही आहे.

## संदर्भ

१. सुशीला पाटील, 'वाचकांचा पत्रव्यवहार', दै. केसरी, पुणे, दि. १० जानेवारी, १९७७, पृ. ४.
२. द.पु. कौलागी, 'वाचकांचा पत्रव्यवहार', दै. केसरी, पुणे, दि. १७ जानेवारी, १९७७, पृ. ४.
३. भा.पं. बहिरट व प.ज्ञा. भालेराव, वारकरी संप्रदाय : उदय व विकास, प्रथमावृत्ती, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. ५९.

❖❖❖

# कामगारांची तळपती तलवारः कवी नारायण सुर्वे

डॉ. सी.डी. पाखरे
महात्मा फुले महाविद्यालय, वरूड, जि. अमरावती
भ्रमणध्वनी ९८९०२४५२५३

केशवसुतांपासून अर्वाचीन मराठी कवितेची सुरुवात झाली. (काही महात्मा फुल्यांना यांचे श्रेय देतात.) इंग्रजी काळाचा जो प्रभाव केशवसुतांवर होता त्या प्रभावातून केशवसुतांनी सुनीतसारखा काव्यप्रकारही मराठीत आणला. समाजातल्या तळागाळातल्या प्रश्नांपासून वर थेट काव्य, कवी, कविता इ. साऱ्या बाबींना हात घातला. पंडीती वा संत साहित्यानंतर आलेले हे काव्य मराठी वाचकांसाठी नवीनच होते म्हणूनच या नवकाव्याचा उदोउदो झाला.

केशवसुतांनंतर बा.सी. मर्ढेकरांची कविता ही 'सामान्य माणसाला' केद्रं बिंदू माणून अवतीर्ण झाली. त्यातही कामगारांच्या, 'सामान्य माणसांच्या, 'माणसांच्या वेदना होत्या. कारखानदारी, भांडवलशाही, नागरिकीकरण वा जागतिकीकरणाची सुरूवात या काळात झपाटयाने झाली. मर्ढेकरांनी या साऱ्या गोष्टींना आपल्या कवितेतून अविष्कृत केले. तोच धागा पकडून कामगारांच्या भावभावनांशी गंधवेणा घेऊन आली ती नारायण सुर्वे याची कविता.

साठोत्तरी कवितेत ज्याचा अत्यंत मानाने उल्लेख करावा लागेल असे कवी नारायण सुर्वे. त्यांच्या कवितेने बदलत्या कवी, रसिकांच्या जाणिवा, संवेदना, संकल्पना, मूल्यविशेष या सारख्या गोष्टींना ठळकपणे आपल्या कवितेतून मांडल्या. केशवसुत,मर्ढेकर व नारायण सुर्वे हे महाराष्ट्रीय मराठी साहित्याच्या ,सांस्कृतिक, सामाजिक जीवनातील परिवर्तनाचे तीन महत्वाचे टप्पे आहेत.

समाजजीवन बदलते ते भौतिक परिस्थिती बदलल्यावर. त्यातून नव्या जाणिवा निर्माण होतात. साहित्याच्या आशयातही बदल होतो प्राचीन काव्याला पूर्णपणे या तीन अर्वाचीन कविंनी पूर्णत: बदलूनच टाकले. मराठी काव्यक्षेत्रातील ही फार मोठी क्रांतीच म्हणावी लागेल. काव्याचे नवेपण हे विषयांच्या विविधतेत व रचनाप्रकारांच्या प्रयोगात असते. या अनेकांच्या समजुतीमुळे केशवसुतांच्या काव्याला जडत्व आले. मर्ढेकरांची कविता वाचक समीक्षकांना दूर्बोध वाटली. तिरकस अभिव्यक्ती त्यात जाणवली. मर्ढेकरांनी लावलेल्या कवितेच्या नव्या वळणाला ही साचलेपणाची नोंद करण्यात आली.

मर्ढेकरांनंतर जीवित जीवन घेऊन आली ती नारायण सुर्वे यांची सामान्य माणसांची, कामगारांची, वेश्यांची दखल घेणारी कविता.

नारायण सुर्वे याचीकविता कृत्रिम नव्हती, नैसर्गिक होती. त्यात कल्पना रम्यता नव्हती. ती स्पष्ट , ठळक व वास्तववादी आहे. ती संकेतांपासून दूर होती. नारायण सुर्वे याची कविता जेव्हा समाजाभिमुख झाली तेव्हा वास्तव जीवनाकडे, सर्वसामान्य सुखदु:खाकडे वळली.

ऐसा गा मी ब्रह्म (१९६२), माझे विद्यापीठ (१९६६), जाहीरनामा (१९७५), सनद (१९६२) असे त्यांचे एकूण चार महत्वाचे व मैलाचे दगड असणारे काव्यसंग्रह आहेत.ऐसा गा मी ब्रह्म, मधील 'चार शब्द 'या पहिल्याच कवितेत नारायण सुर्वे यानी प्रचंड ताकदीने कामगारांच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली.

कामगार आहे मी तळपती तलवार आहे,
सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे

अशी गर्जना करून प्रस्थापित सारस्वतांना प्रचंड आव्हान दिले.

एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे,
सावध असा तुफानाची सुरूवात आहे.

हे तुफान युगपरिवर्तनाचे रणशिंग फुंकत आले. कामगारांच्या व्यथा वेदनेकडे सर्वसामान्य माणसांची नजर जावी, त्याला ह्या जगाची ओळख व्हावी म्हणून, रोटी प्यारी खरी आणखी काही हवे आहे, या ओळीतून त्यानी लोकांचे हक्क व मागण्यांकडे साऱ्या वाचक, समीक्षक, राज्यकर्ते वा इतरांचे लक्ष वेधले आणि खऱ्या अर्थाने मराठी कवितेत वास्तववादी काव्यसृजनाचा आरंभ केला. सर्वसामान्यांच्या जीवनाशी एकरूप झालेली कविता भाकरीच्या पलिकडे जाऊन आणखी काही मिळविण्यासाठी राजमुद्रा घडवित होती. म्हणूनच नारायण सुर्वे यांनी शब्दांच्या हाती तलवार दिली. उपेक्षित कष्टकऱ्यांच्या वास्तव जीवनाचे चित्रण कवितेतून मांडले. दैन्य, दारिद्रय, सहनशिलता व जीवनसंघर्ष याचा प्रत्यय आणून दिला.

प्रचंड दु:खात जगणाऱ्या या कष्टकऱ्यांच्या अंतरंगात धुमसणाऱ्या प्रचंडशक्तीचा प्रत्यय तसेच वरवर बकाल दिसणाऱ्या या जगातील माणसाच्या मनातील कोवळया भावांचे दर्शनही नारायण सुर्वे याच्या कवितांमधून अभिव्यक्त व्हायला लागले. पिढयान्पिढयापासून दारिद्रयात जीवन कुंठीत करून जगणाऱ्या या माणसांची चित्रणे त्यांनी आपल्या कवितेतून साकारली. नारायण सुर्वे यांच्या कवितेतून सामान्य वाचकाला सत्य व सत्व याची जाणीव झाली.

नैसर्गिक धाटणीची वास्तववादी कविता सुर्वेची आहे. या कवितेतून आविष्कृत होणारे जीवंतपण लोभस आहे. शब्दाशब्दातून व्यक्त होणारा ओजस्वीपणा प्रेरणादायी आहे. सुर्वे यांच्या कवितेतील दु:ख सामान्य माणसाला अंतर्मुख करणारे आहे. जशी सुर्वे याची वास्तववादी कविता अवतीर्ण झाली, सामान्य माणूस, वाचक, समीक्षक, राज्यकर्ते वा इतर समाज अक्षरश: हादरून गेला, थरारून गेला. अत्यंत संवेदनशील काव्याची निर्मितीझाली आणि सर्वसामान्यानी नारायण सुर्वे यांना अक्षरश:डोक्यावर,डोक्यात घालून घेतले. कृत्रिमता, कल्पनारम्यता, वाङ्मयमूल्यांची ओढाताण त्यानी केली नाही, जसा जगत आहे तसाच मी शब्दात आहे ही स्पष्टवादी मांडणी त्यांनी केली.

कुसुमाग्रजांनी ऐसा गा मी ब्रह्मच्या प्रस्तावनेत, काव्यास आवश्यक असा प्रामाणिकपणा आणि उत्कट मानसिकता सुर्वेच्या कवितेत आहेत. कारण 'बेईमान उजेड , आणि वात जपून नेण्याचा ताण सुर्वेनी प्रामाणिकपणे भोगला आहे आणि उत्कट मानसिक अनुभव आपल्या शब्दांच्या हवाली केला आहे.अशाप्रकारे समीक्षा केली आहे. कुसुमाग्रजांनी सुर्वे यांच्याच कवितांचे निवडकनारायण सुर्वे हे पुस्तकही संपादित केले आहे. त्यात त्यांच्या काही निवडक कवितांचा महत्वाचा दस्तावेज रसिकांच्या हाती दिला आहे.

आयुष्य हे चार दिवसाचे असते. या पारंपरिक लोकधारणेचा धागा पकडून सुर्वे यांनी,
दोन दिवस वाट पाहण्यात गेले,दोन दु:खात गेले

हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे,
शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले रात्र धुंदझाली

भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.
अशी वास्तविकता काव्यक्षेत्रात अभिव्यक्त केली. तरी सुध्दा या अंधाऱ्या आयुष्यातही त्यांनी आशावादी सकारात्मक विचारांची आस सोडली नाही. स्वत:ला सूर्यकलातील म्हणून संबोधले.

ताऱ्यांच्याही पुढची दुनिया माझ्या नजरेत आहे.
एक फूल, एक हृदय, एक ग्रंथ नजरेत आहे.

रात्रंदिन दु:खाचा प्रसंग असताही त्यांनी श्रमिकांच्या व्यथा– वेदना, कष्टांना त्यांना सूर्य दाखविण्याची, फूल हातात देण्याची, हृदय जपण्याची व ग्रंथ वाचनाची सकारात्म विचारसरणी सुध्दा कवितेत उतरविली.

ऐसा गा मी ब्रह्म नंतर सुर्व्यांचा माझे विद्यापीठ हा असाच ताकदीचा काव्यसंग्रह आला. तुलनेत आता सुर्वे जास्त अंतर्मुख झालेले दिसले. दु:ख, दैन्य, दारिद्रयात जगणाऱ्यांना त्यांनी आपल्या शब्दांमधून जीवंत करण्याचा मोठा प्रयत्न केला. १९५७ नंतर राजकीय, सामाजिक, भवितव्य हादरून सोडणाऱ्या परिस्थितीने शेतीवर अरिष्ट आणले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जी चलनवाढझाली, महागाई प्रचंड वाढली यामुळे देशातील सर्वसामान्यांचेकंबरडे मोडले. तरी सुर्वे यांचा कष्टकरी माणसावरचा विश्वास ढळला नाही. वास्तव स्वीकारून त्यांनी निराशावादी काव्याची निर्मिती केली नाही. दोन घेत दोन देत , अशी त्याची सकारात्मक विचारसरणी त्यांच्या काव्यातून आविष्कृत होत राहिली, गंभीर झाली. सर्जनशील वास्तव या काव्यसंग्रहातून अभिव्यक्त व्हायला लागले. पण आता या संवेदनशीलतेला खोली होती. ना घर होते ना गणगोत......... अशा शब्दांनी त्यांच्या जीवनप्रणालीचे, समष्टीमनाचेही दर्शन वाचकांना झाले.त्याच्या काव्याची जाणीव संकुचित न होता वैश्विक झाली.

याकुब, आफ्रिकन चाचा, चंद्रा यासारखे चरित्र त्यांनी जातीधर्माच्या पलिकडे नेऊन त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनवून सोडले. साहिले, पाहिले तेच कवितेत आले अशी सुर्व्यांची कवितेची धाटणी आहे. अनुभवाचा सच्चेपणा व अभिव्यक्त होणारा संयम यातून स्पष्टपणे जाणवायला लागला.

उद्याच्या नवसमाजाचे स्वप्न पाहणारी सुर्वे यांची कविता समाजाची अचूक नाडी पकडते व शोषणाच्या मूळाचा शोध घेते. आपल्या काव्यातून त्यानी चित्रण चरित्र जीवंत केले. पोस्टर, पाणी घे सारख्या कविता वा नेहरू गेले त्या वेळेची गोष्ट सारख्या कवितांतून त्यांच्या अनुभव वाचकांना येतो. हणम्या,इसल्या, चंद्रा, इंद्रा कितीवरी व्यक्तिचित्रणे अगदीच जीवंत वाटतातच. त्यांचे अनुभव जीवन जाणिवांची, शोषणाची मांडणी आहे. सुर्वे यांच्या काव्याने साऱ्या परिस्थितीचा जीवनरस रंगगंधासह अभिव्यक्त केला आहे.

पुढे जाहिरनामा मधील सुर्वे याची कविता अजून प्रौढझाल्याचे दिसून येते. उघडप्रतिनिधीत्वाची भूमिका न घेता ती अधिक पोक्त होताना दिसून आली. यात त्यांच्यामधील गांभीर्याची जाणीव तुलनेने वाचकांना अधिक जाणवायला लागली. वेदनाचित्रांची मांडणी व्हायला लागली. कविता दीर्घ स्वरूप घ्यायला लागली. कवितेतून वेदनेला विद्रोहाची वाट प्राप्त झाली. तरीही एक सांगून ठेवतो आपण सूर्यपुत्र आहोत वा सूर्यकुलातील लोकांना थांबणे माहित नाही.पृथ्वीची नवी संरचना बदलावीत लागेल, करावी लागेंल, तिला झटकून पुन्हा मांडणी करावी लागेल असे ते म्हणतात.

एका क्षुब्ध नवागत गतीचे टोक धरून लिहितो आहे. किंवा
हे शब्द हटवा... हे पुतळे... स्थिती स्थापक.

ही नारायण सुर्व्यांच्या काव्यातून उदघृत होणारी जाणीवआहे.

स्वतः जन्मताच फेकून दिलेले असल्यामुळे त्यांना आईचे प्रेम व दूध चाखायला मिळालेच नाही.गंगाराम सुर्वे यांनी त्यांना कचरापेटीतून उचलून आणले, आईबापाची माया मिळाली. त्यामुळे जगातील प्रत्येक स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्याचा प्रचंड आदराचा होता. त्यांच्या कवितेतून येणारी स्त्री चरित्रे व्यथा वेदनेची झालर घेऊन अवतीर्ण होत असली तरी उदार आहेत. जीवनसाथी, सहधर्मचारिणी हें निराळेपण त्याच्या कवितेतून येते.

नारायण सुर्वे यांनी पुढे कार्ल मार्क्स वा लेनिन या कम्युनिस्ट नेत्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन काव्यनिर्मिती केली असे दिसून येते. त्यांच्या कवितेतून स्त्री–पुरूष,प्रेम,कष्टकरी, श्रमकरी, स्त्री,अडीअडचणींशी भांडणारी, नवऱ्याला साथ देणारी, स्वाभिमान जपणारी स्त्री येते. नेहरू गेले त्या वेळची गोष्ट या कवितेत वेश्या असूनही माणूसपण जपणारी स्त्री त्यांनी रेखाटली आहे. जानकी आक्का, माझी आई या कवितांमधून येणाऱ्या व्यक्तिरेखा आजही स्मरणात आहेतच. सुर्वे यांनी आपल्या स्वतःच्या पत्नीलाच मी मेल्यावर रडत बसूनको, हवेतर दुसरे लग्न कर,अशी सूचना केल्याचे दिसून येते.

दिवसभर थकलेली तू तरीही चैत्रपालवी होतेस,
कढ उतू जाणाऱ्या दुधावर स्नेहमयी साय धरतेस.

अशी स्नेहमयी, प्रेमळ भावनाही जपली आहे. सूर्यकुलातील लोक व आयुष्य या कवितांमधून त्यांची स्त्री विषयक जाणीव व्यक्त होते. नारायण सुर्वे यांच्या कवितेतलाजो विकासक्रम आहे, तो आपल्या वैशिष्टयांनी रेखीव होताना दिसून येतो.

ऐसा गा मी ब्रह्म मध्ये थोडा कल्पनाविलास असला तरी माझे विद्यापीठ मध्ये ते सत्य व साधे बोलतात. सुर्वे यांच्या कवितेत आलेली भाषा ही साधी असली तरी अत्यंत प्रत्ययशाली, प्रभावशाली आहे, प्रगल्भ आहे. भावसंवेदना आणि जीवनदृष्टीचे मुरलेपण यामुळे सुर्वे यांची भाषा सुदंर वाटत राहते. जगण्यामुळे ,वागण्यामुळे त्यांच्या काव्यभाषेला मोठे सामर्थ्य प्राप्त झाल्याचे दिसून येते.

सुर्वे यांच्या कवितेतून येणाऱ्या आकाशाचा नकाशा, भाकरीचा चंद्र, आंघोळणारा सूर्य, उजेडाचे वारसदार, पेंगूळणारा सूर्य, आयुष्याच्या उजाड ,माळरानावरील वांझोटे ढग, तुझ्या आकाशातील आम्हीही तारे, कंदिलासारखे वाती आत ओढून घेणारे शहर अशा असंख्य प्रतिमांनी नारायण सुर्वे यांच्या कवितेचे सौदंर्य अजून लखलखीत झाले आहे.

नारायण सुर्वे यांच्यासारख्या एका उच्च दर्जाच्या, श्रेष्ठ दर्जाच्या कविच्या मनाची तगमग, त्यांची स्वप्ने, वेदना, विद्रोह त्यांनी सामान्य वाचकांपर्यत पोहचविल्या आहेत. आसूर्यचंद्र नारायण सुर्वे यांच्या कवितेला मराठी वाचक विसरू शकणार नाही इतकी सशक्त काव्यनिर्मिती त्यानी करून ठेवली आहे.

## संदर्भ

१) स.त्र्य. कुल्ली : तीन अर्वाचीन कवी
२) रा.ग. जाधव : साठोत्तरी कविता
३) प्रकाश देशपांडे : मराठी कविता नवी वळणे.

❖❖❖

# श्री गुलाबराव महाराज आणि मधुराभक्ती

प्रा. डॉ. संजय नीळकंठ पाटील
सहयोगी प्राध्यापक
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशीम
भ्रमणध्वनी ९२७२७७१७००

## श्री. गुलाबराव महाराजांचे लौकिक चरित्र

विदर्भामध्ये अमरावतीपासून दक्षिणेला १३ मैलांवर लोणी—टाकळी नावाचे सुमारे एक हजार वस्तीचे लहानसे खेडे, हेच श्री. गुलाबराव महाराजांचे पवित्र जन्मस्थान. येथे माधानच्या मोहोड कुळातील सौ. अलोकाबाई आणि श्री. गोंदुजी मोहोड यांचे कुटुंबात शके १८०३ आषाढ शुद्ध दशमीला महाराजांचा जन्म झाला. गोंदुजी मोहोड हे माधानचे पाटील. मोहोडांचे घराणे मूळचे मोढ वंशीय क्षत्रिय होते. (डॉ. अ.स. जोशी यांनी आपल्या मधुराद्वैताचार्य श्री. गुलाबराव महाराज अवतार व कार्य ह्या महाराजांच्या चरित्र ग'थामध्ये महाराजांच्या मौढवंशीय क्षत्रिय कुलाची वंश परंपरा दिलेली आहे.) पण अनेक पिढ्यांत संस्कारलोप झाल्यामुळे महाराज स्वत:ला कुणबीच म्हणत. महाराज पाच महिन्यांचे झाल्यावर सौ. अलोकाबाई त्यांना घेऊन माधानला सासरी परत आल्या. त्यावेळी पाणीदार डोळे, सरळ नासिका, सावळा वर्ण, पुष्ट व गोंडस हातपाय अशी लोभसवाणी बाळसेदार बालमूर्ती होती. वयाच्या आठव्या नवव्या महिन्यात डोळे आल्याचे निमित्त झाले. कोणीतरी चुकून भलतेच औषध डोळ्यामध्ये घातले आणि कायमचे अंधत्व आले. बाह्यदृी नाहीशी झाली असली तरी त्या बालमहात्म्याची चिन्मय दृी सतेज व निर्मळ असल्याने त्यांची चित्तवृत्ती नेहमीच आनंदी असे. बोलणे येऊ लागल्यापासून मान हलविणे आणि हाताने टाळ्या वाजविणे यात ही बालमूर्ती रंगू लागली. पुढे पुढे हा अ'डपणा वाढतच चालला. धावणे, चुटक्या वाजवीत चक्राकार फिरणे व मोठ्याने ओरडणे अशा खेळात त्यांना मौज वाटू लागली.

## बालपण

महाराज चार वर्षाचे असताना अलोकाबाईंना एक मुलगी झाली; पण ती वाचली नाही. आईंना बाळंतरोगाने ग्रासले आणि शके १८०७ (इ.स.१८८५) साली त्या निवर्तल्या. महाराज मातृसुखाला पारखे झाले. महाराजांच्या आजीने (आईची आई) सावित्रीनानीने त्यांना लोणीस नेले आणि प्रेमाने संगोपन केले. महाराजांनाही आजीचा फार लळा होता ते तिला बाई म्हणत. हट्ट आणि सारे लाडही तिच्याचपाशी चालत. बाळपणीच महाराजांच्या अलौकिकतेचा अनुभव लोकांना येऊ लागला. शेजारच्या स्त्रिया त्यांच्या विहिरीवर पाणी भरताना या प्रज्ञाचक्षु मुलाची गंमत पाहण्यासाठी अगदी पाऊलही न वाजविता जवळ येऊन उभ्या राहत, तेव्हा महाराज त्यांची नावे भराभर सांगत. आमची नावे तू बरोबर कशी ओळखलीस ? असे त्यांनी विचारल्यास ते उत्तर देत — तुमच्या बांगड्यांच्या आवाजावरून. त्यावर त्या विचारीत, 'अरे, बांगड्या तर सर्वांच्या सार'याच आहेत त्यावरून प्रत्येकीचे वेगवेगळे नाव तुला कसे समजले?' महाराज म्हणत, 'प्रत्येकीच्या बांगड्यांचा आवाज वेगवेगळा येतो.'

रोज जेवायला बसण्याचे वेळी चंदनाचे गंध घेऊन महाराज बोटाने इकडे तिकडे शिंपडीत. जेवण करीत असता मध्येच दोन्ही हात पुढे करीत असे का करतोस? म्हणून विचारले असता सांगत की, 'बाई, एक सुंदर लेकरूं आलं होतं, त्याला चार हात, डोक्यावर मुगुट, कपाळास केशरी गंध व कानात कुंडले होती.' तसेच लहानपणापासून महाराजांचा एक छंद होता. दोन्ही हातांनी चुटक्या वाजवित ते स्वत: भोवती खूप वेळ गरगर फिरत राहत पण त्यांना भोवळ कधी येत नसे.

## प्रपंचातील प्रतिकूल परिस्थिती

महाराजांना पदोपदी प्रतिकूलतेला तोंड द्यावे लागले. वयाच्या चवथ्या वर्षीच मातृछत्र हरविले. त्यांच्या आजोळच्या आजीने, सौ. सावित्री—नानीने मातृप्रेमाला वंचित झालेल्या या नातवाला आजोळी नेले खरे पण तेथील मामा व मामींचा तिरस्कारच त्यांच्या वाट्याला आला. वडिलांनी दुसरे लग्न केल्याने स्वगृही सावत्र मातेचा त्रास तर आजोळी मामा—मामींचा मनस्ताप अशी दोन्हीकडून त्यांची अवहेलनाच झाली. पाटीलकी घरात असूनही आर्थिक स्थिती हळूहळू खालावत होती. त्यामुळे या ना त्या प्रसंगाने वडिलांची मारहाण त्यांना सहन करावी लागली. सावत्र आई तर या मुलास कसेही करून दृष्टीआड करावयास पाहत होती. एकदा तर रूपचंदजी ह्या

गुजराथी ज्योतिषीकडून हा मुलगा मूळ नक्षत्रावर जन्मला आहे म्हणून याला मानभावांना देऊन टाका असे म्हणविण्याचा तिने व्यूह रचला होता; पण त्या भल्या माणसाने असे खोटेनाटे सांगण्याचे साफ नाकारले ही गोष्ट वेगळी.

विस्कळीत झालेली गृहस्थिती सुधारण्याची श्री. महाराजांची फार इच्छा होती पण सावत्र मातेचा मत्सर, वडिलांचा रोष व स्वत:चे लहान वय यामुळे ते शक्य झाले नाही. एकदा तर त्यांनी वडिलांनी घरी आणून ठेवलेला ४० तोळे सोमल (विष) भक्षण केला. मृतवत व निश्चे पडले. सर्वांना त्यांच्या सामर्थ्यांची प्रचीती येताच ते पूर्ववत सावध झाले.

अशाप्रकारची घरगुती किटकिट, कटुतेचे प्रसंग वाढू लागल्यामुळे अखेर इ.स. १९०० च्या सुमारास श्री महाराजांनी आपले घर सोडले व त्यांच्यावर अपार श्रध्दा असलेल्या रामचंद्र बापूंकडे (मोहोड) राहू लागले. जवळपासचे नातेवाईक ज्वारी व अन्नधान्य देत. पत्नी सौ. मनकर्णिकाबाई इकडून तिकडून तेलमीठ आणून कसाबसा स्वयंपाक करीत व दोघे कशीबशी आपली भूक भागवत. डोक्याला तेल नाही, नेसायला धड लुगडे नाही की नहाणे, माखणे नाही, पण अशा करूण विपन्नावस्थेतही या पतिव'तेच्या पतिसेवेत कधी अंतर पडले नाही, की कधी त्यांनी त्याविरूध्द अवाक्षरही काढले नाही. महाराजांचे मोठेपण व्यक्त करताना बाबा मोहोड म्हणतात, 'ही सर्व साधना करताना श्री महाराजांचा आणखी एक विशेष प्रकट झाला. वास्तविक अपंग, निराधार अशी त्यांची अवस्था. पण या अवस्थेचा कधीही त्यांनी, इतरांनी दया करावी म्हणून उपयोग केला नाही. उलट अंगभूत शक्तीला अधिक जोमाने प्रकट केले आणि कष्ट व चिकाटी यांच्या माध्यमाने आपली कठीण व दुर्गम अशी वाटचाल केली'. तर लोकनायक मा.श्री. अणे यांनी म्हटलेले आहे की, 'त्यांच्या अंधत्वामुळे प्रख्यात आंग्ल कवी मिल्टन याने आपल्या अंधत्वासंबंधी काढलेलेल्या उद्‌गारांचे स्मरण होते. मिल्टनच्या म्हणण्याचा आशय असा आहे की, माझे चर्मचक्षू न झाले व बाहय दृष्टी निमाली हे जरी खरे आहे, तरी त्याबरोबर माझे प्रज्ञाचक्षू अधिक सतेज झाले आहे असे मला वाटते. 'पॅराडाइज लॉस्ट' हे वीर काव्य लिहिणाऱ्या या प्रतिभासंपन्न कवीचे हे उद्‌गार यथार्थ नाहीत असे कोण म्हणेल? श्री गुलाबराव महाराज यांची प्रगल्भ बुद्धिमत्ता व विविध प्रकारच्या गंभीर विषयांवर त्यांनी निर्माण केलेली गद्य पद्यात्मक विस्तृत ग्रंथ संपत्ती पाहिली, म्हणजे शैशवावस्थेतच उत्पन्न झालेल्या प्रज्ञाचक्षुंच्या सतत व अलौकिक दीप्तीमुळे चर्मचक्षू कायमचे दिपून त्यांची बाह्यदृष्टी न झाली व त्यांची वृत्तीही अंतर्मुख होऊन सतसिद्धांत शोधण्यास समर्थ बनली, असे म्हणावयास हरकत नाही'.

## विद्याव्यासंग

महाराजांना शास्त्रपुराणांची आवड होती, वयाबरोबर त्यांचे ग्रंथावलोकनही वाढू लागले. लक्ष्मणभट जोशी, पांडूरंगपंत, केशवराव पांडे वगैरे साक्षर मंडळीजवळून विनीत होऊन मिळतील तेवढे ग्रंथ वाचवून घेत. त्यासाठी काळ, वेळ, श्रम, द्रव्य यांची त्यांना पर्वा नसे. वाचनानिमित्त कधी ज्वारी तर कधी गहू वगैरे गुरूदक्षिणा देत. एकदा त्यांनी हातातील चांदीचे कडे काढून दिले तर दुसऱ्या प्रसंगी केशवरावकाकांना स्वत:च्या विवाहात मिळालेली शालमुदीची शाल नेऊन दिली. या ग्रंथावलोकनात वेदवेदान्तापासून संगीत, वैद्यक, साहित्यशास्त्र, थियॉसॉड्गी, पाश्चात्य तत्त्वज्ञाने व आधुनिक सायंसमधील इलेक्ट्रॉन थियरीपर्यंत त्यांची मती अकुंठित चालत असे.

मुंबईच्या रॉयल एशियाटीक सोसायटींच्या सुप्रसिद्ध ग्रंथालयास श्री महाराज एकदा भेट देण्यास गेले असता घडलेला प्रसंग नमूद करण्याजोगा आहे. संस्कृत हस्तलिखीत ग्रंथाचे नोंदबुक तेथील कारकुनास श्री. महाराजांनी वाचावयास सांगितले आणि आश्चर्य असे की, ग्रंथाचे नाव वाचल्याबरोबर हा ग्रंथ कोणी लिहिला, हा जैनांचा आहे की बुद्धांचा आहे, न्यायशास्त्राचा आहे की वैशेषिकांचा आहे हे सर्व माहीत असल्याप्रमाणे श्री महाराज बिनचूक सांगू लागले व ही यादी तयार करणाऱ्याने कशा चुका केल्या आहेत हेही त्यांनी दाखवून दिले.

## पुस्तकप्रेम

महाराजांना पुस्तकांचे फार प्रेम, कोणताही जुना प्राचीन ग्रंथ छापला गेला असो किंवा पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा नवा ग्रंथ असो, त्याची माहिती ऐकल्याबरोबर तो ग्रंथ महाराज बोलावित; परंतु परिस्थिती अतिशय गरिबीची असल्यामुळे याचना करून कोणासही पैसे मागत व ग्रंथाची किंमत चुकती करीत. पाश्चात्य मताचे खंडन करताना किंवा आर्यसिद्धांताविषयी माहिती सांगताना त्यांना संदर्भ ग्रंथांचे अतिशय महत्त्व वाटत असे

त्यामुळे पुस्तकांची पेटी डोक्यावर घेऊन एकटे बेधडक हिंडत असत. कधी कधी चांदूरबाजार वगैरे परगावीही एकटेच निघून जात, दिवसा किंवा रात्रीही हिंडताना त्यांना कोणाचे साह्य लागत नसे.

## वाङ्मयीन कार्य

## महाराजांची विद्या आणि ग्रंथनिर्मिती

चर्चेतून आणि ग्रंथरचनेतून महाराजांचा युक्तीने पटवून देण्याचा बाणा होता आजच्या बुद्धियुगात अनुभवाला युक्तीची जोड देणे आवश्यक होते म्हणूनच महाराजांनी स्वानुभवाला युक्तिवादाच्या चौकटीत बसवून वाङ्मय निर्मिती केली.

महाराजांनी मुळेमास्तरांना एका पत्रात स्वत:च्या विद्येची मर्यादा सांगितली आहे. माझी विद्या किती आहे, हे मी सर्वास जाहीर करतो. वेदांवर पुज्यबुध्दी मात्र गीता, भागवत, महाभारत, योगवसिष्ठ, वाल्मिकी रामायण या ग'थांचे होईल तेवढे श्रवण व अवलोकन. ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकारामांची गाथा, तुलसीरामायण या ग्रंथांचे पठण, तेवढीच माझी विद्या आहे यांच्या पलीकडे मला काही येत नाही, हे डिंडिम पिटून सांगतो.

असा नम्रपणा जरी दिसत असला तरी त्यांची शंभराच्यावर असलेली सर्व प्रकारची ग्रथरचना डोळ्यात मावण्यासारखी नाही. हा ग्रंथरचनेचा खटाटोप का केला या प्रश्नाला त्यांनी भवभूतीचे उत्तरच स्वत:चे उत्तर म्हणून दिले आहे. जे कोणी आमचा अपमान करीत असतील त्यांचेकरता हा आमचा यत्न नाही. माझ्यासारखेच अंत:करण असलेल्यांसाठी हा सर्व खटाटोप आहे. अनंत कालात केव्हातरी आणि विपुल पृथ्वीवर कोठेतरी, माझे विचार आवडतील असा कोणीतरी भेटेलच. त्याचेसाठीच हे ग्रंथ मी रचले आहेत.

मधुराद्वैताचार्य म्हणून संत गुलाबराव महाराजांची ओळख आहे. मधुराभक्ती हा भक्तीचा एक सर्वश्रेष्ठ प्रकार म्हणून अनादीकालापासून सर्वश्रृत आहे. या भक्तीचे संदर्भ आपल्याला बघायला मिळतात. 'तत्‌सुखसुखित्वम्' हा परमेश्वराबद्दलचा भाव केवळ याच भक्तीप्रकारामध्ये संभवतो. मधुराभक्तीचे हे श्रेष्ठत्व लक्षात घेता श्री गुलाबराव महाराजांनी सुध्दा श्रीकृष्णपत्नी या भावाने ही भक्ती केलेली त्यांच्या साहित्यामध्ये दिसून येते.

'मधुराभक्तीची परंपरा अत्यंत प्राचीन स्वरूपाची आहे. चैतन्य महाप्रभू, संत मीरा, रामकृष्ण परमहंस ही ठळक उदाहरणे यासंदर्भात सांगता येतील. त्याचप्रमाणे बव्हंशी संतांच्या साहित्यामधून हा भाव व्यक्त झालेला दिसून येतो. मधुरभाव हा शांत, दास्य, सख्य व वात्सल्य या चारी भावांची सारसृी असून शिवाय त्याहून अधिक आहे. कारण प्रेमिका स्त्री ही आपल्या प्रियकराची एखाद्या दासाप्रमाणे सेवा करते, सखीप्रमाणे सर्व अवस्थांमध्ये काळजी घेते, मातेप्रमाणे त्याच्या हितचिंतनात सदैव मग्न असते. अशा प्रकारच्या स्त्रीचे प्रेम सर्वात श्रेष्ठ असून भक्तिशास्त्रात तिला 'समर्था–प्रेमिका' म्हटले आहे.

'कृष्णावतारात गोपिका होऊन मला आलिंगन द्या' असे करुणोपनिषदात रामचंद्राने सर्व वनवासी मुनींना सांगीतले. यावरून माधुर्यप्रेमाचे अस्तित्व रामावतारात देखील होते असे आढळते. भागवतादि पुराणात पराभक्तीचे आर्दा म्हणून गोपिकाच आढळून येतात. शैशवावस्थेपासून अतिकडक वैराग्यसंपन्न असलेल्या नारदशुकाचार्यादि भक्तीच्या आचार्यांनी देखील गोपींच्या प्रेमाची स्तुतीच केली आहे.[१]

ही माधुर्यभक्ती श्रुती, स्मृती, पुराणे व भगवतभक्त संतांपर्यत अव्याहतपणे चालत आलेली आहे. वेदातील माधुर्यभक्तीचे स्वरुप भागवतातील गोपीप्रमाणे बहरलेले दिसून येत नसले तरी अंकुररुपाने ते वैदिक सुक्तांमध्ये अस्तित्वात आहे यात तिळमात्र शंका नाही. शंकराच्या कृष्णपत्नीत्वाचा उल्लेख बरेच ठिकाणी आला असून त्यांनी स्वत: गोपी होऊन रासक्रीडेत आपले माधुर्यप्रेम श्रीकृष्णावर अर्पण केलेले आहे. तसेच श्रीकृष्णानेही पत्नी होऊन शिवाला माधुर्यप्रेम दिलेले आहे. असा हा अनादि भक्तिसंप्रदाय थेट वेदांपासून विसाव्या शतकातील श्रीगुलाबराव महाराजांसारख्या भक्तश्रेष्ठापर्यंत अखंड प्रवाहित आहे.[२]

श्री गुलाबराव महाराजांनी सहा दर्शने, चारी वेद, उपनिषदे, पुराणे, भागवत व गीता यांचा सांगोपांग अभ्यास करून भक्तीला स्वतंत्र शास्त्राचे स्थान व प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. भक्ती ही सर्व साधकांना पायाभूत असलेली विशाल बैठक आहे व योग्यापेक्षा भक्त हा जगातील देवत्व ठायी ठायी पाहणारा म्हणजे विश्वाशी समरस होणारा आहे हे ज्ञानेश्वरप्रणित भक्तिमत त्यांनी आपल्या वाङ्:मयातून मांडले आहे. श्रीगुलाबराव महाराज हे ज्ञानेशांचे अनुग्रहीत व कृपांकित शिष्योत्तम होते. योगावर नऊ पुस्तके लिहून, अनेक नव्या यौगिक प्रकिया मांडून पूर्वीच्या योग प्रदर्शनात मोलाची भर घालणाऱ्या गुलाबराव महाराजांनी, अंतिमत: प्रेमभक्तीलाच सर्वश्रेष्ठ स्थान दिले आहे. आपल्या 'प्रीतिनर्तन' काव्यात त्यांनी म्हटले आहे की, केवळ ज्ञान मिळविले की जीवब्रह्मैक्याचा

अनुभव साधकाला येत नाही. तर हा अनुभव येण्यासाठी भक्तीच्याच आश्रयाने त्याला पुढे जावे लागते. गुरु किंवा परमेश्वर यांना आपले मातापिता मानून त्यांच्या प्रेमसागरात आपले सारे विकार विरघळून टाकूनच खरी एकतानता प्राप्त करुन घेता येते. समाधीपेक्षाही भक्ताची ही सामरस्यानुभूतीची अवस्था श्रेष्ठ आहे असा स्वच्छ निर्वाळा त्यांनी देऊन टाकला आहे.

लालनभक्ती, वात्सल्यभक्ती, माधुर्यभक्ती असे भक्तीचे तीन प्रकार वर्णून गुलाबराव महाराजांनी भक्तीला आणखीनच मधूर व समृद्ध केले आहे. 'नित्यतीर्थ' या आपल्या काव्यातही त्यांनी 'परमप्रेमरूपा' अशा ह्या भक्तीचे मुक्तकंठाने गुणगान केले आहे. चिरसंजीवन प्राप्त झालेल्या ज्ञानेशांच्या चरणी भक्तीपूर्वक जीवन समर्पण केल्यानेही सामरस्यानुभूतीची श्रेष्ठ अवस्था प्राप्त होते असेही त्यांनी या काव्यात म्हटले आहे. आपल्या 'भगवद्भक्तिसौरभ' या ग्रंथात महाराजांनी, रुक्मिणीने श्रीकृष्णाला पाठविलेल्या सात श्लोकांच्या पत्रातून अद्वैतज्ञानपूर्ण माधुर्यभक्तीचा संप्रदाय कसा प्रवृत्त झाला याचे विवेचन करुन, प्रेमभक्तीचे तत्त्वज्ञान विशद केले आहे. 'प्रेमनिकुंज' ग्रंथातही ते सांगतात की, परमेश्वर किंवा सद्‌गुरू यांचेवरील प्रगाढ प्रेमानेच भक्तिज्ञान प्राप्त होते व माधुर्यसेवेने परमेश्वराशी एकरुप होता येते. शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाला महाराजांनी आपल्या मधुराभक्तीच्या प्रेमकल्लोळाने नखशिखान्त न्हाऊ घातले असल्याचा प्रत्यय त्यांच्या 'भक्तिपदतीर्थामृत' ग्रंथातूनही येतो. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, हरिपाठ ह्या ज्ञानेश्वररचित ग्रंथांवर आपल्या भक्तिपरिप्लुत कीर्तनातून रसाळ निरुपण करणारे संतश्रेष्ठ गुलाबराव महाराज, ज्ञानोबा–तुकोबांच्या एखाद्या भक्तिमधूर अभंगाचे श्रवण करताच ज्याच्या वाणीतून शेकडो ओव्या प्रस्फुटित होत असत असे रससिद्ध महाकवी गुलाबराव महाराज 'ज्ञानेश्वरकन्या' 'गुलाब' त्या ज्ञानाईचेच अंतरंगीय दर्शन आपल्या साहित्यातून घडविल्याविाय कसे राहतील'?[३]

'भोज्येषु माता शयनेषु रंभा......' या सुभाषितात सांगितल्याप्रमाणे स्त्री असलेल्या भक्ताच्या सर्व वृत्ती सगुण श्रीहरिसाठीच उठत असतात. दासी म्हणून, मित्र म्हणून, जेवताना माता म्हणून, पुत्र म्हणून वगैरे सर्व प्रकारचे प्रेम माधुर्यप्रेमातच होऊ शकते. व्यवहारातील सर्व प्रकारच्या संबंधाने उत्पन्न होणारे प्रेम, पत्नीपणा न सोडता, पत्नी पतीवर करु शकते. त्याप्रमाणे या माधुर्यप्रेमात एक देखील वृत्ती भगवंताला सोडून उत्पन्न होत नाही, हीच माधुर्यप्रेमाची सर्वंकषता, व्यापकता आणि श्रेष्ठता आहे'.[४]

'महाराज स्वतः मधुरभाव श्रेष्ठ मानणारे भागवत पुराणातील गोपीवर अभंगरुप भावार्थाचे रहस्योद्‌घाटन करुन त्यांनी कृष्णभक्तीचे नवीन दालन उघडले आहे. मूळ भागवतामध्ये १९ श्लोक असून त्यापैकी १७ श्लोकातील मधुरभावाला पोषक असलेला गोपींचा विरह महाराजांनी पद्यवाङ्‌मयातून व्यक्त करुन त्यातून वात्सल्यभक्ती आणि मधुराभक्तीचे स्वरुप स्पष्ट केले आहे'.[५] महाराजांच्या वाङ्‌मयसरितेमधून हा मधुराभक्तीचा प्रवाह अखंड वाहताना आपल्याला दिसून येतो. ते म्हणत, मी 'पंचलतिका नावाची गोपी आहे' आणि खरोखरीच स्वतः गोपी असल्यामुळे स्त्रियांप्रमाणे ते गळ्यात मंगळसूत्र धारण करीत, वेणी घालत व कुंकू लावत. पुढे पुढे तर श्रीकृष्ण पत्नीत्वाला साजणारा त्यांचा गोपीवेश नित्याचा झाला. इतकेच नव्हे तर श्रीकृष्णाचे नाव घेताना त्यांना संकोच होई व ते खरोखरीच लाजत. गोपीभावाने त्यांनी एकदा घेतलेला मार्मिक उखाणा असा –

'नाव घ्या म्हणावयासाठी निगम झाले भाट
पंचलतिकेच्या मंदिरी वासुदेवाचा थाट ।।'[६]

श्री गुलाबराव महाराजांच्या अभंग आणि पदांमधून सुध्दा हा मधुर भाव ठिकठिकाणी दिसून येतो. हुरहुर, तगमग, अस्वस्थता, मिलनोत्सुकता, सवतीमत्सर इ. प्रकारचे भाव महाराजांच्या अभंग पदांमधून व्यक्त झालेले आहेत. पैकी काही अभंग आणि पदांचा उेंख येथे आपल्याला करणे शक्य होईल. ते म्हणतात, ह्या विरह दुःखामध्ये रडून रडून माझे डोळे गुंजाप्रमाणे लाल लाल झालेत. परंतु अजुनही त्या सावळ्या कृष्णाचे दर्शन घडत नाही. आता मी विश्वास ठेऊन कोणाला शरण जाऊ? ज्ञानाने सद आणि चित् हे दोन्ही अंश कळले परंतु श्रीकृष्ण प्रेमाशिवाय आनंदांश मात्र अप्राप्त आहे. म्हणून हा जीव झुरुन अस्थिपंजर होऊन तारुण्य हे म्हातारपणासारखे वाटायला लागले आहे. (अभंग १४०८) येथील सवतीमत्सरभाव देखील पाहण्यासारखा आहे. ही आंधळी गवळण म्हणते, कोण्यातरी सवतीने माझ्या स्वामींना भुलविले आणि माझे घर धुळीस मिळविले. तिने काय जादुटोणा केला कोण जाणे परंतु महिना महिना स्वामी माझ्याकडे येत नाहीत. या गोकुळामध्ये ङ्गार चेटकिणी स्त्रिया आहेत. मी स्वामिनी झाली हे त्यांना सहन झाले नाही. माझ्या आईवडीलांनी (ज्ञानेश्वरांनी) मला सर्व बघून दिले परंतु दुर्दैवाने मी बुडाले. (अभंग १४२०)

श्रीगुलाबराव महाराजांच्या अभंगपदांमधून अशाप्रकारे जी मधुराभक्ती प्रकटलेली आहे. ती सुध्दा मोठा सुंदर पध्दतीने. ती सौंदर्यस्थळे सुध्दा मोठी रोचक आहेत. हे सर्व प्रकट होत असताना महाराजांनी केलेले युक्तिवाद, त्यांचा कल्पनाविलास, त्यांचे अलंकार वैभव, विविध भाव–दर्शन आपल्याला दिसून येते. ह्या

विरहिणीला भेटविण्यासाठी परमेवराला आणायचे, तर त्या परमेवराला आणण्यासाठी आणणारा सुध्दा त्याच्यासारखाच लागेल. आणि म्हणून त्याचा शोध घेताना महाराजांनी किती वेगवेगळ्या कल्पना करुन, त्या स्वत:च खोडून पुन्हा नव्याने कशा स्वरुपाच्या कल्पना केलेल्या आहेत, ते बघणे मोठे मजेशीर आहे. ते म्हणतात, हरीला आणण्यासाठी त्याच्यासारखे निळे ङ्गुल पाठवावयाचे तर त्याला जड अशी बैठक नसल्यामुळे निळ्या भ'मराचा विचार पुढे येतो. परंतु ह्या भ'मराला तर गंधभोगामध्ये मरण येते म्हणून तोही योग्य नाही. मग पुढे विचार करता हरिप्रमाणे निळे आकाश ह्या विरहिणीला दिसते परंतु त्याला देखील शून्यत्व आहे हे तिच्या लक्षात येते. निळ्या मृगजळाचा विचार करता ते सुध्दा ज्वालारुप असल्यामुळे तोही विचार ती सोडून देते. शेवटी हरिप्रमाणे निळा आणि नम'मूर्ती असा मेघ तिला दिसतो. अशा ह्या मेघाजवळ ही विरहिणी निरोप देताना त्याला म्हणते की, तुझ्यासारखाच माझा श्रीरंग निळा आहे त्याला तू ओळख. जसा तू नित्य आकाशामध्ये राहतोस तसा माझा हा कांत—श्रीहरी—वैकुंठामध्ये राहतो. तुझ्यापासून ज्याप्रमाणे पाणी गळते त्याप्रमाणेच श्रीहरीसाठी माझे डोळे हे अश्रूंनी भरलेले आहेत. तुझ्या गर्जनेने देवही जागा होतो, तेव्हा माझा शब्दभाव त्याला सांग की, तुझे, माझे आणि श्रीकृष्णाचे सादृश्य आहे. म्हणून त्याला तू घेऊन ये. तुला वायुशिवाय गती नसते म्हणून तुला गती देण्यासाठी म्हणून मी माझा प्राण तुझ्यासोबत देत आहे. आाप्रकारे विरहिणीचा हा विरहीभाव मोठा कल्पनारम्य पद्धतीने व्यक्त झालेला आहे. अभंग (१४०५) येथे कालीदासाच्या 'मेघदूत' काव्याची आठवण झाल्याखेरिज राहत नाही.

महाराजांच्या कल्पनाविलासाप्रमाणेच त्यांनी विविध प्रकारचे भावदर्शन सुध्दा मधुराभक्तीच्या प्रकटनासाठी योजलेले आहेत. यामध्ये विरह, वत्सलभाव, सवती—मत्सर, मनाची अस्वस्थता, विनम'ता, मिलनोत्सुकता इत्यादी प्रकारचे भाव आपल्याला त्यांच्या साहित्यातून विशेषत: अभंग आणि पदांमधून दिसून येतात.

मधुराभक्तीचे प्रकटन करणाऱ्या श्री गुलाबराव महाराजांच्या अभंग पदांमधून आपल्याला त्यांची अलंकार—श्रीमंती द्दोत्पत्तीस येते. अनेक उपमांचा वापर महाराजांनी केलेला दिसून येतो. उदा.

'स्वर्गभोग तया वमना समान । ज्यांच्या नारायण चित्ती वसे '

'म्हणूनिया जीव झुरोनि पांजरा । तारुण्यचि जरासम वाटे '

'माझ्या सुरतीसाठी स'यारे टपती दुधावरी मांजर जैसी '

'केव्हा येतील गृही नारायण । जीव तळमळे जेवि अजळी मीन '

उपमांप्रमाणेच रुपकाचाही वापर कोठे कोठे दिसून येतो. उदा. क'धपती, आशासासू, मायामगरी इ.

'ज्ञानेश्वरांप्रमाणेच' त्या ज्ञानेशनंदिनीने दृांतांचाही भरपूर वापर तिच्या मधुराभक्तीच्या प्रकटनामधून केलेला आहे. ज्ञानेश्वरांनी जी स्थिती आपल्याला प्राप्त करुन दिली तिचे ज्ञान कोणालाही नाही हे स्पष्ट करताना महाराज म्हणतात —

'पाणबुडाविन सागरीचा हिरा । न शके दुसरा कदा काढो '

सिध्दीपुढे लोक कसे वाहवत जातात, तर —

'चांदण्या पाहोनि हंस ते उडती '

तुमच्यापुढे (परमेश्वरापुढे) माझ्या पापांची काय तमा ? ज्याप्रमाणे —

'प्रलयाग्नी काय तृण ते बापुडे '

तर क्वचित ठिकाणी —

'विरहे ही सुकली काया नयनि पाही न सुकलिकाया'

या सारखा श्लेषसुध्दा महाराजांनी योजलेला दिसतो.

वऱ्हाडी बोली रुपांचा आणि वाक्प्रचारांचा वापर सुध्दा महाराजांनी केलेला आहे. नेहाल, पांजरा, काह्याचा, मुशारा, नितातला म्हणू, निसून इ. बोली रुपे येथे दिसतात. तर डोळे गुंजा होणे, धुळे मिळविले घर, ङ्गुटके कपाळ, ङ्गाटे मोडणे, घातला ग मोडा इ. वाक्प्रचारांचा वापर त्याचप्रमाणे 'सान मुखी मोठा ग'ास, उगाळता कोळसा उजळ ना इ. म्हणींचा वापर महाराजांनी केलेला दिसून येतो. त्याचप्रमाणे — '

'वियोगावाचुनि संयोगाचे सुख वासना अनेक उपजवी '

'रति विषयांचि वाढविते दु:ख'

यांसारखी सुभाषितपर रचना काही ठिकाणी दिसून येते. यासोबतच अनेक प्रतिमा प्रतीकांचा महाराजांनी वापर केलेला दिसून येतो. त्यांचे युक्तिवाद चातुर्यदेखील अनेक ठिकाणी व्यक्त होताना दिसते. काही ठिकाणी लोकसंकेतांचा वापर दिसतो. अनेक ठिकाणी हरिपाठातील अभंगाशी साम्य सुध्दा दिसते. उदा. — 'जे जे दृी देखे

ते ते हरिरुप' या हरिपाठातील चरणासी – 'जे जे दृी दिसे ते ते तया तुचि' आा प्रकारची साम्य असलेली रचना दिसून येते.

श्री गुलाबराव महाराजांचे बहूअंशी साहित्यच अशा प्रकारच्या मधुरभावाने परिपूर्ण आहे. ते अभ्यासणे निश्चितच मोठे आनंददायी आणि दु:खहारी अशा स्वरुपाचे असल्यामुळे जिज्ञासूंनी या साहित्याचा आवर्जून आस्वाद घ्यावा अशा प्रकारचे विनम' आवाहन करून ह्या लेखनाला विराम देतो.

## संदर्भ


१. प्रा. शितल बुरघाटे (श्री गुलाबराव महाराजांचे मधुराद्वैतदर्शन), प्रज्ञाचक्षु : जीवन व कार्य, डॉ. वंदन मोहोड (संपादक), वंदन प्रकाशन, अमरावती

२. कित्ता

३. शरद भगत (ज्ञानाईचे प्रेमांकुर), प्रज्ञाचक्षु : जीवन व कार्य, डॉ. वंदन मोहोड (संपादक), वंदन प्रकाशन, अमरावती, पृष्ठ ११६, ११७

४. डॉ. कृ.मा. घटाटे, श्री गुलाबराव महाराजांची विचारसंपदा, पृष्ठ १५८

५. डॉ. शालीनी मोहोड (श्री गुलाबराव महाराजांची मधुराभक्ती), प्रज्ञाचक्षु : जीवन व कार्य, डॉ. वंदन मोहोड (संपादक), वंदन प्रकाशन, अमरावती

६. डॉ. अ.स. जोशी, मधुराव्दैताचार्य श्री गुलाबराव महाराज, अवतार व कार्य, चैतन्य प्रकाशन, नागपूर


❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre,** Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**


Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983






स्व. डॉ. भाऊ मांडवकर




ISSN

2454-7409